


आज जागतिक पुस्तक दिन

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०७ ■ नाशिक, बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे

### कोर्टाला बॉम्बने उडवण्याची धमकी

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात मंगळवारी सकाळी बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने प्रचंड खळबळ उडाली. कोर्ट परिसरात एक बेवारस बॅग सापडल्याने त्वरित सुरक्षारक्षक व बॉम्ब निकामी पथक घटनास्थळी पोहोचले. या बॅगमध्ये एक मोबाईल फोन व काही कागदपत्रे आढळून आली. गेल्या एका महिन्यात ही दुसरी वेळ आहे की, न्यायालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच नागपूर पोलिस आणि बॉम्ब निकामी पथक घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसर सील करण्यात आला आणि कसून तपास सुरू झाला. पोलिसांनी सांगितले की, न्यायालयाच्या सुरक्षा व्यवस्थेत असलेल्या एका अधिकाऱ्याला फोनवरून कोर्टला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली गेली. यानंतर लगेचच परिसरातील सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली.

### महेश बाबूला बजावले समन्स

**नवी दिल्ली :** साऊथ सुपरस्टार महेश बाबू यांच्याशी संबंधित मोठी बातमी समोर आली आहे. ईडीने महेश बाबूला समन्स बजावले आहेत. अभिनेत्याला २७ एप्रिल रोजी हैदराबाद ईडी कार्यालयात हजर राहण्याचे समन्स बजावण्यात आले आहे. ही बातमी समोर येताच, अभिनेत्याचे चाहतेही चिंतेत पडले की, ईडीने महेशला कोणत्या प्रकरणात समन्स पाठवले आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) हैदराबादस्थित रिअल इस्टेट फर्म साई सूर्या डेव्हलपर्स आणि सुराणा ग्रुपशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अभिनेता महेश बाबूला २७ एप्रिल रोजी चौकशीसाठी समन्स बजावले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या कंपन्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या रिअल इस्टेट प्रकल्पांना प्रोत्साहन दिल्याबद्दल महेश बाबूची चौकशी सुरू आहे.

### गुजरातमध्ये प्रशिक्षण विमान कोसळले

**अमरेली :** गुजरातमधील अमरेली येथील गिरिया रोडवरील एका निवासी भागात पायलट प्रशिक्षण केंद्राचे विमान कोसळले. या अपघातात पायलटचा मृत्यू झाला आहे. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक आणि पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. अमरेली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान एका खासगी कंपनीचे होते. हे विमान वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी वापरले जात होते. विमानात फक्त एकच पायलट होता, ज्याचा मृत्यू झाला. त्या वैमानिकाचे नाव अनिकेत महाजन आहे.

### चंद्रपुरात सर्वाधिक तापमानाची नोंद

**मुंबई :** राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. विशेषत: विदर्भात तापमानात वाढ झाली आहे. मागील २ दिवसांपासून विदर्भातील जिल्हे देशात सर्वांत उष्ण तापमानात प्रथम असल्याचे पाहायला मिळत आहे. काल देशात सर्वाधिक तापमानाची नोंद चंद्रपुरात झाली आहे. चंद्रपुरात सर्वाधिक ४४.६ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली आहे.

# हिंदी भाषा सक्तीचा निर्णय अखेर मागे; राज्यात विरोध झाल्यानंतर सरकारकडून स्थगिती

**मुंबई : राज्यात इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना हिंदी भाषा सक्तीची करण्यात आल्याने निर्माण झालेल्या वादामुळे अखेर सरकारने दोन पाऊले मागे येत या निर्णयाला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. काल शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी याबाबतची घोषणा करताना हा निर्णय तूर्तास रद्द करण्यात येत असल्याची घोषणा केली.**

पहिलीपासून हिंदी सक्तीचा निर्णय घेतल्यानंतर वाद पेटला होता. राज ठाकरेंच्या मनसेने या निर्णयाविरोधात दंड थोपटले होते. तर, राज्य शासनाच्या सुकाणू समितीत असलेल्या शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांनीदेखील हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची करणे चुकीचा निर्णय असल्याचे म्हटले. त्यामुळे सरकारकडून हा निर्णय मागे घेतला जातो की कायम ठेवला जातो हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्यातच आज शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पत्रकार परिषद घेऊन हिंदी भाषा अनिवार्य असा उल्लेख शासन निर्णयात आहे, तो शासन निर्णय हटवून नवा शासन निर्णय निर्गमित केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.



यासंदर्भातील शासन निर्णयात हिंदी भाषा अनिवार्य असा उल्लेख झाल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे अनिवार्य या शब्दाला स्थगिती देत आहोत आणि पुढील शासन निर्णय यथावकाश निर्गमित केला जाईल, अशी माहिती देखील दादा भुसे यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

**मराठी विषय बंधनकारकच**

मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी विषय /-...४

**❛ सरकारचे धन्यवाद : राज ठाकरे**

दरम्यान, सरकारच्या निर्णयावर राज ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकारने आधी विचार करून निर्णय घेतला असता तर आज माघार घेण्याची वेळ आली नसती. पण सरकारने हा निर्णय मागे घेतला. यासाठी सरकारचे धन्यवाद! महाराष्ट्रात दुसरी, तिसरी कोणती भाषा चालणार नाही. महाराष्ट्रात फक्त मराठीच चालणार, अशी प्रतिक्रिया राज ठाकरेंनी दिली आहे.

# दहशतवाद्यांच्या हल्ल्यात २७ पर्यटकांचा मृत्यू

## पहलगाम हादरले : धर्म विचारात पर्यटकांवर गोळीबार

**श्रीनगर :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाला. यात महाराष्ट्रातील दोघांचा समावेश आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असून, मृतांत बहुतेक पर्यटक होते. पर्यटकांना त्यांची नावं आणि धर्म विचारल्यानंतर दहशतवाद्यांनी शिवीगाळ केली आणि अंधाधुंद गोळीबार केला. या घटनेने पहलगाममध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेत अनेक पर्यटक जखमीही झाले आहेत. या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत. ते आज घटनास्थळाला भेट देण्याची शक्यता आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. धक्कादायक म्हणजे भारतीय जवानांवर नाही तर पर्यटकांवर हा हल्ला झाला आहे. या हल्ल्यात २० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या

- मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता
- गृहमंत्री शहा तातडीने जम्मूला रवाना
- मृतांत दोन परदेशी पर्यटकांचाही समावेश






दिल्लीतील निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. यानंतर शहाही जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत.

मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांच्या एका गटाला लक्ष्य करण्यात आले. हल्ल्यादरम्यान काही घोड्यांनाही गोळ्या लागल्या. सध्या सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून, शोधमोहीम तीव्र केली आहे. दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, हा हल्ला दुपारी अडीचच्या सुमारास झाला. पहलगाममधील बैसरन मैदानावर २-३ बंदूकधारी सैनिकी गणवेशात आले आणि त्यांनी घोडेस्वारीचा आनंद लुटणाऱ्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. /-...४

### महाराष्ट्रातील दोघे; फडणवीसांची माहिती

लष्कर-ए-तोयबाच्या द रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या हल्ल्यात महाराष्ट्रातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाला असून, दोन पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली आहे. या हल्ल्यात पुण्यातील काही पर्यटक जखमी झाल्याची माहिती समोर आली असून, खासदार सुप्रिया सुळे यांनी त्याबाबत माहिती देण्याची विनंती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याकडे केली आहे.

# मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा!

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची काल महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मत्स्य व्यवसायाला आजपासून राज्यात कृषीचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा राज्यातील ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना फायदा होणार आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्र महाराष्ट्रात कृषीप्रमाणे चांगले उत्पादन आणि उत्पन्न घेण्यास सक्षम आहे. मत्स्य व्यवसायास कृषीचा दर्जा नसल्याने मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलतींपासून वंचित राहावं लागत होते. पण महाराष्ट्र राज्यात आता मत्स्य शेतीला कृषीचा दर्जा देऊन मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध होणार आहेत. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचंदेखील बळकटीकरण होणार आहे.

राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होण्याची दाट शक्यता आहे. कृषी क्षेत्रास लागणारे बियाणे, ट्रॅक्टर, तिफन, पाभर, औत, खते इत्यादींकरिता शेतकऱ्यांना लाभ मिळतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, पॅडलव्हील एअरेटर्स, एअरपंप करीता अनुदान मिळणार आहे. तसेच शीतगृह आणि बर्फ कारखान्याला अनुदान मिळणार आहे. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीकविमाप्रमाणे मत्स्य शेतकऱ्यांना, मत्स्य संवर्धकांना मत्स्यबीजांच्या मत्स्योउत्पादनाच्या नुकसानीसाठी मत्स्य विमा योजना मिळणार आहे. दुष्काळ किंवा अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्ती झाल्यास कृषी क्षेत्रात ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना शासनातर्फ रिलीफ पॅकेज जाहीर होतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांनाही शासनातर्फे रिलीफ पॅकेज मिळणार. मत्स्यपालनाला कृषीचा किनारी आणि अंतर्गत आर्थिक विकास होक शकतो. रोजगार निर्माण होऊ शकतो आणि उत्पन्न मिळू शकते. मच्छीमारांना कृषी शेतकरी झाल्याने वीजशुल्कात अनुदान मिळणार आहे. मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने मत्स्य शेतकरी, मत्स्यसंवर्धन प्रकल्प, संबंधित कारखाने, प्रक्रिया युनिट यांना कृषी दराने वीज मिळणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा इत्यादी आणि कृषीनुसार अल्पदराने विमा संरक्षणाचा लाभ मिळणार आहे.

# यूपीएससी परीक्षेत शक्ती दुबे देशात पहिला

## अर्चित डोंगरे देशात तिसरा

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोग २०२४ चा अंतिम निकाल



मंगळवारी जाहीर करण्यात आला. प्रयागराज येथील शक्ती दुबेने संपूर्ण भारतात अव्वल स्थान पटकावले आहे. हर्षिता गोयल दुसऱ्या स्थानावर आहे. तर महाराष्ट्रातील अर्चित डोंगरे याने तिसरा क्रमांक मिळविला. राज्यातील ५०हून अधिक उमेदवारांनी या परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. पहिल्या शंभर उमेदवारांमध्ये राज्यातील चार उमेदवारांचा समावेश आहे.शिवांश जगदे यांनी २६वा, विवेक शिंदे यांनी ९३वा, तेजस्वी देशपांडे यांनी ९९वा क्रमांक प्राप्त केला आहे.

यूपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल जाहीर केला. यूपीएससीतर्फे नागरी सेवा परीक्षा २०२४मधील लेखी परीक्षा सप्टेंबर २०२४मध्ये, तर मुलाखती जानेवारी ते एप्रिल २०२५या कालावधीत घेण्यात आल्या. त्यानंतर शिफारसपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. नागरी सेवा परीक्षा एकूण १ हजार १२९ पदांसाठी राबवण्यात आली. त्यात भारतीय प्रशासकीय सेवेच्या १८०, भारतीय परराष्ट्र सेवेच्या ५५, भारतीय पोलिस सेवेच्या १४७, केंद्रीय सेवा 'गट अ'च्या ६०५, तर 'गट ब'च्या १४२ जागांचा समावेश आहे. त्यातील ५० जागा दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असल्याची माहिती देण्यात आली आहे.



## दिंडोरी, सिन्नर, चांदवड, नाशिकच्या विद्यार्थ्यांची बाजी

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या



यूपीएससी नागरी सेवा परीक्षेत दिंडोरी येथील राजू नामदेव वाघ यांनी ८७१ रँक मिळवत बाजी मारली आहे. राजू वाघ यांचे प्राथमिक शिक्षण नवोदय विद्यालय खेडगाव येथे झाले तर एनआयटी नागपूरमधून बी.टेकची पदवी घेतली. त्यांनी कोअल इंडिया लिमिटेड येथे पाच वर्षे नोकरी केली. त्याचप्रमाणे सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडंट म्हणून नोकरी केली आहे. त्यांच्या पत्नी पौर्णिमा गावित एमपीएससी उत्तीर्ण असून, वर्धा येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत आहे. सिन्नर तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील अक्षय विलास पवार यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. अक्षय पवार यांनी सिन्नरमधील लोकनेते /-...४

### वक्फ कायद्याविरुद्ध मुस्लिम एकत्र


**नवी दिल्ली :** वक्फ सुधारणा कायद्याबाबत मुस्लिम संघटना आता पूर्णपणे 'करो या मरो' अशा स्थितीत आहेत. देशाच्या विविध भागात, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या नेतृत्वाखाली मुस्लिम संघटना एकत्रितपणे वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध आवाज उठवत आहेत. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये 'तहफुज-ए-औकाफ कारवां' (वक्फ संरक्षण) नावाचा एक मोठा कार्यक्रम आयोजित करत आहे. तालकटोरा स्टेडियममध्ये होणाऱ्या या निषेधात देशभरातील मुस्लिम संघटनांचे प्रतिनिधी तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील लोक सहभागी होतील. वक्फ कायद्याविरुद्ध दिल्लीत मुस्लिमांचा सर्वांत मोठा मेळावा होत आहे, ज्यामध्ये मुस्लिमांचा सर्वांत मोठा मिल्ली तंजीम एकत्र येत आहे.

# पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा दुर्दैवी मृत्यू

**वणी : प्रतिनिधी**

धरणातील पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे,

एकलहरे, ता. दिंडोरी शिवारातील एकलहरे धरणात सोमवार, ता. २१ रोजी दुपारच्या सुमारास धरणात पोहण्यासाठी सुनील



सुदाम ढुमसे (२४) रा. एकलहरे, ता. दिडोरी व उमेश रामदास बागूल (१२ वर्षे, रा. मुळाणे, ता. दिंडोरी) हे पोहण्यासाठी गेले असता एकाचा /-...४



# ई-पेमेंटला पसंती; पालिकेच्या तिजोरीत पंधरा कोटी

## ऑनलाइन प्रणालीमुळे मालमत्ताधारकांची २७ लाखांची बचत

**नाशिक : गोरख काळे**

शहराचा विस्तार गेल्या दहा वर्षांत कमालीचा वाढला आहे. चोहोबाजूंनी नवीन वसाहती निर्माण होत असून, तेथे रस्ते, वीज, पाणी या पायाभूत सुविधा महापालिका उपलब्ध करून देते. त्या बदल्यात या नव्या वसाहती महापालिकेच्या कराच्या कक्षेत आणून त्याद्वारे पालिकेला उत्पन्न भेटते. महापालिका प्रशासन मालमत्ता भरण्यासाठी ऑनलाइन प्रणालीचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. यास मालमत्ताधारकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल १५ कोटी ६० लाख ९१ हजारांचा भरणा ऑनलाइनद्वारे केला आहे.

३० हजार ६८६ नागरिकांनी ई-पेमेंटला पसंती देत ई-प्रणालीचा लाभ घेत व पालिकेने दोन टक्के सूट दिल्याने त्यातून २७ लाख १ हजार १९३ एवढी बचत झाली. महपालिका हद्दीत पाच लाख घरपट्टी व अडीच लाख पाणीपट्टीधारक आहेत. दरवर्षी महापालिकेला दोनशे कोटींहून अधिक महसूल दोन्ही करातून मिळतो. या रकमेतून शहरातील पायाभूत सुविधांवर खर्च केला जातो. एकप्रकारे नाशिककरांच्याच पैशातूनच विविध कामे केली जातात. नागरिकांनी ऑनलाइनद्वारे पेमेंट करावे, असे आवाहनदेखील पालिकेकडून केले जाते. ऑनलाइन पेमेंटमुळे सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नागरिकांना घरबसल्या मालमत्ता कर भरता येऊ शकतो. त्यामुळे विभागीय कार्यालयात जाऊन रांगेत उभे राहण्याच्या कटकटीतून सुटका होते. महापालिकेची सहा विभागीय कार्यालये असून, त्यासह इतर ठिकाणी कर भरणा केंद्र आहेत. प्रारंभी नागरिक घरपट्टी व पाणीपट्टी भरणा केंद्रात जाऊनच भरायची. मात्र, गेल्या काही वर्षांपासून ऑनलानचा पर्याय आल्याने ऑफलाइनला बाजूला केल्याचे दिसत आहे. स्मार्ट फोनमुळे मालमत्ताधारकांना पेमेंट भरण्याची सुविधा उपलब्ध करून /-...४

**ई-पेमेंट भरणाऱ्यांची विभागनिहाय आकडेवारी**

| विभाग | करधारकांची संख्या | भरलेली रक्कम |
|---|---|---|
| सातपूर | २६०५ | १कोटी ३० लाख ६१ हजार ६४ |
| नाशिक पश्चिम | ४१४१ | ३ कोटी ५१ लाख ५९ लाख ३५७ |
| नाशिक पूर्व | ५९८६ | ३ कोटी ३३ लाख ६ हजार २७६ |
| पंचवटी | ६६०० | २ कोटी ९८ लाख ६९ हजार ९३५ |
| नवीन नाशिक | ६७६९ | २ कोटी ९५ लाख ४९ हजार ६४३ |
| नाशिकरोड | ४५८५ | १ कोटी ८१ लाख १५ हजार ५२० |

### सौरऊर्जा वापरकर्त्यांसाठी पाच टक्के सवलत

महापालिकेने सौरऊर्जेचा वापर करणाऱ्यांना मालमत्ता करात पाच टक्के सूट दिली आहे. शहरात ३ हजार ७९९ नागरिकांना मालमत्ता कर भरताना पाच टक्के सूट मिळाली आहे. अपारंपरिक ऊर्जेच्या वापरास चालना मिळावी, याकरिता प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

# काँग्रेस नेते हुसेन दलवाई यांना दर्गा परिसरात जाण्यापासून रोखले

## पोलिसांकडून अटक व सुटका

**नाशिक : प्रतिनिधी**

काठेगल्लीतील सातपीर दर्गा येथील अतिक्रमण हटविल्यानंतर त्याची पाहणी करण्यासाठी नाशिकला आलेल्या काँग्रेस नेते माजी खासदार हुसेन दलवाई यांना पोलिसांनी तेथे जाण्यापासून रोखले. दर्गा भागात जाण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांना अटक करत नंतर त्यांची सुटका केली. मात्र, मी पुन्हा येथे येणार, अशी घोषणा त्यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

काल मंगळवारी (दि.२२) सकाळी अकराच्या सुमारास दलवाई हे नाशिकला आले. यानंतर त्यांनी स्थानिक नागरिकांशी काठेगल्ली, सातपीर दर्गा याबाबत माहिती घेतली. दुपारी पोलीस आयुक्तालयात जाऊन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याशी सुमारे तासभर चर्चा केली. यावेळी त्यांनी निर्दोष लोकांवर पोलिसांनी कारवाई करू नये, त्याचप्रमाणे ज्यांनी या प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला, त्यांना कडक शासन करण्याची मागणी केली. यानंतर दलवाई व त्यांच्यासमवेत काही कार्यकर्ते सातपीर बाबा येथील त्या घटनास्थळी भेट देण्यासाठी पखालरोड उस्मानिया चौकात दाखल झाल्यावर पोलिसांनी त्यांना रोखले, मात्र ते तिथे जाण्यावर ठाम राहिल्याने त्यांना ताब्यात घेऊन गंगापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. नंतर सुमारे दोन तासांनी त्यांची सुटका करण्यात आली.

## महत्त्वाचे



### हरणूल, हरसूलच्या शिवारात बछड्यांसह बिबट्याचा मुक्त संचार

**सोग्रस :** चांदवड तालुक्यातील हरणूल व हरसूलच्या शिवारात गेल्या चार ते पाच दिवसांपासून बछड्यांसह बिबट्याचा मुक्त संचार सुरू आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याला पकडण्यासाठी या परिसरात वनविभागाच्या वतीने दोन पिंजरे लावण्यात आले आहेत. चांदवड तालुक्यातील हरणूल व हरसूल परिसरातील डोंगरावर या परिसरातील नागरिकांना गेल्या चार ते पाच दिवसांपासून बिबट्याचे दर्शन होत आहे. यांसह बरोबर एक बिबट्या चांदवड तालुक्याच्या पूर्व भागातील सुतारखेडे शिवारात तसेच चांदवड तहसील कार्यालयाच्या पाठीमागील डोंगरात नागरिकांना आढळून आला आहे. शिकारीच्या तसेच तीव्र उन्हामुळे पाण्याच्या शोधात बिबटे फिरत असतात. मात्र, रात्रीच्या वेळी बिबटे मानवी वस्तीकडे येत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे. या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी वनविभागाकडे केली आहे. त्यामुळे वनविभागाने या बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी हरणूल व हरसूल गावच्या शिवारात दोन पिंजरे लावलेले आहेत.



### भाभा अणू संशोधन केंद्राला भेट

**चांदवड :** येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित स्व. सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी मुंबई येथील भाभा अणू संशोधन केंद्रास भेट देऊन परिवर्तनशील शैक्षणिक प्रवासाला सुरुवात केली. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रगती आणि तांत्रिक नवकल्पनांची सर्वसमावेशक माहिती प्रदान करणे हा आहे. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉन बीम अक्सिलरेटरच्या प्रत्यक्ष अनुप्रयोगांची माहिती देण्यात आली. इलेक्ट्रॉन बीम तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान तसेच त्याच्या औद्योगिक आणि संशोधन क्षेत्रातील उपयोगांविषयी सखोल माहिती देण्यात आली. या भेटीत विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉन बीम तंत्रज्ञानाच्या आधुनिक प्रणाली त्याच्या सखोल अभियांत्रिकी बाबी आणि संशोधनातील भूमिका याविषयी विशेष मार्गदर्शन घेतले. बीएआरसीच्या शास्त्रज्ञांनी याच्या डिझाइनविषयी तसेच त्याच्या व्यावहारिक आव्हानांबद्दल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर डिझाइनमधील महत्त्वाचे तांत्रिक पैलू त्याच्या स्थापनेतील विविध आव्हाने तसेच कार्यप्रणालीतील अडचणी आणि त्यावरील उपाययोजना याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

### ओझर परिसरात रुग्णांच्या संख्येत वाढ

**ओझर :** ओझरसह परिसरात सध्या सर्दी, खोकला, तापाच्या रुग्णांचे प्रमाण वाढले असून, सर्व दवाखान्यांत रुग्णांची गर्दी दिसून येत आहे. व्हायरल इन्फेक्शन किंवा हवामानातील बदलामुळे रुग्णांची संख्या वाढत असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ओझरमधील सर्व दवाखान्यांमध्ये सर्दी, खोकला, तापाचे तसेच जुलाब, उलट्यांच्या रुग्णांची औषधोपचार घेण्यासाठी गर्दी दिसून येत आहे. मोठ्या दवाखान्यात न्यूमोनिया, डायरियाचे रुग्ण औषधोपचार घेण्यासाठी दाखल आहे. व्हायरल इन्फ्केशन व हवामानातील बदल उन्हाचा तडाखा यामुळे सर्दी, खोकला, ताप, श्वासोच्छवास त्रास, छाती भरणे-घरघरणे, चक्कर, डोकेदुखी, जुलाब, उलट्या, न्यूमोनियाच्या रुग्णांची गर्दी सर्व दवाखाने व रुग्णालयांत आढळून येत आहे. घरात एकास सर्दी, ताप, खोकला झाल्यास घरातील इतरांनाही तो त्रास जाणवायला लागतो. परिणामी, 'व्हायरल' आजाराचे रुग्ण वाढत आहे. सर्दी, खोकला, ताप किंवा इतर काही त्रास होत असल्यास ताबडतोब डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावे, असे आवाहन डॉ. अशोक लड्ढा यांनी केले आहे.




### 'गोल्डन डेज'मध्ये फायर फायटिंग कार्यक्रम

**ओझर :** नागरी संरक्षण नाशिक ओझर विभागात फायर सेवा दिन आणि सप्ताह निमित्त ओझर, येथील गोल्डन डेज स्कूल येथे फायर फायटिंग आणि आग नियंत्रण जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. फायर सेवा दिन व सप्ताहानिमिताने गोल्डन डेज सकूलमध्ये झालेल्या कार्यक्रमात नागरी संरक्षणचे विभागीय क्षेत्ररक्षक रामसिंग बागुल यांनी फायर फायटिंग व आग नियंत्रण या विषयावर विद्यार्थी व शिक्षकांना सविस्तर माहिती दिली तसेच फायर इन्स्टॉलेशन केलेल्या यंत्रणेविषयी जनजागृती करत शाळेतील विद्यार्थ्यांना अग्निशमन यंत्राबाबत माहिती दिली व आग लागल्यानंतर काय करायचे किंवा आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाची काळजी या विषयी प्रात्यक्षिके करून दाखवली. यावेळी स्वयंसेवक नितीन शिरसाट, साक्षी बनकर, श्याम माळेकर, मंगेश बोरसे, वर्षा भुराडे, भूमिका चौधरी व वैष्णवी जाधव तसेच नगर परिषदेचे ओझर विभाग अग्निशमन केंद्रप्रमुख राहुल शेलार व त्यांची टीम, तसेच गोल्डन डेज स्कूलचे प्रशासकीय अधिकारी सुनील साळवे, शाळेच्या मुख्याध्यापिका के. श्रीदेवी व शिक्षकवृंदांसह २५० विद्यार्थी उपस्थित होते.

### नालंदाकडून भुसारे यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार

**सुरगाणा :** सुरगाणा तालुक्यातील बिवळ येथील सरपंच हेमलता भुसारे यांना नालंदा ऑर्गनायझेशन संस्थेकडून विविध क्षेत्रांतील कार्य करणाऱ्या मान्यवरांचे महाराष्ट्ररत्न सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित सेवा देणाऱ्या लोकनियुक्त सरपंच हेमलता भुसारे यांचा पुण्यातील पत्रकार भवनात सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# 'सीटू'चा तहसील कार्यालयावर मोर्चा

## इगतपुरीत शेतकरी, कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन

**इगतपुरी : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकरी व कामगारांच्या विविध समस्या कायम असून, गेली १० वर्षांत सत्तेत असलेले भाजप-युती सरकारने नागरिकांच्या समस्या सोडविण्याऐवजी त्यात मोठ्या प्रमाणात वाढ निर्माण केली असून, सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे.

अनेकदा निवेदने, आंदोलन करूनही सरकार प्रलंबित प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरत असल्याच्या निषेधार्थ सीटूच्या वतीने जिल्हा सचिव देवीदास आडोळे यांच्या नेतृत्वात इगतपुरी तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले.

तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक व शेतकरी, कामगार मोठ्या प्रमाणात विविध कामांसाठी शासकीय कार्यालयांत चकरा मारतात, मात्र एकही काम होत नाही. त्यात नागरिकांचा वेळ व आर्थिक नुकसान होते, मनस्ताप होतो. शासकीय कर्मचारी दलालांमार्फत आर्थिक देवाणघेवाण करून नागरिकांची लूट केली जाते.




यात शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. यांसह विविध मागण्यांबाबत निदर्शने करीत आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी निवासी नायब तहसीलदार धनंजय लचके यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सीटूचे जिल्हा नेते सीताराम ठोंबरे, जिल्हा सचिव देवीदास आडोळे, आप्पासाहेब भोले, सुनील मालुंजकर, दत्ता राक्षे, चंद्रकांत लाखे, रामदास चारोस्कर, सुरेश कोरडे, रुंजा वाघ, शिवराम बांबळे, किशोर कडू, विशाल घोटे, चेंडू भरीत, त्र्यंबक खाडे, निवृत्ती कडू, बबाबाई लहांगे, जयाबाई घाटाळ, संध्या जोशी, शकुंतला तळपाडे, विश्वास दुभाषे, मच्छिंद्र गतीर, संदीप कातोरे, गोकुळ गोवर्धने, राहुल गायखे, हिरामण भोर, अशोक राव, अशोक कदम, तुकाराम मते, काळू मुकणे, भगवान वाघ, भाऊसाहेब जाधव, विठ्ठल बर्वे, ज्ञानेश्वर गतीर, तुकाराम भगत, संतोष कुलकर्णी आदींसह तालुक्यातील शेतकरी, कामगार मोर्चात सहभागी झाले होते.

**मोर्चातील मागण्या**

जनसुरक्षा विधेयक रद्द करा. कामगार व शेतकरीविरोधी चार श्रम संहिता कायदा मागे घ्या. तालुक्यातील कातकरी व आदिवासी समाजासाठी मंजूर घरकुलांना वनविभाग गायचरणातून जागा देऊन घरकुले बांधून मिळावी. मुंडेगाव येथील रेल्वेपुलाखाली बंद रस्ता काम पूर्ण करा. १४ प्रलंबित विषयांबाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



## गुन्ह्यातील जमा वाहने घेऊन जाण्याचे नागरिकांना आवाहन

**ओझर : वार्ताहर**

ओझर पोलीस ठाणे आवारात अनेक वर्षांपासून विविध गुन्ह्यांत तसेच अपघातात जप्त केलेली बेवारस दुचाकी, चारचाकी वाहने बकाल अवस्थेत पडून आहेत.

सदरील वाहनमालक-चालक यांनी मूळ कागदपत्र दाखवून ओळख पटवून ही वाहने घेऊन जावीत, अन्यथा या वाहनांचा लिलाव केला जाईल, असे आवाहन पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलिस उपअधीक्षक अद्विता शिंदे यांनी केले आहे. मागील काही वर्षांपासून विविध कंपन्यांच्या मोटारसायकल व चारचाकी वाहने अभिलेखावरील गुन्ह्यातील तसेच बेवारस जप्त धूळखात आहेत. सदर मोटारसायकल व चारचाकी वाहने ताब्यात घेण्यासाठी कोणीही मालक अद्याप आलेले नाहीत. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने तसेच वाहनांचे मूळ मालक मिळून येत नसल्याने वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. आवारात वाहनांमुळे सुशोभीकरणासही अडथळा येत आहे. ज्या नागरिकांची मोटारसायकल, चारचाकी वाहन ओझर पोलीस स्टेशन येथील अभिलेखावरील, गुन्ह्यातील तसेच बेवारस जप्त आहेत, त्या वाहनांची खात्री करून मूळ कागदपत्रांसह ओझर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा; अन्यथा वाहनाच्या लिलावाची कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन ओझर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी परि पोलिस उपअधीक्षक अद्विता शिंदे यांनी केले आहे.

## उपचार न मिळाल्याने अर्भक दगावले

### डॉक्टरांवर कारवाईची मागणी

**दिंडोरी / सुरगाणा : वार्ताहर**

तालुक्यातील उंबरठाण प्राथमिक आरोग्य केंद्रात योग्य उपचार न मिळाल्याने जन्मजात अर्भकास प्राणास मुकावे लागले.

जामुनपाडा येथील रहिवासी मीना सुनील चौधरीस शनिवारी (दि. १९) प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. परंतु, डॉ. राकेश सोनवणे यांनी दोन तास उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी सुरगाणा ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिकेतून हलवण्यास सांगितले. उंबरठाणपासून ५ किलोमीटरवर वाहनातच महिलेची प्रसूती झाली.

रुग्णवाहिकेत डॉक्टर नसल्याने नवजात बाळावर योग्य उपचार झाले नसल्याने बाळ दगावले. रुग्णवाहिकेत नवीन भरती करण्यात आलेल्या दोन नर्स असल्याने त्या योग्य उपचार करू शकल्या नाही.

बाळाच्या मृत्यूस उंबरठाण येथील डॉ. राकेश सोनवणे जबाबदार आहेत, असा आरोप महिलेच्या नातेवाइकांनी केला. संबंधित विभागाने डॉक्टरांवर कारवाई करावी, अशी नातेवाइकांनी मागणी केली आहे.

> आम्हाला अगोदरच सुरगाणा रुग्णालयात गर्भवतीस घेऊन जा असे सांगितले असते तर आम्ही घेऊन गेलो असतो. तीन तास उपचार केल्यानंतर बाळंतपणाच्या वेळेस डॉक्टरांनी सुरगाणा रुग्णालयास नेण्यास सांगणे हे योग्य नाही. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे माझे बाळ दगावले आहे. त्यामुळे संबंधित डॉक्टरवर कारवाई करावी.
>
> – **सुनील चौधरी,** जामुनपाडा

## निर्यातशुल्क वेळेत रद्द न केल्याने कांद्याचे भाव पडले

### माजी खासदार शेट्टी : योग्य वेळी पाऊल उचलणे आवश्यक होते

**लासलगाव : वार्ताहर**

सध्या कांद्याला जो भाव मिळतोय तो कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भरून निघेल एवढासुद्धा मिळत नाही. कांदा निर्यातशुल्क वेळेवर रद्द न केल्याने कांद्याचे बाजारभाव पडले ही सरकारची जबाबदारी आहे. अर्थात सरकारला योग्य वेळी पाऊले उचलणे आवश्यक होते, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी लासलगाव येथे केली.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी हे नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले असताना सोमवारी (दि. २१) त्यांनी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसोबत लासलगाव बाजार समितीला भेट देऊन कांदा उत्पादक शेतकरी व व्यापारी बांधवाशी संवाद साधला. घसरत्या कांद्याच्या भावासंदर्भात चर्चा केली.




यावेळी लासलगाव बाजार समिती, व्यापारी, शेतकरी यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप, उपसभापती ललित दरेकर, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, संचालक छबूराव जाधव, प्रवीण कदम, सचिव नरेंद्र वाढवणे, व्यापारी मनोज जैन यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृती गारे, संदीप जगताप, कृष्णा घुमरे, अनिता कोल्हे, आत्माराम पगार, गजानन घोटेकर, मच्छिंद्र जाधव, विलास दरगुडे, बाबासाहेब पगार व कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, केंद्र सरकारने निर्यातशुल्क आधीच हटवले असते तर निश्चितच कांद्याचे बाजारभाव दोन हजार रुपयांच्या पुढे गेले असते. दोन-तीन महिन्यांपूर्वीच अंदाज आला होता की, यावर्षी मध्य प्रदेश व महाराष्ट्रामध्ये कांद्याचे उत्पादन वाढले. गरजेपेक्षा कांद्याचा पुरवठा जास्त होतो म्हटल्यानंतर त्याची पर्यायी व्यवस्था करणे हे सरकारचं काम आहे. नाशवंत शेतमालासाठी हमीभाव कायदा मी सरकारच्या मानगुटीवर बसून मंजूर करून घेणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. नाफेडमार्फत होणाऱ्या खरेदीवर आमचा भरवसा नसल्याचेही त्यांनी सांगितले. नाफेडने योग्य अशा सहकारी संस्थांमार्फत प्रत्यक्ष बाजार समितीत उतरून कांदा खरेदी करावा, जेणेकरून स्पर्धा निर्माण होऊन कांद्याचे बाजारभाव वाढतील व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल, अशी मागणी शेट्टी यांनी यावेळी केली.

तसेच लवकरच आम्ही दिल्लीच्या नाफेडच्या कार्यालयावर आंदोलन करणार असल्याचा इशारा शेट्टी यांनी दिला. दरम्यान, राजू शेट्टी यांनी लासलगाव बाजार समितीच्या कांदा लिलाव आवारात भेट देऊन लिलाव प्रक्रिये संदर्भात माहिती जाणून घेतली यावेळी कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी व बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

## महावितरणच्या डिजिटल ग्राहक योजनांचे विजेते जाहीर

**लासलगाव : वार्ताहर**

महावितरण कंपनीच्या लकी डिजिटल ग्राहक या नवीन योजनेच्या माध्यमातून सलग तीन महिने ऑनलाइन पद्धतीने वीजबिल भरणा करणाऱ्या ग्राहकांमधून लकी ड्रॉ पद्धतीने ग्राहकांची निवड करण्यात आली.चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता केशव काळूमाळी यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाच्या व द्वितीय क्रमांकाच्या ग्राहकास स्मार्टफोन तसेच पुढील क्रमांकाच्या ग्राहकांसाठी स्मार्ट वॉच हे बक्षीस वितरित करण्यात आले.

ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्याने ही योजना यशस्वी ठरली. या योजनेतून लासलगाव उपविभागांतर्गत पुढीलप्रमाणे विजेते निवडण्यात आले आहेत. शोभा शिंदे (खडकमाळेगाव), नरहरी गांगुर्डे (कोटमगाव), पंकज गुलाबराव सुर्वे-जगदंबा रिपॉवरिंग मंगेश सांगळे (विंचूर), कचरू महाले (डोंगरगाव) हे स्मार्ट वॉचचे विजेते ठरले आहेत. या विजेत्यांना मोबाइल फोन, स्मार्ट वॉच आणि ५००० रुपयांहून अधिक किमतीची बक्षिसे प्रदान करण्यात आली. महावितरणने ग्राहकांना डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना आणली होती. विजेते ठरवण्यासाठी पारदर्शक लकी ड्रॉ पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता.

याप्रसंगी चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता केशव काळूमाळी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनील रहिंज, लासलगाव उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता ज्ञानेश बागुल, निफाड उपविभागाचे नीलेश नागरे, चांदवड उपविभागाचे तुषार सूर्यवंशी, पिंपळगाव उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता उमेश पाटील होते.

## दिंडोरी मंडल अध्यक्षपदी मुरकुटे, वणी मंडल अध्यक्षपदी कावळे

**दिंडोरी : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या दिंडोरी मंडल अध्यक्षपदी श्यामराव मुरकुटे यांची फेरनिवड करण्यात आली असून, त्याचप्रमाणे वणी मंडल अध्यक्षपदी वसंतराव कावळे, ननाशी मंडल अध्यक्षपदी योगेश मातेरे यांची तर पेठ मंडल अध्यक्षपदी पंकज पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या बैठकीत हा निर्णय झाला असून, याबाबतचे पत्र दिंडोरी निवडणूक निरीक्षक सीमा झोले यांनी दिले. श्यामराव मुरकुटे यांनी दिंडोरी मंडलाची चांगली जबाबदारी सांभाळली होती. पुन्हा त्यांची फेरनिवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे निवडीबद्दल माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, जिल्हाध्यक्ष प्रा. सुनील बच्छाव, जिल्हा पक्षनिरीक्षक गिरीश पालवे, निवडणूक निरीक्षक सीमा



झोले, शिवाजी पिंगळ, चंद्रकांत राजे, प्रमोद देशमुख, विवेक कुलकर्णी, श्याम बोडके, मनीषा बोडके, रणजित देशमुख, तुषार वाघमारे, राम कराटे, संपत पिंगळ, कैलास धात्रक, काका वडजे, उज्ज्वला कोथळे, संध्या निरघुडे, नीता भामरे, मंगला गायकवाड, अरुणा देशमुख, प्रज्ञा वाघमारे, आशा कराटे, तुषार घोरपडे, शरद मालसाने, रमेश क्षीरसागर, गोविंद बोडके, मित्रानंद जाधव, संजय कदम, राजेंद्र शिंदे, विजय कापसे, अमोल खोंडे, भास्कर गवळी, दिगंबर ढाकणे, गणेश गवळी, नीलेश खोंडे, योगेश गायकवाड, विशाल जाधव, गोकुळ जाधव, शांताराम जाधव, संपत पिंगळ, सागर गटकळ, बाळासाहेब सोनवणे, रोहिदास पाटील, अरुण धात्रक आदींसह भाजप कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# विरोधकांपेक्षा कामगारांना 'आपले'पणा भावला!

## एचएएल कामगार संघटना निवडणुकीत सत्ता अबाधित

**ओझर : बाळासाहेब वाघ**

एचएएल कामगार संघटनेच्या ३१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सताधारी गटाच्या श्री आपला जागृती पॅनलच्या नेत्यांसह संघटनेने गेल्या सव्वातीन वर्षांत कामगार हिताची केलेली कामे व आगामी वेतनकरार या मुद्द्यावर श्री आपला जागृती पॅनलने तब्बल २८ जागा मिळवत सत्ता पुन्हा ताब्यात ठेवण्यात यश मिळविले. विरोधी गटाच्या श्री श्रमशक्ती पॅनलच्या नेत्यांनी २०१७ मध्ये केलेला वेतनकरार हा कामगारांसाठी नुकसानकारक ठरला. त्याचाच परिणाम म्हणून श्री श्रमशक्ती पॅनलला फक्त तीनच जागांवर समाधान मानावे लागले.

कामगार संघटनेचे सरचिटणीस संजय कुटे, अध्यक्ष अनिल मंडलिक यांनी गेल्या निवडणुकीत कामगारांना दिलेल्या आश्वासनांची तीन वर्षांच्या कालावधीत पूर्तता केली. त्यामध्ये कामगारांच्या तर डिव्हिजनला झालेल्या बदल्यांवर अतिशय प्रभावीपणे काम करून बदली झालेले कामगार नाशिक विभागात परत आणले.



टीमवर्कने ट्रान्सफर, आश्रित पालकांसाठी असलेली वैद्यकीय सुविधांबाबत वेळोवेळी व्यवस्थापनाबरोबर यशस्वीपणे चर्चा करून लाभ मिळवून दिला. प्रलंबित घरभाडे भत्ता या महत्त्वाच्या प्रश्नांवर यशस्वी मात करून केलेला कामगारांचा फायदा ब्रँडेड प्रॉडक्शन गिफ्ट स्केल ११ कामगारांचे इन्क्रिमेंट यासारखे प्रश्न सोडवले. यामुळे पॅनलवर कामगारांचा विश्वास बसला. प्रचारादरम्यान झालेल्या चौक तसेच प्रचारसभा व कामगार मेळाव्यातून तीन वर्षांत केलेल्या कामांवर आणि भविष्यातील धोरणांवर मुद्देसूद सकारात्मक भाष्य करून प्रचारावर भर दिल्याने कामगारांचा विश्वास संपादन करण्यात यश आले. त्याचप्रमाणे २०२७ मध्ये होणारा वेतनकरार, एचएएल कंपनी महारत्न कंपनी झाली आहे. त्याचे फायदे मिळवून देणे, इन्सेंटिव्ह पॉलिसीमधून कामगारांना आर्थिक वाढ मिळवून देण्याच्या आश्वासनावरही भर देण्यात आला.

संपूर्ण प्रचाराच्या दरम्यान २०२७ च्या वेतनकरारावर कुठलेही भाष्य न करता या मुद्याला जाणीवपूर्वक बगल देण्याचा झालेला प्रयत्न, २०१७ च्या वेतनकरारात कामगारांचे आर्थिक नुकसान झाल्याने २०२७ साली होऊ घातलेला वेतनकरार हा मुद्दा या निवडणुकीत केंद्रस्थानी होता.

**विरोधकांच्या पराभवाची कारणे**

श्री श्रमशक्तीचे नेते माजी सरचिटणीस सचिन ढोमसे व कामगार संघटनेने २०१७ ला झालेल्या वेतनवाढीचा करार दहा वर्षांचा केला. या करारात त्यांच्या हातून झालेल्या कामगारांच्या आर्थिक नुकसानीची पुनरावृत्ती होण्याची कामगारांमध्ये भीती असल्याने तसेच निवडणुकीत झालेल्या महत्त्वाच्या अशा प्रचारसभेत भविष्यातील ध्येयधोरणांवर कसलीही मांडणी न करता भाषणाचा संपूर्ण भर हा केवळ सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्यावरच दिल्याने मतदारांमध्ये तीव्र नाराजीची भावना होती.

## महत्त्वाचे

### यवतमाळमधील आदिबा अहमद बनेल महाराष्ट्रातील पहिली मुस्लिम महिला आयएएस

**यवतमाळ :** केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल (२०२४)



आयोगाच्या अधिकृत वेबसाइटवर upsc.gov.in जाहीर करण्यात आला आहे. देशात अतिशय प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मुलींनी बाजी मारल्याचं दिसत आहे. देशात शक्ती दुबे यांनी अव्वल स्थान पटकावले. तर दुसऱ्या क्रमांकावर हर्षिता गोयल आहे. महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे पुण्यातील अर्चित डोंगरे देशात तिसरा आला. तर आदिबा अहमद महाराष्ट्रातून पहिली मुस्लिम महिला आयएएस बनण्याची शक्यता आहे. आदिबाने भारतातून १४२ वी रँक प्राप्त केली आहे. आदिबा अनम अश्फाक अहमद यवतमाळ जिल्ह्यातील रहिवाशी आहे. यापूर्वी आदिबाने मुलाखत दिली होती पण तिची अंतिम निवड झाली नव्हती. परंतु या प्रयत्नात तिची अंतिम यादीत निवड झालेली आहे आणि तिची १४२ वी रँक असल्याने तिला आयएएस पोस्ट मिळण्याची दाट शक्यता आहे. आदिबाचे हे यश जिल्ह्यातील मुलींना प्रेरणादायी आहे.

### ठाकरे यांच्यासमवेत कोणतीही चर्चा नाही : पवार

**पुणे :** ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत मला काही माहिती नाही. हा त्यांचा कौटुंबिक विषय आहे, असे जेष्ठ नेते शरद पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. बारामती येथे प्रसारमाध्यमाशी ते बोलत होते. ते म्हणाले, ठाकरे यांच्यासमवेत कोणतीही चर्चा झाली नाही. त्यामुळे याबाबत भाष्य करता येणार नाही. पवार कुटुंबीयांच्या मनोमिलनाबाबत ते म्हणाले की, जनतेच्या विविध प्रश्नांबाबत एकत्र येऊन चर्चा करावी लागते. उसाच्या प्रश्नांवर गेली अनेक वर्षे एकत्र काम करीत आहे. आणि विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सरकारला सहभागी करून घ्यावे लागते. त्यामध्ये वावगे असे काही नाही, असे त्यांनी सांगितले.

# त्र्यंबकला साधूच्या वेशातील व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू

## नशेबाजांनी खून केल्याचा संशय; चौकशीची मागणी

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

येथे एका भगवे कपडे घातलेल्या साधूचा संशयास्पद मृत्यू झाल्याने त्र्यंबकनगरी हादरली आहे. येथील साधू -महंत याबाबत आक्रमक झाले असून, याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. नशेबाजांनी ही हत्या केल्याचा संशय असून, तशा प्रकारचे सी.सी.टी.व्ही. फुटेज व्हायरल झाले आहे.

त्र्यंबकेश्वरच्या प्रवेशद्वारी स्वामी समर्थ गुरुपीठ कमानीजवळ सकाळच्या वेळेस एका साधूचा मृतदेह आढळून आला. याबाबत त्र्यंबक पोलिसांनी खबर मिळाल्यानंतर त्याचा पंचनामा केला असता मयताजवळ आढळलेल्या आधार कार्डच्या मदतीने ती व्यक्ती प्रभाकर सदाशिव घोटे, वय ५२ वर्ष, रा. पिंपळगाव डुकरा, ता. इगतपुरी असल्याचे निष्पन्न झाले. त्र्यंबक पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.



मृतदेह नाशिक जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.

दरम्यान याबाबत त्र्यंबकेश्वरच्या साधू-महंतांना येथे एका भगव्या वस्त्रधारी साधूचा मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळाल्याने आनंद आखाड्याचे अध्यक्ष महंत शंकरानंद सरस्वती महाराज, निरंजनी आखाड्याचे ठाणापती महंत धनंजय गिरी महाराज, अग्नी आखाड्याचे ठाणापती दुर्गानंद ब्रह्मचारी यांच्यासह आणखी काही साधूंनी त्र्यंबक पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत माहिती घेतली. त्यानंतर घटनास्थळावर जाऊन तेथील सी. सी. टी. व्ही. फुटेज तपासले असता त्यामध्ये रविवारच्या रात्री एका साधूबरोबर एक युवक झटापट करत असल्याचा आणि दुसरा आणखी एक त्या ठिकाणी हजर असल्याचे दिसून आले. त्यानंतर सर्व साधू-महंतांनी पोलिसांकडे याबाबत सखोल चौकशीची मागणी केली. दरम्यान, प्रभाकर घोटे हे कागदोपत्री नाव असलेली व्यक्ती साधू आहे. येथील स्वामी समर्थ कमानीच्या परिसरात मागच्या काही वर्षांपासून राहत होते.

उन्हाळा असल्याने तंबूची मच्छरदाणी लावून रस्त्याच्या कडेला झोपत होते. जवळच वाहेगुरू लंगर चालतो. तेथे दोन वेळेचे जेवण मिळत असते. तेथे आखाड्याशी संबंधित नसलेले साधू जेवण करतात आणि जवळपास वास्तव्य करतात. नशेबाजांचा उपद्रव वाढला आहे. त्यांना आवर घालण्याची मागणी शहरात होत आहे.

> त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरात दारू विक्री बंद करावी, नशा करणारे लोक साधूंना व यात्रेकरूंना त्रास देतात. त्यांची लुबाडणूक करतात. याकडे पोलिसांनी गांभीर्याने लक्ष देऊन प्रतिबंधात्मक कारवाई करावी.
>
> **– महंत शंकरानंद सरस्वती महाराज, आनंद आखाडा**

> त्र्यंबकेश्वर येथे साधूची हत्या होणे ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. याचा निषेध करतो तसेच या घटनेची सखोल चौकशी करावी व दोषींना कडक शासन करावे.
>
> **–सुरेश गंगापुत्र, अध्यक्ष, सिंहस्थ नागरी समिती त्र्यंबकेश्वर**



# गुन्हेगारी मानसशास्त्र आणि वास्तवाचे दर्शन घडवणारे पुस्तक

## 'गुन्ह्याच्या पाऊलखुणा'चे प्रकाशन

**मुंबई :** ''गुन्ह्याच्या पाऊलखुणा'' या बहुचर्चित पुस्तकाचे प्रकाशन आज डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म यांच्या हस्ते मंत्रालय, मुंबई येथे झाले.

या पुस्तकाचे लेखन सुप्रसिद्ध लेखक व विचारवंत अच्युत गोडबोले आणि नाशिकचे न्यायालयीन दस्तऐवज तज्ज्ञ व ग्राफॉलॉजिस्ट परेश चिटणीस यांनी संयुक्तपणे केले आहे.पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ध्यास बुकस्टोअर्सचे संचालक . चेतनराम शेवाळे,. महेश शेवाळे उपजिल्हाधिकारी ''गुन्ह्याच्या पाऊलखुणा'' हे पुस्तक केवळ गुन्ह्यांच्या कहाण्या सांगत नाही, तर त्यांच्या मागील मानसशास्त्रीय, सामाजिक आणि वैज्ञानिक पैलूंवर प्रकाश टाकते. अच्युत गोडबोले यांच्या ओघवत्या शैलीत आणि परेश चिटणीस यांच्या फॉरेन्सिक व मानसशास्त्रीय अभ्यासाच्या आधारावर लिहिलेले हे पुस्तक वाचकांना गुन्हेगारीच्या खोल पातळीवर विचार करायला लावते. यावेळी बोलताना डॉ. पंकज भोयर यांनी सरकारद्वारे सुरू करण्यात आलेल्या फॉरेन्सिक व्हॅन उपक्रमाचा विशेष उल्लेख केला. ''गुन्हेगारीच्या तपासात घटनास्थळीच शास्त्रीय पद्धतीने पुरावे संकलित करणे हे अत्यंत आवश्यक आहे, आणि फॉरेन्सिक व्हॅन्समुळे हे आता शक्य झाले आहे,'' असे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे तपासाची गुणवत्ता व परिणामकारकता मोठ्या प्रमाणात वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# फरार सावकार मुन्ना राणेच्या मुसक्या अंबड पोलिसांनी आवळल्या

## तीन गंभीर तक्रारींच्या आधारे अटक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



खंडणी व अवैध सावकारीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाँटेड असलेला अंबड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खुटवडनगर येथे राहणाऱ्या कुख्यात सावकार विवेक ऊर्फ मुन्ना राणे याला अखेर अंबड पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा शिताफीने पाथर्डी फाटा परिसरातून ताब्यात घेतले. चार-पाच दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत फरार असलेला हा आरोपी अंबड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या तीन गंभीर तक्रारींच्या आधारे अखेर गजाआड केला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खुटवडनगर येथील खासगी सावकारी करणारा विवेक उर्फ मुन्ना राणे याच्याविरोधात गेल्या आठवड्यात अमोल आहेर नावाच्या फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी अमोल आहेर याने आर्थिक अडचणीत सापडल्याने त्याने सुमारे १ लाख पन्नास हजार रुपये खासगी सावकार मुन्ना राणे याच्याकडून घेतल्यानंतर दोनच दिवसांत त्याने ३० हजार रुपये व्याजासह परत केले. तरीही आरोपीने आणखी एक लाख रुपयांची खंडणी मागून धमकी दिली होती. तर दुसऱ्या घटनेत एका रुग्णासाठी घेतलेले ७० हजार रुपयांचे कर्ज आणि त्याविरोधात गहाण ठेवलेली 'छोटा हत्ती' गाडी आठ महिन्यांपासून गहाण ठेवली होती. त्यानंतर खासगी सावकार मुन्ना राणे याला व्याजासह पूर्ण रक्कम परत करूनही तो तक्रारदारला पोलिसांची भीती दाखवून अव्वाच्या सव्वा रक्कम मागितली परंतु तक्रारदाराची आर्थिक परिस्थिती नसतानाही त्यांनी हात उसने पैसे घेऊन खासगी सावकार मुन्ना राणेला रक्कम परत करूनही तो छोटा हत्ती परत न केल्याचे प्रकरण. तसेच तिसरी तक्रार : आर्थिक अडचणीत सापडलेल्या तरुणाने इनोव्हा कार गहाण ठेवून चार लाख रुपये घेतले. मुद्दल व व्याज दिल्यानंतरही सावकाराने कार परस्पर गायब केली आणि धमक्या दिल्या. याप्रकरणी खासगी सावकारी करणारा विवेक उर्फ मुन्ना राणे याच्या विरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावरून फरार असलेला खासगी सावकारी करणारा संशयित आरोपी मुन्ना राणेच्या अंबड पोलिसांनी पाथर्डी फाटा परिसरातून मुसक्या आवळल्या असून, त्याला अंबड पोलिस ठाण्यात हजर केले आहे. या तिन्ही तक्रारी अंबड पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचा वेग वाढवण्यात आला. दरम्यान, पीडितांना धमकावल्याची माहिती पोलीस मुख्यालयापर्यंत पोहोचली होती. त्यानंतर केवळ चार तासांत पोलिसांनी आरोपीचा शोध लावून त्याला अटक केली. याप्रकरणी पुढील तपास अंबड पोलीस करीत असून, आरोपीविरोधात सावकारी, खंडणी, फसवणूक आणि धमकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

> वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने संयम आणि चतुराईने ही कारवाई केली. आरोपीच्या अटकेने सिडकोसह उपनगरात अवैध सावकारांच्या गटात चांगलीच खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मुन्ना राणेविरुद्ध आणखी अनेक तक्रारी येण्याची शक्यता असून, ग्रामीण भागातीलही अनेक पीडित पुढे येऊ शकतात.

### हॉर्न वाजवला म्हणून जोडप्याला मारहाण

**पुणे :** विद्येचं माहेरघर असणाऱ्या पुण्यात गुन्हेगारीचं क्षेत्र वाढतं चाललं आहे. दररोज कोणत्या ना कोणत्या गुन्हेगारी क्षेत्रातल्या घडामोडी समोर येत आहेत. त्यातूनही तरूण मुलांची टोळकी जास्तकरून पाहायला मिळते आहे. यावेळी असाच एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या दुचाकीस्वारांनी एका जोडप्याच्या गाडीवर हल्ला केला. पुण्यात भररस्त्यात मद्यधुंद अवस्थेत फिरणाऱ्या टवाळखोरांनी एका दांपत्यावर हल्ला केला आहे. दारूच्या नशेत दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी या दांपत्याची वाट अडवली. कोणालाही पुढे जाऊ न देता रस्त्याच्या मध्यभागाहून मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होते. मागून येणाऱ्या या दांपत्यांनी हॉर्न वाजवून गाडी बाजूला घेण्यास सांगितले. मात्र या दांपत्याने हॉर्न वाजवल्यामुळे नशेत असलेल्या तरुणांनी गाडीवरून उतरून या जोडप्यावर हल्ला केला.

# राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांच्या रथयात्रेचे आज स्वागत

**पंचवटी : वार्ताहर**

मराठा सेवा संघ संचलित राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांच्या रथयात्रेचे आडगावात आगमन होणार असून, आज बुधवार दि.२३ रोजी सांय ५ वाजता आडगावकरांतर्फे रथयात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. तसेच पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सुनील बागुल, अद्वय हिरे, जयंत दिंडे, गजानन शेलार, राजू लवटे, करण गायकर आदी उपस्थित राहणार आहेत. शिवभक्तांनी व आडगाव ग्रामस्थ मित्रपरिवार यांनी मारूती मंदिर, शिवस्मारक आडगाव बस स्टँड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन बालाजी माळोदे, सुनील जाधव, अतुल मते, प्रभाकर माळोदे, उमेश शिंदे, पोपट शिंदे, संदीप लभडे, शेखर लभडे, गोकुळ मते, रवींद्र जाधव, अ‍ॅड. प्रकाश शिंदे, अभय माळोदे, सुदाम दुशिंग, गोरख लभडे आदींनी केले आहे.


## टायटल व्हेरीफिकेशन नोटीस

तमाम नागरीकांना या टायटल व्हेरीफिकेशन जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा नाशिक, **तालुका नांदगांव** पैकी **मौजे मनमाड** नगरपरिषद हद्दीतील **मनमाड मालेगांव रोड** येथील ....

**१) सर्व्हे नं.३६७/१/ब** यातील **क्षेत्र २१०-०० चौ.मी.** यांसी आकार ०३=०० पैसे, यांसी **चतु:सिमा :-** पुर्वेस- मिळकतीचा वापर व त्यापुढे मनमाड मालेगांव रस्ता, पश्चिमेस- स.नं.३७०/१७ प्लॉट नं.६ यातील नईम बशीर खान व सैय्यद समीर सैय्यद नजीर यांचे सोनामोती नावाने ओळखली जाणारी इमारत, दक्षिणेस- मनमाड मालेगांव रोडला जोडणारा कॉलनी रोड, उत्तरेस- संजयकुमार पोपटलाल बेदमुथा यांची मिळकत.

**२) सर्व्हे नं.३७०/१७ प्लॉट नं.६** यातील दक्षिण दिशेकडील क्षेत्र १९२-५० चौ.मी. यांसी आकार २३३=३० पैसे, यांसी **चतु:सिमा :-** पुर्वेस- स.नं.३६७/१/ब पैकी मिळकत, पश्चिमेस- स.नं.३७०/१७ या लेआऊटचा ओपन स्पेस, दक्षिणेस- मनमाड मालेगांव रोडला जोडणारा कॉलनी रोड, उत्तरेस- संजयकुमार पोपटलाल बेदमुथा यांचे प्लॉट नंबर ६ मधील शिल्लक क्षेत्र.

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक असलेल्या मिळकती हक्कासह मात्र, मिळकतीच्या चतु:सिमा मंजुर वापर वागवहिवीचे सर्व हक्क व तदंगभुत वस्तुसह असलेल्या मिळकती या नोटीसीचा मुख्य विषय आहे. वर नमूद केलेल्या दोन्ही मिळकती **श्री.नईम बशीर खान व श्री.सैय्यद समीर सैय्यद नजीर**, रा.मनमाड, ता.नांदगांव यांचे स्वतंत्र मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आहेत. त्यांनी सदरील मिळकती निर्वेध, निर्वीवाद, बोजाविरहीत व हस्तांतरण योग्य आहेत, असे सांगून आमचे अशिलांना कायम खरेदीने देण्याचा सौदा केला आहे. तथापी, सदर मिळकती कोणाकडे लिन, लिज, तारण, गहाण, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, भाडेपट्टा, साठेखत करार,सौदा पावती अथवा अन्य कोणत्याही कराराने असल्यास अथवा या मिळकतींवर कोणत्याही बँकेचा, पतसंस्थेचा अथवा वित्तीय संस्थेचा बोजा, हितसंबंध, हक्क, अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७ दिवसांचे आत** त्यांची लेखी हरकत सर्व पुराव्यानिशी आमचे कार्यालयास समक्ष नोंदवावी. मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे, ही नोटीस. दि.२२/०४/२०२५.

**समाधान धनु गव्हाणे,** अ‍ॅडव्होकेट
११६/१,प्लीडर्स चेंबर,जिल्हा न्यायालय आवार,नाशिक.मो.९६५७५१९४३१


# 'त्या' ठेकेदारावर अखेर वणी पोलिसांत गुन्हा दाखल

**वणी : प्रतिनिधी**

खड्ड्यात पडून मृत्युमुखी पडलेल्या तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या त्या ठेकेदारावर अखेर वणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वणी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की सारसाळे, ता. दिंडोरी येथे या रस्त्यावर मोरीचे काम चालू असून, या ठिकाणी सोमवार दि. २१ ते मंगळवार दि. २२ च्या पहाटेच्या सुमारास सारसाळे येथील युवक सोपान युवराज वाघ हा दुचाकी क्र. एम.एच.१५/सि.पी.१०४६ ने करंजखेड ते भनवड रस्त्यावरून जात असताना सारसाळे येथे अर्धवट कामाच्या ठिकाणी रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वार जोरात खड्ड्यात पडला. यात दुचाकीस्वार सोपान युवराज वाघ या युवकाचा मृत्यु झाला. त्याचा मृत्यू रस्त्याच्या चालू असलेल्या कामामुळे व सदर ठिकाणी आवश्यक ती खबरदारी न घेतल्यामुळे झाल्याचा आरोप करत सारसाळे येथील ग्रामस्थ एकवटले व पोलीसांना बोलावून संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी केली.

या बाबीचा ग्रामस्थ व वणी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी मध्यस्थी करून ग्रामस्थांची समजूत काढत गुन्हा दाखल करणार असल्याचे आश्वासन दिले. पोलिसांनी ठेकेदारा विरूध्द तक्रार नोंदवून घेत ठेकेदार प्रतिक दिलीपराव शिंदे, वय २९, रा. शिवाजीनगर, दिंडोरी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबतची फिर्याद वणी पोलिसांत मयताचे वडील युवराज शिवराम वाघ यांनी दिली असून, अधिक तपास पो. उप.नि.गणेश कुटे करत आहे.

### जमिनीच्या वादातून मायलेकीला मारहाण

**छत्रपती संभाजीनगर :** भर रस्त्यात मायलेकीला मारहाण झाल्याची घटना घडली आहे. जमिनीच्या वादातून माय-लेकीला आठ जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. माय-लेकीला मारहाण झाल्यानंतर परिसरात एकच गर्दी झाली. मारहाणीची घटना बाजारपेठेतील एका सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी पंकजा मुंडे सरसावल्या

**मुंबई :**



पर्यावरण संवर्धनाचा ध्यास सभोवतालच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. वसुंधरेच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पर्यावरण क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांच्या सहयोगाने २२ एप्रिल, २०२५ जागतिक वसुंधरा दिनानिमित्त मुंबई येथील पवई तलाव स्वच्छता व संवर्धन अभियानाच्या शुभारंभ सोहळ्याचे आयोजन गणेश घाट पवई येथे करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार दिलीप लांडे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, महानगरपालिका उपायुक्त श्री.संतोष दौड आदी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी पर्यावरण रक्षणात कर्तव्य आणि हक्क या दोन्ही गोष्टींची जोड देण्याची गरज व्यक्त केली. माणसाने मात्र अतिहव्यासाने सभोवतालच्या निसर्गाचे नुकसान केले. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी शासनाबरोबरच लोकसहभाग आवश्यक आहे. यासाठी आपण वेळीच जागृत होऊन पर्यावरण संवर्धनाचे कर्तव्य बजावण्याची नितांत गरज असून सर्वांनी एकत्र येऊन काम केले तर महाराष्ट्र नक्कीच प्रदुषणुक्त होईल. नऊ दिवस चालणाऱ्या या अभियानात नागरिकांना आपल्या पृथ्वीचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या प्रत्येकाच्या जबाबदारीचे स्मरण करून देणे व राज्यातील नागरिकांना पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी करून घेणे, असा या अभियानाचा उद्देश असल्याचे पर्यावरण मंत्री मुंडे यांनी सांगितले. स्थानिक स्वराज संस्थांनी पुढाकार घेऊन नैसर्गिक जलस्त्रोतांची स्वच्छता, रिड्यूस, रियूज, रिसायकल यावर आधारित शाळा महाविद्यालयात नवीन प्रयोगांची स्पर्धा, 'पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ' याप्रमाणेच घोषवाक्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करून त्याचा पारितोषिक वितरण समारंभ प्रत्येक जिल्ह्यांच्या पालकमंत्री यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी १ मे रोजी करावा, असे आवाहन या अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने केले आहे. सिध्देश कदम यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यस्तरावर युवकांशी संवाद साधून निसर्ग संवर्धनाच्या चळवळीत तरूणांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे, असे सांगितले. डॉ. ढाकणे यांनी पर्यावरणप्रेमी सामाजिक संस्थांच्या आग्रही पुढाकाराने हा कार्यक्रम घेतला असल्याचे स्पष्ट करून पर्यावरणवादी संघटनांमुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

### निसर्ग रक्षणासाठी लोकाभिमुख चळवळ निर्माण करणार

> जलयुक्त शिवार योजना, लेक माझी भाग्यश्री अशा योजनांना लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जलयुक्त शिवार योजनेतून ग्रामीण विभागात पाणी टंचाईवर मात करण्यात यश मिळाले, हा पूर्वानुभव लक्षात घेऊन पर्यावरण विभाग देखील निसर्ग रक्षणासाठी लोकाभिमुख चळवळ निर्माण करेल. पवई तलावाची स्वच्छता ही या चळवळीची सुरुवात असून नागरिकांचा वाढता सहभाग हे खूप मोठे योगदान ठरेल, असा विश्वास श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला.

> आज २२ एप्रिल पासून ते १ मे पर्यंतच्या नऊ दिवसाच्या राज्यस्तरीय 'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' या अभियानाचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला. त्यानिमित्त पवई तलाव स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी राज्याचे फूलझाड ताम्हण रोपाचे श्रीमती मुंडे यांच्या हस्ते रोपण करण्यात आले


**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## इ–निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२५–२६/०८

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३०००० ५६८५९ / ईएम | मायक्रोप्रोसेसर आधारित मल्टी–सेन्सर इंटेलिजेंट सिस्टिम प्रदान आणि निश्चित करण्यासाठी कामाचा करार. | २,१४,३८,२५२/– / २,१७,८९०/– |
| २. | ३०००० ५६८६२ / बीएम | संच क्र. ३,४ आणि ५ बॉयलरचे आवश्यकतेनुसार आयडी एफडी पी ए फॅन बेअरिंग हाउसिंग व फाऊंडेशन प्लेट साठी ब्ल्यु मॅचिंगचे कंत्राट. | २,१५,६००/– / ५,७००/– |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई–टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/–, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे



जा.क्र. ६९/२०२५

## जय मल्हार नागरी सह.पतसंस्था मर्या.नाशिक

पत्ता: १००, प्रिन्स टॉवर, एस.एन.कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक. फोन नं.०२५३-२९७३९११

## लिलाव नोटीस
(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (११)(ई)प्रमाणे)

**ज्याअर्थी : जय मल्हार नागरी सह. पतसंस्था मर्या. नाशिक** या संस्थेने लवादी थकबाकीदार सभासद यांची खालील नमुद केलेली मालमत्ता त्यांचेकडे येणे रकमेच्या वसुलीसाठी स्थावर मिळकत जप्ती आदेशान्वये जप्त करण्यात आलेली आहे. ज्या अर्थी त्यावरील व्याज सरचार्ज व इतर खर्च वसुल करण्यासाठी स्थावर मिळकत विक्री करणे आवश्यक आहे. त्या अर्थी ही नोटीस देऊन जाहिर करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद असलेल्या वेळेत विशेष वसुली अधिकारी हे लिलावाच्या ठिकाणी खालील नमुद केलेल्या मालमत्तेवरील मालमत्ता धारक सभासदाचा हक्क दावा हितसंबंध आणि मालमत्ता अथवा त्यातील काही भागांची किंवा त्यातुन मिळणारी उत्पन्नाची विल्हेवाट लावण्याचा जो अधिकार असेल त्या अधिकारान्वये जाहिर लिलाव करून सर्वाहुन अधिक रक्कम बोलेल त्यास त्या लिलावात पुकारलेल्या वाजवी किमती बद्दलच्या त्या शर्तीस विक्री परिशिष्टांत नमुद केलेल्या अटीस अनुसरून लिलावाने विक्री करतील. लिलाव प्रकरणी कोणास काही निवेदन, विनंती किंवा माहिती दयावयाची असल्यास त्यांनी लिलावापुर्वी ७ (सात) दिवस अगोदर लेखी स्वरूपात खालील सही करणारे अधिकारी यांच्याकडेस निवेदन करावे. लिलावाच्या वेळी कोणतीही तक्रार अगर निवेदन स्विकृत करण्यात येणार नाही याची कृपया सर्व हितसंबंधितानी नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार/जामिनदार/ संमतीदाराचे नाव व पत्ता | थकबाकी रक्कम | लिलाव करावयाच्या स्थावर मिळकतीचा तपशील | लिलावाचे ठिकाण | दिनांक व वेळ | मालमत्ता धारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १. सौ. खुटे मंगल भाऊराव कर्जदार युनिट नं. ए ८ गुलमोहर कॉलनी, ध्रुवनगर, सातपुर, नाशिक. २. श्री. जाधव सुधाकर दौलत जामिनदार रो.हा.नं. ९ गुलमोहर कॉलनी ध्रुवनगर, सातपुर, नाशिक. ३. श्री. वाढोरे जगदिश शांताराम जामिनदार फ्लॅट नं. १३ शिवशक्ती अपा. गुलमोहर कॉलनी, ध्रुवनगर, सातपुर, नाशिक. | १२६०१०.०० अधिक व्याज | सर्व्हे नं. ६१/२, प्लॉट नं. १, युनिट नं. ए ८ मौजे गंगापुर, नाशिकचे क्षेत्र २७.८४ चौ.मी. या क्षेत्रापैकी | युनिट नं. ए ८ गुलमोहर कॉलनी, ध्रुवनगर, सातपुर, नाशिक ता.जि. नाशिक | दिनांक २६/०४/२०२५ रोजी दुपारी २.३० ते ५.०० वाजता | सौ. खुटे मंगल भाऊराव |

नोटीस दिनांक: ०९.०४.२०२५
स्थळ : नाशिक
येणे रक्कम : १२६०१०.०० अधिक व्याज

सही/–
सौ. नभा ह. जगताप
विशेष वसुली अधिकारी
महा.सह.कायदा १९६० चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त
(जय मल्हार नागरी सह. पतसंस्था मर्या. नाशिक)



**IIFL FINANCE**
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा ई–लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **26.04.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई–लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तीसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **07.05.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तीसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **पंचवटी कारंजा नाशिक – वसंत सिटी मॉल पहिला मजला मानस हॉटेल जवळ पंचवटी कारंजा नाशिक**

**शाखेचे नांव: लासलगाव शिवाजी चौक, तालुका – निफाड.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32764073, GL32978946, GL32806879, GL32771882, GL33063538, GL33364986, GL33964987, GL33944530, GL33499592, GL33509413, GL27698250, GL32800279, GL32793999, GL27738988, GL33347014, GL33512386, GL33494621.

**शाखेचे नांव: मालेगाव जीएल , तालुका – मालेगाव.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32728660, GL34068475, GL32738626, GL34152165, GL33366400, GL32206185, GL32229660, GL34111887, GL34342918, GL34055446, GL34343045, GL34088079, GL34115304, GL25736425, GL32161040, GL34092740, GL34099565, GL32170378, GL33350301, GL33336711, GL32435706, GL34069740.

**शाखेचे नांव: मनमाड–मनमाड जीएल, तालुका – नांदगाव.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33527546, GL33539678, GL34148758.

**शाखेचे नांव: कॅनडा कॉर्नर नाशिक, तालुका – नाशिक.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32660411, GL32105551, GL32642916, GL32764048, GL32122438, GL32880916, GL32892232, GL32427988, GL33232242, GL33227076, GL32946082, GL32953147.

**शाखेचे नांव: नाशिक–घोटी आग्रा रोड जीएल, तालुका – इगतपुरी**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33195343, GL33063672, GL33089564.

**शाखेचे नांव: नाशिक–मोहो, तालुका – नाशिक.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL29484590, GL33694042, GL26552916.

**शाखेचे नांव: नाशिक–नाशिक रोड, तालुका – नाशिक.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34236495, GL34279241.

**शाखेचे नांव: पंचवटी कारंजा नाशिक, तालुका – नाशिक.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33474277, GL34104162, GL25059661, GL27501500, GL34312710, GL34303345, GL33033371, GL33530421.

**शाखेचे नांव: त्रिमूर्ती चौक नाशिक, तालुका – नाशिक.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33023717, GL33001087, GL32471587, GL32448877, GL27695410, GL25478958, GL32942705, GL32951466, GL33077040, GL33340495, GL33377734, GL33960049, GL33396521, GL33388011, GL25392608, GL27413648, GL27667493, GL32311848, GL32298353.

**शाखेचे नांव: पिंपळगाव आग्रा रोड जीएल, तालुका – निफाड.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33111498, GL25543494, GL32321112, GL32339527, GL25239037, GL24944987.

**शाखेचे नांव: सटाणा–जलसा बिल्डिंग, तालुका – सटाणा.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33469268, GL34168916, GL33490015, GL34371143, GL32786810, GL25345620, GL32801014, GL34148955, GL34238578, GL33168767, GL32776332, GL32745665, GL32725174, GL32760713, GL33452987, GL25118231.

**शाखेचे नांव: येवला शनी पटांगण, तालुका – येवला .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33451620, GL33297641, GL33525473, GL33087634, GL33065675, GL33276280, GL33068587, GL32954621, GL32946278, GL28420261, GL25375649, GL33417452, GL33595594, GL33393023, GL33617586, GL32891520, GL32869971.

ई–लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई–लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई–लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरून ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **23.04.2025**
स्थळ: नाशिक

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड




# शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख गणेश धात्रक भाजपात

**मनमाड : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे ग्रामीण जिल्हाप्रमुख गणेश धात्रक यांचा विधानसभा निवडणुकीच्या नंतरपासून प्रलंबित असलेला भाजप प्रवेश सोहळा काल मुंबई येथील भाजप कार्यालयात केंद्रीय मंत्री शिवप्रकाश केंद्रीय महामंत्री अरुण सिंग, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री भारतीताई पवार, महाराष्ट्राचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पंकजाताई मुंडे, प्रवीण दरेकर, मंगेश चव्हाण, खासदार प्रीतम मुंडे, महाराष्ट्राचे महामंत्री आणि उत्तर महाराष्ट्र प्रभारी विजय चौधरी रवी अनासपुरे, राजेश पांडे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, माजी नाशिक जिल्हाध्यक्ष दादाजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी सर्व प्रमुख नेत्यांनी त्यांचे व त्यांच्यासोबत आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. धात्रक यांच्या प्रवेशाला अनेक अदृश्य शक्तीने विरोध केला मात्र धात्रक यांनी सर्वांना कोलून अखेर प्रवेश घेऊन हम भी किसींसे कम नही हे दाखवून दिले. धात्रक यांच्या प्रवेशाने भाजपला मनमाड शहरासह नांदगाव तालुक्यात चांगले दिवस येतील हे तितकेच खरे आहे.

विधानसभा निवडणुकीच्या नंतर शिवसेनेचे ग्रामीण जिल्हाप्रमुख गणेश धात्रक हे त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश करणार हे जवळपास निश्चित होते, मात्र धात्रक यांचा भाजपमध्ये प्रवेश होऊ नये यासाठी अनेक अदृश्य शक्तींनी साम दाम दंड भेद वापरला, मात्र भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना विश्वासात घेऊन धात्रक यांनी त्यांच्या समर्थक नगरसेवक बाजार समितीचे संचालक तसेच मनमाड बाजार समितीचे सभापती दीपक गोगड यांच्यासह काल मुंबई कार्यालयात भाजपाच्या अनेक मातब्बर नेत्यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

## यांचा झाला प्रवेश सोहळा

जिल्हाप्रमुख गणेश धात्रक, बाजार समिती सभापती दीपक गोगड, नगरसेवक ॲड. सुधाकर मोरे, प्रमोद पाचोरकर, विजय मिश्रा, लियाकत शेख, अकबर सोनावला, संतोष जगताप, चंद्रकांत परब, आनंद बोथरा, जिल्हा परिषद सदस्य अशोक जाधव सर यांनी प्रवेश केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मोठे खिंडार पडले असून, नांदगाव तालुक्यातील राजकीय परिस्थिती ही एक हाती होते की काय असे चित्र दिसत असतानाच धात्रक यांनी समर्थकांसह भाजपा प्रवेश केल्याने तालुक्यात पुन्हा वेगळी चित्र निर्माण होईल अशी आशा राजकीय जाणकारांनी व्यक्त केली आहे. त्या झालेल्या विधानसभा निवडणुकीत धात्रकी विद्यमान आमदार सुहास कांदे यांचे विरोधात लढले होते, आता मात्र शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाची युती आहे. आता हा गट आमदार कांद्यांसोबत जोडून घेतो की नाही याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. भारतीय जनता पक्ष हा देशातील सर्वांत मोठा पक्ष असून, शहराचा तसे तालुक्याचा विकास करायचा असेल तर सत्य सोबत जाणे गरजेचे आहे.

याशिवाय मनमाड शहरातील तसेच नांदगाव तालुक्यातील सर्व सामान्य जनतेच्या कामासाठी व विकासासाठी आपण भाजपा प्रवेश केल्याचे धात्रक यांनी स्पष्ट केले. गणेश धात्रक यांना मोठा राजकीय वारसा असून, दीपक गोगड हे देखील सहकार क्षेत्रात मुरब्बी राजकारणी म्हणून ओळखले जातात. भाजपाला मनमाड शहरात व नांदगाव तालुक्यात चांगले दिवस येतील हे तितकेच सत्य आहे.

# लॅमरोडला अपघातात रिक्षाचा चक्काचूर

## चालक, प्रवासी महिला जखमी

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

येथील लॅमरोडवर सकाळच्या सुमारास कुत्रे वाचवण्याच्या प्रयत्नात रिक्षा व कारची समोरासमोर धडक झाली. या अपघातात रिक्षा चालक व महिला गंभीर जखमी झाली असून, त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रिक्षाचालक समाधान वाळे, रा. नाशिक हे (एम. एच.१५ इफ वाय १६३८) या रिक्षाने रेणुका मातेच्या दर्शनासाठी नाशिकरोडहून भगूरच्या दिशेने जात असताना लॅमरोडवर कुत्रे आडवे आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात रिक्षाचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. याच दरम्यान समोरून येणाऱ्या इर्टिगा कारला धडक दिली. दोन्ही वाहनांचा आवाज झाल्याने नागरिकांनी तातडीने धाव घेऊन अपघातग्रस्त रिक्षा चालक व जखमींना कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. प्रवासी गंभीर जखमी असल्याने त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. पोलीस हवालदार मुरलीधर चव्हाण पुढील तपास करीत आहे.



## मंदिरातील चोरीप्रकरणी आरोपी ताब्यात

**पनवेल** : शहरातील जरीमरी देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून तेथील दानपेटीतील रोख रक्कम लंपास केली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. आकाश चरण (वय ३२, रा. पनवेल) असे त्याचे नाव आहे. शहरातील व्ही. के. हायस्कूल रोड येथील जरीमरी देवी मंदिराचा मुख्य दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केला होता. त्यानंतर चोरांनी मंदिरातील दानपेटी लोखंडी सळीने तोडून त्यामध्ये असलेले जवळपास तीन हजार रुपये रोख रक्कम लंपास केली होती. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे.

## चुकीची दुरुस्ती

दि.०८/०४/२०२४ रोजी 'दै. **गांवकरी**' मध्ये प्रसिद्ध झालेली स्व.राजाभाऊ तुंगार ग्रा. बि.शेती सह.पतसंस्था मर्या.शिंदे. ता.जि.नाशिक या जाहिरातीतील **अ.क्र.१०** मधील गणेश निवृत्ती टिळे रा.मु.मोहगाव पो.जाखोरी ता. जि.नाशिक यांचे **गट नं.६१/१** ऐवजी ६५/१ असे वाचावे.

**पी.व्ही.करंजे**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**म.स.सं.अ.१९६० चे कलम १५६ व १९६१ चे नियम १०७ अन्वये**

# चांदवड महाविद्यालयाच्या हर्बेरियमला आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन

**चांदवड : वार्ताहर**

येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचार्यश्रम संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. विभागातील हर्बेरियमला न्यूयॉर्क बोटॅनिकल गार्डनकडून आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या हर्बेरियमचा समावेश आता जागतिक स्तरावरच्या इंडेक्स हर्बेरिओरम या महत्वपूर्ण संस्थेत करण्यात आला आहे.

न्यूयॉर्क बोटॅनिकल गार्डनने या हर्बेरियमला एसएनजीबी हा विशिष्ट कोड प्रदान केला आहे. इंडेक्स हर्बेरिओरम ही जागतिक पातळीवर वनस्पतींच्या नोंदी ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. त्यामुळे चांदवड महाविद्यालयातील या हर्बेरियममधील वनस्पतींच्या नोंदी आता जागतिक स्तरावर अधिकृत मानल्या जातील.

हा शुष्क वनस्पतींचा जतन केलेला संग्रह भविष्यातील वनस्पती संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आतापर्यंत ८०० हून अधिक विविध फुलांच्या वनस्पतींचे नमुने काळजीपूर्वक जमा करून जतन करण्यात आले आहेत.

पान १ वरून

## हिंदी भाषा सक्तीचा निर्णय अखेर मागे

बंधनकारक आहेच. पण, इतर माध्यमाच्या शाळांमध्ये सुद्धा मराठी भाषा विषय बंधनकारक केला गेला आहे. त्या शाळेत मराठी शिकवणारे शिक्षक सुद्धा मराठी भाषेत पदवी मिळवलेले असले पाहिजे याचेही बंधन असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले. १६ एप्रिल रोजीचा जो शासन निर्णय जारी झाला त्यात मराठी भाषा विषय तसाच राहणार असून त्याला प्राधान्य आहेच.इंग्रजी दुसरा विषय आणि तिसरा विषय हिंदी भाषा हे स्वीकारलं आहे. शासन निर्णय मध्ये हिंदी भाषा अनिवार्य असेल असं शब्द वापरला गेला त्यामुळे प्रश्न निर्माण झाला आहे. हिंदी सोडून जर दुसरी भाषा शिकायचं ठरलं तर शिक्षक सुद्धा त्याच भाषेचे लागतील, त्यासाठी धोरण ठरवावं लागेल. त्यामुळे, आताच्या घडीला हिंदी विषय ऐच्छिक ठेवणार आहेत, इतर विषयासंदर्भात आपण निर्णय घेऊ, असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले. तर, जे हिंदी साठी ऐच्छिक असतील त्यांना मराठी इंग्रजी सोबत हिंदी विषय शिकवला जाईल.

## दहशतवाद्यांचा हल्ला; २७ पर्यटकांचा मृत्यू

या हल्ल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दखल घेत गृहमंत्री अमित शाह यांना तिथे जाण्यास सांगितले आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहल-गाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या हल्ल्यानंतर सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि या प्रकरणात ठोस आणि कठोर कारवाई करण्यास सांगितले.

**दहशतवाद्यांना सोडणार नाही:' मोदी**

पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र निषेध केला. पंतप्रधान मोदी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हणाले, 'जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहे. जखमी लोक लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो.

## पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा दुर्दैवी मृत्यू

पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडू लागला. दुसरा त्यास वाचविण्याचा प्रयत्न करीत असतांना दोघेही धरणाच्या पाण्यात बुडाले. घटनेची माहीती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन पाण्यात बुडालेल्या दोघांचा पाण्यात शोध घेऊन बाहेर काढले. दोघांनाही वणी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता वैद्याकिय अधिकारी डॉ.सिंगल यांनी तपासून मृत घोषित केले. वणी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले. याबाबत वणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वणी पोलीस करीत आहे.

## दिंडोरी, सिन्नर, चांदवड, नाशिकच्या विद्यार्थ्यांची बाजी

शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयातून शिक्षण घेतले, त्याच बरोबर गेल्या दोन वर्षांपूर्वी गुप्तचर विभाग दिल्ली येथील परीक्षा देऊन नोकरी करत आहेत.

सिन्नर तालुक्यातील जामगांव येथील स्मिता पुंजा कातकाडे यांनी ६८७ रँक मिळवत यश संपादन केले. त्यांचे वडिल सहाय्यक उपनिरीक्षक म्हणून निवृत्त झाले. पती राजेश ठाकूर संरक्षण मंत्रालयात सेक्शन ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. स्मिता यांचे प्राथमिक शिक्षण नवीन मराठी शाळा आणि आरजेसीबी गर्ल हायस्कूल येथे झाले.तर केटीएचएम महाविद्यालयातून बीएससीची गणिथ ही पदवी घेतली. त्या आता हरियानात प्रशासकीय सेवेत बीडीपीओ म्हणून कार्यरत आहेत. भुत्याणे ता. चांदवड येथील श्रुती सविता संतोष चव्हाण हिने वयाच्या २१व्या वर्षी पहिल्या प्रयत्नात ५७३ रँक प्राप्त केली. तिचे वडील शिक्षक आहेत. पंचवटी येथील ऐश्वर्या जाधव हिने १६१ वी रँक मिळवली आहे. तपोवन रोड येथे पोद्दार शाळेजवळ राहणाऱ्या ऐश्वर्याने स्पर्धा परीक्षांमध्ये रस असल्याने पदवीपासूनच परीक्षांची तयारी सुरू केली होती. विशेष म्हणजे ऑनलाइन क्लास आणि घरचा अभ्यास अशा कामांमधूनच तिने हे यश तिसऱ्या प्रयत्नात प्राप्त केले. मुंबईतील व्हीजेएनटी महाविद्यालयात सिव्हिल इजिनिअरिंग करीत असतानाच तिने स्पर्धा परीक्षा दिल्या. आई, वडील यांचे त्यासाठी आपल्याला मार्गदर्शन असल्यानेच आपण यशाला गवसणी घालू शकल्याचे तिने सांगितले.

## ई-पेमेंटला पसंती; पालिकेच्या तिजोरीत पंधरा कोटी

दिली आहे. सध्या महापालिकेसमोर साडे पाचशे कोटींची थकबाकी असल्याने प्रशासन सदर रकमेच्या वसुलीसाठी विविध प्रयत्न करत आहेत. मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेने करदात्यांना ऑनलाईनची देखील सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. विशेष म्हणजे ऑनलाइनद्वारे कर भरल्यास त्यात दोन टक्के सूट मिळते. तरी मालमत्ताधारकांनी या सुविधेचा लाभ घेऊन करात सूट मिळ्वून घ्यावी. **-अजित निकत, उपायुक्त, करसंकलन विभाग,मनपा**

# हरसूल येथे माकपाचे बेमुदत धरणे आंदोलन



**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात काल माकपातर्फे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. यामध्ये त्र्यंबकेश्वर तालुका किसान सभेच्या शेकडो कार्यकर्त्यांसह आशा, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत डाटा ऑपरेटर, पाणीपुरवठा कर्मचारी व रोजंदारीवरील शासकीय कर्मचारी उपस्थित होते.

लोकाभिमुख कायदे करण्याऐवजी शासन उलट कायदे करून नियमात नवनवीन सुधारणा करत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे प्रश्न व समस्या दाबून टाकण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असा आरोप यावेळी करून त्याच्या निषेधार्थ विरोधात हरसूल येथ धरणे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाचे नेतृत्व माकपाचे ज्येष्ठ नेते इरफान शेख यांनी करत शासकीय अधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश बरफ, माजी उपसभापती देवराम मावळे, काळू वड, किरण ढोले, लक्ष्मण गवते आदी शेकडो माकपा कार्यकर्ते यावेळी मोर्चामध्ये उपस्थित होते. धरणे आंदोलन अगोदर ठाणापाडा रस्ता, बिरसा मुंडा चौक, संताजी महाराज चौक, हनुमान मंदिर, मजीद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता मार्गे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मोर्चेकरी एकत्र जमत मोर्चा काढला. यामध्ये शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्र्यंबकेश्वर तालुक्यातील संबंधित विभागांचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. आंदोलनदरम्यान कुठलाही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून हरसूल पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हरसूल पोलीस ठाण्याच्या पोलीस कर्मचाऱ्यांसह अतिरिक्त चार अधिकारी, वीस पोलीस जवानांनी बंदोबस्त ठेवला.

## मुख्य मागण्या

विशेष जनसुरक्षा विधेयक मागे घेऊन श्रम संहिता रद्द करा, मानधन व कंत्राटी कामगारांना सरकारी नोकरीत समावेश करावे, घरकुलाचे थकीत हप्ते त्वरित द्या, शासन नियमाप्रमाणे प्रत्येक ग्रामस्थाला पिण्याची पाण्याची सोय करून जलजीवन योजना त्वरित पूर्ण करा, प्रत्येक वाडी,वस्तीवरील शेतकऱ्याला थ्री फेज वीज कनेक्शन द्या, मुख्यालय राहत नसलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांवर कारवाई करून मुख्यालय राहण्यास सक्ती करणे, घरकुल लाभार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्याकडून पैसे वसूल करावे.रिक्त असलेले वीज वितरण व शिक्षण विभागातील पदांवर त्वरित नेमणूक करावी, शबरी घरकुल व ड घरकुल यादीतून सुटलेल्या सर्व लाभार्थ्यांना घरकुल मिळावे, प्रत्येक अंगणवाडीत वीज कनेक्शन मिळावे, कृषी योजनांचे प्रभावीपणे अंमलबजावणी करून फळबाग साठी बी बियाणे योग्य वेळेत मिळावे, पशुसंवर्धन विभागातर्फे वेळोवेळी जनावरांचे लसीकरण राबवावे, आरोग्य खात्यातील रिक्त पदे भरून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधाचा मुबलक साठा उपलब्ध करावा, प्रत्येक गावात स्मशानभूमीचे बांधकाम करावे, रेशन कार्ड नोंदणी, आधार कार्ड दुरुस्ती केंद्र हरसुल मध्येच शासनामार्फत करावे, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात अपंगांना प्रमाणपत्र द्यावे.


## ग्रामपंचायत कार्यालय, तळेगाव अं. ता. जि. नाशिक

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत तळेगाव अं. ता. जि. नाशिक येथे Balance work of V P Office Building at Talegaon A Tal Dist Nashik विकास कामी करण्याकरिता बंद लिफाफा पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामासाठी कोरे निविदा संच ग्रामपंचायत कार्यालय, तळेगाव अं. ता.जि. नाशिक येथे रोख/ऑनलाईन रक्कम भरून दि. २२/०४/२०२५ ते २९/०४/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, निविदासंबधी सर्व माहिती, अटी व शर्ती सदर निविदा संचात उपलब्ध आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार सरपंच ग्रामपंचायत तळेगाव अं. ता. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत तळेगाव अं. ता. जि. नाशिक**

## ग्रामपंचायत कार्यालय, दहेगाव ता. जि. नाशिक

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत दहेगाव ता. जि. नाशिक येथे REPAIES OF SAMAJMANDIR AT DAHEGAON TAL DIST NASHIK विकास कामी करण्याकरिता बंद लिफाफा पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामासाठी कोरे निविदा संच ग्रामपंचायत कार्यालय, दहेगाव ता.जि. नाशिक येथे रोख/ऑनलाईन रक्कम भरून दि. २२/०४/२०२५ ते २९/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, निविदासंबधी सर्व माहिती, अटी व शर्ती सदर निविदा संचात उपलब्ध आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार सरपंच ग्रामपंचायत दहेगाव ता. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत दहेगाव, ता. जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

प्रोसेस जमा निशाणी-०६

**ॲड. श्रीपाद मधुकर जोशी ॲण्ड असोसिएट्स**

**सिन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात**

दि. चौ. अर्ज नं. ३९/२०२५

**श्री. मारुती भगवंता गोधडे** **अर्जदार**

**विरुद्ध**

**१) सौ. संगिता बंडू मोरे व इ.** **सा.वाले**

अर्जदार व सा.वाले नं. १ व २ यांची जनक माता **नामे विठाबाई भगवंता गोधडे** ही दि. २९/०३/२००४ रोजी मयत झाली असून त्यांना कायदेशीर वारस म्हणून अर्जदार व सा.वाले नं. १ व २ हे आहेत. **मयत विठाबाई भगवंता गोधडे** यांची मालकीहक्काची **मौजे माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील गट नं. ४०** हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे संपादीत झालेला असल्याने **मयत विठाबाई भगवंता गोधडे** व त्यांचे कायदेशीर वारस हे प्रकल्पग्रस्त सदरात मोडत होते. त्याअधिकारात अर्जदार याने पीएपी भुखंड प्रकल्पग्रस्त कारणास्तव मिळणेसाठी प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक यांचेकडे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचे कामी अर्जदार हा प्रकल्पग्रस्त सदरात मोडत असल्याने प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी अर्जदारास **दि. २५/०२/२०२५ रोजी जा.क्र./ प्राकाना/पीएपी अर्ज/पी-४१७०६४/२०२५** प्रमाणे पत्र देऊन वारस प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळिवले. करीता **मयत विठाबाई भगवंता गोधडे** हिचे वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झाल्याने अर्जदार यांचे लाभात वारस दाखला दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज मे. न्याया. दाखल केला आहे.

सबब याकामी कुणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी या मे. न्यायालयात **दि. १४/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** स्वतः अगर वकिलामार्फत हजर होऊन आपले म्हणणे व हरकती मांडाव्यात. वरील तारखेस हजर न राहिल्यास अर्जदार यांना वारस दाखला देण्याचा हुकूम करण्यात येईल.

ही जाहीर नोटीस आज **दिनांक २१/०४/२०२५ रोजी** आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- कनिष्ठ लिपिक, दिवाणी न्यायालय क.स्तर, सिन्नर
शिक्का
हुकूमावरुन सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, सिन्नर



# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

## पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर** ९८३४१०९३३७

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

## Name changed

I HAVE CHANGE MY OLD NAME KACCHI TOFFIQ TO NEW NAME **TOHFIK AYUB KACHHI**.BY AFFIDAVIT -NO.- 7373- DT.-21/04/2025.

---

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

---

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

## जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-**८७८८०९२४१५

## महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

## विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

---क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**



## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. **मिळकतीचे वर्णन** : तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे भगुर** येथील बिनशेती मिळकत, यांसी **भुमापन क्र.३०२/१** यांसी **क्षेत्र ३०२.९०.०० आर चौ.मी.**, यांसी **खाते क्र.३९४५ (यांसी शेवटचा फेरफार क्र. १५४८७, ता. ०९/०५/२०२२)** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट्सप्रमाणे.

२. उपरोक्त बिनशेती मिळकत ही **श्री. पिलू प्राणजीवन अमिन** यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीतील मिळकत असून सदर मिळकत ही मजकूर मिळकत मालक यांनी निर्वेध व बोजाविरहित आहे, असे सांगून सदर मिळकतीच्या स्वामीत्वाबाबत व निर्वेधपणाबाबत खात्री करण्यासाठी प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशनकामी नोटीस प्रसिध्द केली आहे.

३. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार जसे की, गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, बक्षीस, मालकी हक्क, हितसंबंध, करार, पोटगी, तारण, कर्ज तारण, कोर्ट वाद, जामीनकी, कोर्ट जप्ती,हद्दी व रस्त्याचा वाद अथवा कोणत्याही प्रकारचा वाद, इत्यादी असल्यास अशा इसमांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आपली लेखी हरकत आमचेकडे कागदपत्रांच्या खऱ्या नक्कला देवून आमची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, मुदतीनंतर व दाखला दिल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस.

**नाशिक. तारीख २१/०८/२०२४**

**पक्षकाराची सही/-**
**आमचे मार्फत प्रसिध्द**
**सही/-(ॲड. श्रीमती के. टी. मंत्री)**
**ऑफिस : ४१५/१, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय परिसर, नाशिक-४२२००२**

## टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते कि, **मिळकतीचे वर्णन-** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे-मखमलाबाद-२** या गावचे शिवारातील बिनशेती स्थावर प्लॉट मिळकत यांसी **भूमापन क्रमांक व उपविभाग**-४२१/१/ब / **प्लॉट नं.२३** यांसी **प्लॉट क्षेत्र ३१६.५३ चौ.मी. यांसी, आकार रु. १११.०० पैसे** यांसी चतुःसिमा मंजूर लेआऊट प्लॅनप्रमाणे, उपरोक्त नमूद केलेली मिळकत ही **वच्छलाबाई फकिरा मानकर, बाळु फकिरा मानकर** व **हिरामण फकिरा मानकर** यांचे वडिलोपार्जित मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील असून त्यांनी सदरहू मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे, असे खात्रीने व भरवशाने सांगून सदरहू मिळकतीचे टायटल तपासणेकामी मिळकत मालकांनी सांगितलेनुसार प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे,

सबब उपरोक्त नमुद मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा जसे की, गहाण, दान, लिज, लिन, वारसहक्क, अनवस्त्र, खावटी, बक्षीस, खरेदी, साठेखत, तारण, गहाण, कोर्टवाद, हद्दीचा वाद, जामिनकी अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्या संबंधीत इसमाने अगर संस्थेने आपली लेखी हरकत, कागदोपत्री पुराव्यानिशी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास किंवा मुदतीनंतर आलेली हरकत व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व त्यानंतर सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी, कळावे. ही जाहीर नोटीस. **नाशिक, दि.२२/०४/२०२५**

**सही/-मिळकत मालक**

**आमचे मार्फत प्रसिध्द**
**ॲड.दिपक सदाशिव चौधरी**
**ऑफिस-दिंडोरी न्यायालय, दिंडोरी, जि.नाशिक**

## जाहीर निवेदन

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, **कै. शांताराम सुकदेव बोराडे,** रा. सप्तशृंगीनगर, शिंदे ता.जि. नाशिक येथील रहिवाशी असून **कै. शांताराम सुकदेव बोराडे** हे **दि.२७/०३/२०२५** रोजी मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात त्यांना खालीलप्रमाणे कायदेशिर वारस आहेत.

| अं.न. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती संगिता शांताराम बोराडे | ५० | पत्नी |
| २ | सोनाली जनार्दन ढेरिंगे | ३१ | मुलगी |
| ३ | मीनाक्षी परशुराम रेवगडे | ३० | मुलगी |
| ४ | दीपक शांताराम बोराडे | २६ | मुलगा |
| ५ | कमलाबाई सुकदेव बोराडे | ५६ | आई |

येणेप्रमाणे हे कायदेशिर वारस असून याव्यतिरिक्त इतर अन्य कोणीही वारस नाहीत. तरी, कुणास काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसिलदार सो., नाशिक यांचेकडे ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा करावा. अन्यथा मा. तहसिलदार सो., नाशिक यांचेकडून वारसाला वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी देण्यात येणार आहे.

**तहसिलदार, नाशिक**

# शहरात दुचाकी चोरांचा उच्छाद

## एकाच दिवशी चार घटना : शोध सुरू

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**शहर पोलिस आयुक्तालय हद्दीतील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दुचाकी चोरट्यांनी उच्छाद मांडल्याचे चित्र पाहायला मिळत असून, चार मोटारसायकली चोरीला गेल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले असून, चोरट्यांचा शोध सुरू आहे.**

गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पीटीसीसमोरील उत्कर्षनगर येथे घडली. सतीश गुलाबराव भादणे (रा. प्रमोद महाजननगर, गंगापूर रोड) यांनी उभी केलेली एमएच १५ जीपी ७८९० क्रमांकाची २० हजार रुपये किमतीची सुझुकी ॲक्सिस मोपेड अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, तपास पो.ह. पगार करीत आहेत.

तपोवन परिसरात चोरीची दुसरी घटना घडली. ज्ञानेश्वर रामदेव कदम (रा. कोऱ्हाटे, ता. दिंडोरी) यांनी १७ एप्रिल रोजी श्रीरामसृष्टी उद्यानाबाहेर आपली एमएच १५ एचडी ६६४४ क्रमांकाची २५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार राजुळे तपास करत आहेत.



तिसरी घटना जलतरण तलाव परिसरात ३ एप्रिल रोजी घडली. शहबाज मतीन शेख (वय २८, रा. भाभानगर) यांनी गोल्फ क्लबजवळ उभी केलेली एमएच १५ एफ. झेड. ११६६ क्रमांकाची १५ हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल चोरीला गेली. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपास हवालदार बहिरम करत आहेत. भाभानगरमध्ये घडलेल्या चौथ्या प्रकारात भूषण अरविंद भोत (रा. मुंबई नाका) यांनी पार्क केलेली एमएच १५ ईजे १५१४ क्रमांकाची ५० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉन मोटारसायकल चोरीला गेली. याबाबत मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपास पो.ह. डंबाळे करीत आहेत. शहरातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मोटारसायकल चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# दामदुप्पटच्या आश्वासनाने एकाची फसवणूक

**पंचवटी : वार्ताहर**

मखमलाबाद परिसरातील एका युवकाला दामदुप्पट करून देण्याचे आश्वासन देऊन त्याची सुमारे ६५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला असून, याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अभिजित प्रकाश भदाणे (२६, रा. मखमलाबाद) यांनी दि. २७ जानेवारी २०२३ ते दि.१५ एप्रिल २०२५ रोजी दरम्यान कलश अपार्टमेंट, शिवगंगानगर, म्हसरूळ येथे उमेश अरविंद पुजारी, रा. काळाराम मंदिराजवळ, पंचवटी नाशिक व शिवप्रसाद बिंधेश्वरी दुबे (रा. शिवाजीनगर पार्कसमोर शिवाजीनगर, नागपूर) यांना पैसे दिल्यानंतर जवळपास ३ महिन्यानंतर त्यांच्याकडे माझे पैसे दामदुप्पट करून केव्हा मिळणार आहे, अशी विचारणा केली असता त्यांनी सांगितले. आमचे प्रयत्न सुरू आहे. त्यानंतर ३०-३५ दिवसांनंतरही फिर्यादी त्यांना विचारणा करत राहिले तेव्हा असेच सांगत राहिले की, तुमचे पैसे मिळतील, तुम्ही विश्वास ठेवा. वेळोवेळी विचारणा केली असता असेच टाळाटाळीचे उत्तर देण्यात आले. त्यावरून भदाणे यांच्या आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यावरून अभिजित प्रकाश भदाणे यांनी आपली ६५ लाखांची फसवणूक झाल्याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जोशी करीत आहेत.

## महत्त्वाचे

### मनमाडला कंटेनरखाली सापडून वृद्ध महिलेचा मृत्यू

**मनमाड :** मनमाड शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर कंटेनरखाली सापडून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. ही वृद्ध महिला अनोळखी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन रुग्णवाहिका मागवून मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला. याबाबत पोलीस अधिक तपास करत आहे. मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे महामार्गावर मनमाड मध्यवर्ती बसस्थानकासमोर एक कंटेनर क्रमांक जीजे २७ टीएफ ६९८५ च्या मागच्या चाकाखाली एक वृद्ध महिला सापडली. यात या वृद्ध महिलेच्या डोक्यावरून चाक गेल्याने गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन मयत महिलेला उपजिल्हा रुग्णालयात नेले. तपास पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### जितेंद्र भावे यांच्यावर आठवा गुन्हा दाखल

**सिडको :** सोशल मीडियावर एका धर्माबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण केल्याप्रकरणी निर्भय महाराष्ट्र पार्टीचे अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्याविरोधात पुन्हा एकदा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा भावेंवर दाखल होणारा आठवा गुन्हा आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, भावे यांनी सोशल मीडियावरील एका लाइव्ह पोस्टमध्ये एहसान फरामोश, पाठीत सुरा खुपसणारा, देशद्रोही अशा शब्दांचा वापर करत विशिष्ट धर्माबाबत अपमानकारक व द्वेषजन्य भाष्य केले. यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, समाजात गटांमधील शांतता भंग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. फिर्यादी यांचे कर्मचारी युसूफ पठाण व त्यांच्यासह एकाच धर्माचे अन्य १३ कर्मचारी या वक्तव्याने दुखावले गेले असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, लाइव्ह पोस्टवर सचिन देशपांडे यांनी भावेसाहेब तुम्ही खूप छान काम करत आहात, आय लव्ह यू टू अशी प्रतिक्रिया दिली होती. या प्रतिक्रियेच्या आधारे संगनमत करून चिथावणी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष ढवळे तपास करीत आहेत. सोशल मीडियावरून सातत्याने भडकावू विधान करणाऱ्या भावेंविरोधात यापूर्वीही विविध प्रकारचे गुन्हे दाखल झाले असून, प्रशासनाकडून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जात आहे.

### समीर पठाणचा जुगार अड्डा उद्ध्वस्त

**सिडको :** मुंबई नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काठेगल्ली परिसरात असलेल्या अनाधिकृत सातपीर दर्गा हटविण्यात येत असतांना विविध गुन्ह्यातील नाशिक कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या समीर पठाण याने कारागृहात असूनही तेथून मुस्लिम धर्मीयांच्या भावना भडकवून दंगल घडवून आणल्याचा ठपका ठेवत त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंध असलेल्या समीर पठाण याचा इंदिरानगर आणि उपनगर या दोन्ही पोलिस ठाण्याच्या सीमारेषेवर असलेल्या मटका, जुगारीचा क्लब गुन्हे शाखेच्या युनिट १च्या पोलिसांनी कारवाई करत हा क्लब नेस्तनाबूत केला. दर्गा हटविण्यापूर्वी समीर पठाण हा सध्या नाशिक कारागृहात शिक्षा भोगत असतांना त्याने कारागृहातून मुस्लिम धर्मियांच्या भावना भडकवून दंगल घडवून आणल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे .समीर पठाण याच्या विरोधात मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दर्ग्याप्रकरणी पाच आरोपींच्या कोठडीत वाढ

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

मुंबई नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काठेगल्लीतील सातपीर दर्ग्याचे अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या कारवाईदरम्यान पोलिसांवर दगडफेक झाल्याच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पाच आरोपींपैकी तिघांना पोलिस कोठडीत तीन दिवसांची वाढ देण्यात आली असून, अन्य दोघांची न्यायालयीन कोठडीतून पुन्हा पोलिस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

गुन्हा क्रमांक १३४/२०२५ अन्वये या आरोपींविरुद्ध BNS कायद्याचे कलम तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ आणि शस्त्र अधिनियम, फौजदारी सुधारणा कायदा कलम ७ अशा विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तौसिफ पिंजारी, अशरफ शेख आणि बरकत अली शेख यांना पीसीआर वाढवण्यासाठी सादर करण्यात आले होते. तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात सांगितले की, आरोपी चौकशीदरम्यान सहकार्य करीत नाहीत, तसेच त्यांचे मोबाइल व सोशल मीडिया खात्यांची माहिती अद्याप मिळालेली नाही. या कारणावरून पीसीआर वाढवणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

तसेच, पूर्वी एमसीआर मिळालेल्या आरोपी गुफरान तांबोळी व समीर पठाण हेही प्रकरणात कटकारस्थानी असल्याचे तपासात पुढे आले असून, त्यांचीही पुन्हा पोलिस कोठडीची गरज असल्याचे युक्तिवादात नमूद करण्यात आले.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून, आरोपींनी पोलीस यंत्रणेवर दगडफेक करत समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे सखोल तपासासाठी पोलिस कोठडी मंजूर केली. या सुनावणीवेळी सरकारी पक्षातर्फे अति. सरकारी वकील आव्हाड, तर आरोपींच्या वतीने वकील इनामदार आणि कासलीवाल उपस्थित होते. पोलीस तपासामुळे आणखी काही आरोपींचा सहभाग स्पष्ट होण्याची शक्यता असल्यामुळे या प्रकरणाकडे गंभीर गुन्हा म्हणून पाहिले जात आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# अंबड येथे गांजा-भांग वाहतूक प्रकरणी तीन आरोपींना दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाणे हद्दीतील इंडोलाइन फर्निचर कंपनीसमोर, पाथर्डी फाटा-अंबड रस्त्यावर २०१६ मध्ये गांजा व भांग वाहतूक करताना पकडण्यात आलेल्या तिघा आरोपींना न्यायालयाने २ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरील हा गुन्हा २२ जुलै २०१६ रोजी सायंकाळी ३.१५ वाजता घडला होता. आरोपी सुरेश रघुनाथ ढगे (रा. इगतपुरी), राहुल दादाभाऊ शिंदे (रा. सिडको, नाशिक), समाधान वाळूबा जाधव (मयत, रा. छत्रपती संभाजीनगर) व सागर रोहिदास मोहिते (रा. नेवासा, जि. अहिल्यानगर) हे चौघे जण एमएच ०६ एएस ३७४२ या क्रमांकाच्या मारुती स्विफ्ट कारमधून १,२२० ग्रॅम गांजा व ८९२ ग्रॅम भांग बाळगून जात असताना अंबड पोलिसांच्या कारवाईत पकडले गेले होते.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. बी. खडके यांनी काटेकोरपणे केला. आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायदा कलम २०(ब), २२(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी मा. जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ०१, नाशिक येथे झाली. श्री. एन. व्ही. जीवने यांनी साक्षी, पुरावे आणि परिस्थितीनुसार आरोपींना दोषी ठरवत शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता सुधीर कोतवाल यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पोलीस हवालदार आर. बी. आजगे, कोर्ट अंमलदार महिला पोलिस हवालदार आर. व्ही. बांबळे (अभियोग कक्ष, नाशिक) यांनी पाठपुरावा केला. या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पो. उपायुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, पो. उपायुक्त (परिमंडळ-२) मोनिका राऊत, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके, सहा. पो. आयुक्त (अंबड) शेखर देशमुख व वरिष्ठ पोलिस निरीक्षक राकेश हांडे यांनी संपूर्ण तपास व न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सहभागी अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.



# नंदिनी नदीची संरक्षक जाळी दुरुस्त करा

## शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचा इशारा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

घाण, कचरा टाकण्यास प्रतिबंध यावा, नंदिनीचे पर्यायाने गोदावरीचे प्रदूषण कमी व्हावे, यासाठी शिवसेना पक्ष व सत्कार्य फाउंडेशनच्या पाठपुराव्यानंतर उंटवाडीतील दोंदे पुलावर महापालिकेतर्फे संरक्षक जाळ्या बसविण्यात आल्या होत्या. ही संरक्षक जाळीच अज्ञात व्यक्तीने तोडून टाकली आहे. यामुळे रहिवासी संतप्त झाले आहेत. हे कृत्य करणाऱ्यांवर कारवाई करावी, जाळी त्वरित दुरुस्त करावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने दिला आहे.

नंदिनी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर घाण, कचरा, राडारोडा, चिकन-मटण दुकानांमधील घाण टाकून मोठ्या प्रमाणात नंदिनीचे पर्यायाने गोदावरीचे प्रदूषण केले जात होते. ते रोखण्यासाठी शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने वेळोवेळी निवेदने देऊन पुलांवर संरक्षक जाळ्या बसविण्याची मागणी केली.

यानुसार प्रभाग क्रमांक २४ मधील दोंदे पूल, गोविंदनगर रस्त्यावरील पूल, बाजीरावनगर, डेटामॅटिक्सजवळील पूल या ठिकाणी महापालिकेने संरक्षक जाळ्या बसविल्या आहेत. यामुळे घाण, कचरा टाकण्यास प्रतिबंध आला असून, प्रदूषणही कमी झाले आहे. काही दिवसांपूर्वी दोंदे पुलावरील जाळी अज्ञात व्यक्तीने तोडून टाकली आहे. या ठिकाणी लोखंडी बॉक्स बसविण्यात आला आहे. महापालिकेच्या परवानगीशिवाय हे काम करणारी कंपनी, एजन्सी अथवा व्यक्ती यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, ही जाळी दुरुस्त करून पुन्हा बसवावी, अशी मागणी शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने केली आहे.

महापालिका प्रशासक तथा आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल यांना याबाबतचे निवेदन सोमवारी, २१ एप्रिल रोजी देण्यात आले आहे. जाळी त्वरित न बसविल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयूर आहेर, धवल खैरनार, संगीता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, निलेश ठाकूर, यशवंत जाधव, सुनील सोनकांबळे, डॉ. शशिकांत मोरे, विनोद पोळ, मनोज वाणी, अशोक पाटील, अनंत संगमनेरकर, शैलेश महाजन, बाळासाहेब तिडके, पंढरीनाथ पाटील, मीना टकले, वंदना पाटील, रूपाली मुसळे, दीपक दुट्टे, राहुल काळे, सतीश मणियार, सचिन राणे, हरीश काळे आदींसह रहिवाशांनी दिला आहे.

# म्हसरूळमध्ये महिलेसह पतीला मारहाण करून विनयभंग

**पंचवटी : वार्ताहर**

म्हसरूळ परिसरातील कलानगर येथे घराच्या बाहेरील रोडवर स्पीडब्रेकर बांधण्याचे काम करीत असताना स्पीडब्रेकर थोडे पुढे अथवा मागे घ्या, आम्हाला गाडी बाहेर काढण्यास अडथळा होईल, असे समजावून सांगितले असता, महिलेसह तिच्या पतीला मारहाण करून महिलेचा विनयभंग केल्याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महिलेने म्हसरूळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.दि. २० एप्रिल २०२५ रोजी रात्री १.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या कॉलनीत राहणारे संतोष भागवत, तेजस भागवत, अनिकेत चिंतामण बागूल व त्यांचा एक साथीदार असे फिर्यादीच्या घराच्या बाहेरील रोडवर स्पीडब्रेकर बांधण्याचे काम करीत असताना फिर्यादीच्या पतीने त्यांना स्पीडब्रेकर थोडे पुढे अथवा मागे घ्या, आम्हाला गाडी बाहेर काढण्यास अडथळा होईल, असे समजावून सांगत असताना त्यांना राग येऊन त्यांनी पतीला व फिर्यादी महिलेस शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच संतोष भागवत याने लोखंडी रॉडने पतीला डोक्यावर, छातीवर, पाठीवर जबर मारहाण करून संतोष भागवत व त्याच्या साथीदाराने महिला त्यांच्या पतीला वाचविण्याचा प्रयत्न करत असताना फिर्यादीला पकडून अश्लील शिवीगाळ करून मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. मारहाणीत महिलेच्या पतीचा हात फ्रॅक्चर करून लोखंडी रॉड डोक्यावर मारल्याने जबर दुखापत केली आहे. याबाबत संतोष भागवत, तेजस भागवत, अनिकेत बागूल व त्यांचा एक साथीदार (सर्व रा. म्हाडा कॉलनी, कलानगर, म्हसरूळ) यांच्याविरोधात म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक मयुरी तुरे करीत आहेत.

# जि.प. कर्मचारी पतसंस्थेला १ कोटी ७९ लाखांचा नफा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेला आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तब्बल १ कोटी ७९ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन नितीन पवार, व्हा. चेअरमन रवींद्र थेटे आणि सचिव अर्चना गांगोडे यांनी दिली.

संस्थेने १ एप्रिल २०२४ पासून कर्जावरील व्याजदर १०.५०% वरून १०% केला आहे. तसेच १ मार्च २०२४ पासून कर्जदार सभासदांसाठी विमा कवच योजना लागू करण्यात आली आहे. संस्थेचे वसूल भागभांडवल १३.३४ कोटी रुपये, राखीव निधी : ३.५० कोटी रुपये, इतर निधी : २ कोटी रुपये, बँकेत गुंतवणूक : १.०७ कोटी रुपये, इतर गुंतवणूक : ३.१० कोटी रुपये, चालू वर्षात संस्थेने ६.३७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले असून, येणे कर्ज १६.६२ कोटी रुपये इतके आहे. कर्जमर्यादा ९ लाख रुपये असून, मयत सभासदांच्या वारसांना २५,००० रुपये कल्याण निधी व १ लाख रुपये कुटुंबकल्याण योजनाअंतर्गत देण्यात येत आहे. संस्थेची एकूण सभासद संख्या १५४० असून, थकबाकी ००% आहे, ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. यावेळी संचालक मंडळातील विक्रम पिंगळे, नंदकिशोर सोनवणे, अमित आडके, किशोर आहिरे, चंद्रशेखर पाटील, मंगेश जगताप, रंजन थोरमिसे, अनिल दराडे, सचिन पाटील, गणेश गायकवाड, सचिन अत्रे, सरिता पानसरे आदींनी समाधान व्यक्त केले.

# पाथर्डी उपविभाग कार्यालय मंजूर करा

## आ. सीमा हिरे यांची महावितरणकडे आग्रही मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

विजेच्या समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा आणि पाथर्डी येथील नागरिकांना द्वारका सबस्टेशनला दहा किलोमीटर दूर जावे लागत असल्याने काल आ. सीमा हिरेंनी मुंबईत महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेतली.

कामटवाडा, पाथर्डी येथे उन्हाळ्यात सतत विजेचा प्रश्न निर्माण होत असतो. याविषयीच्या समस्या सोडविण्यासाठी येथील नागरिकांना सततच द्वारका सबस्टेशनला जावे लागत असल्याने त्यांची मोठी कुचंबणा होत असते. यातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रस्तावित पाथर्डी उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी आ. हिरेंनी महावितरण प्रशासनाकडे केली आहे. कामटवाडा आणि पाथर्डी हे सेक्शन व्दारका



उपविभागांतर्गत येतात. खंडित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी वा विजेसंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा परिसरातील नागरिकांना द्वारकाला जावे लागते. नागरिकांना दिलासा देण्यासाठी महावितरणने पाथर्डी येथे नवीन उपविभाग कार्यालय प्रस्तावित केलेले असून, सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी गेल्या काही महिन्यांपासून महावितरणच्या अध्यक्षांकडे प्रलंबित आहे. पाथर्डी उपविभाग कार्यालयाचा प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी आ. सीमा हिरेंनी महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेतली. कामटवाडा आणि पाथर्डी या दोनही सेक्शनअंतर्गत ग्राहकांची संख्या प्रत्येकी तीस ते पस्तीस हजारांच्यावर गेलेली असल्याने महावितरण कंपनीकडून ग्राहकांना पुरेशी सेवा देणे शक्य होत नाही. अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या आहे तीच आहे. मात्र, ग्राहकांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याने अनेकदा येथील सेवा कोलमडून पडत असल्याचे आ. हिरेंनी संचालक भादीकर यांच्या निदर्शनास आणून दिले. पाथर्डी येथील प्रस्तावित नवीन उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी यावेळी आ. हिरेंनी भादीकर यांच्याकडे केली आहे.

# उपनगरला घरफोडीत तीन लाखांचे दागिने लंपास

**नाशिकरोड :** उपनगर परिसरातील मितीला रोड येथे घरात कुणी नसल्याची संधी साधत चोरट्याने सुमारे तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविता शशिकांत काकडे (रा. मितीला रोड, उपनगर, नाशिक रोड) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. घरात कोणी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला आणि सुमारे २ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यात ५.५ तोळ्यांचे सुमारे १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र, २ तोळ्यांची ६० हजारांची सोन्याची चैन आणि २ तोळ्यांची ६० हजारांची सोन्याची पोत यांचा समावेश आहे. या प्रकरणी उपनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार पवार करीत आहेत.

# अंबड वसाहतीतील रस्त्यांची दयनीय अवस्था

## कर्मचाऱ्यांचा जीव मुठीत; महापालिकेचा कानाडोळा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**अंबड औद्योगिक वसाहतीतील सिमेन्स बसथांबा व सिमेन्स चौक परिसरातील रस्त्यांची दुरवस्था कामगार, वाहनचालक व स्थानिक रहिवाशांसाठी मोठी त्रासदायक ठरली आहे. रिंग रोडलगत केबल टाकण्यासाठी खोदलेला खड्डा अद्याप व्यवस्थित बुजवण्यात आलेला नाही. त्यामुळे दुचाकीस्वार व सायकलस्वारांचे अपघात सतत घडत आहेत.**

सिमेन्स बसथांबा परिसरातून जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला ठेकेदाराने केबल टाकण्यासाठी रस्ता खोदला आहे. परंतु या खोदाईनंतर रस्त्यावर पडलेली खडी रस्त्याच्या कडेला न राहता मध्यभागी पसरलेली असून, त्यामुळे रस्ता अरुंद झाल्याचे चित्र दिसते. परिणामी, दररोज अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळील खड्डा व्यवस्थित बुजवण्यात आलेला नसल्याने कर्मचारी आणि वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन या रस्त्यांवरून प्रवास करावा लागत असून, येथील रस्त्याचे काम करावे, अशी मागणी कामगारांनी केली आहे.




> औद्योगिक वसाहतीतून प्रामाणिकपणे मनपाला सर्वाधिक कर दिला जातो, मात्र त्यानुसार सुविधा मिळत नाहीत. रस्ते वेळेवर दुरुस्त केले गेले पाहिजेत. गरवारे ते एक्स्लो चौफुलीपर्यंतचा रस्ता पूर्णतः उखडलेला आहे. या खडबडीत रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांचे मणके खिळखिळे झाले आहेत. अनेक कर्मचाऱ्यांचे अपघात झाले असून, काहींना कायमचे अपंगत्व आले आहे.
>
> – **अजय चव्हाण,** कंपनी कामगार

> या मार्गावरून प्रवास करत आठ ते बारा तास काम करणे हा मोठा मानसिक व शारीरिक त्रास आहे. खोदकामानंतर रस्ते पूर्ववत करणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे आणि ती त्वरित पार पाडावी. तसेच एमआयडीसीतील सर्व रस्ते गुळगुळीत, स्वच्छ आणि सुरक्षित बनवावेत, अशीही कामगार, उद्योजक आणि स्थानिक नागरिक यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.
>
> – **प्रकाश डांगे,** कंपनी कामगार

## महत्वाचे



### सटाणा-मालेगाव रस्त्यावर जनावरांची वाहतूक करणारा ट्रक गोरक्षकांनी पकडला

**सटाणा :** सटाणा-मालेगाव रस्त्यावर विनापरवाना जनावरांची वाहतूक करणारा ट्रक गोरक्षकांनी पकडला असून सदरचा ट्रक सटाणा पोलीस स्टेशन येथे आणून कारवाई करण्यात आली आहे. सटाणा-मालेगाव रस्त्यावर जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली. त्यानुसार लक्ष ठेवून असलेल्या गोरक्षकांनी शेमळी गावाजवळ जिजे १६ एव्ही ८३७१ क्रमांकाचा ट्रक थाबवत चौकशी करत तपासणी केली असता ह्या ट्रक मध्ये निर्दयीपणे १६ म्हशी कोबून भरलेल्या आढळल्या. जनावरांची वाहतूक करण्याचा कोणताही परवाना ट्रक चालकाकडे नसल्याने सदरचा ट्रक सटाणा पोलीस स्टेशन येथे आणत पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला. ट्रक मध्ये निर्दयीपणे कोबून भरलेल्या म्हशी पोलीस ठाण्याच्या मैदानावर ट्रक मधून खाली उतरवण्यात आल्या असून ट्रक मध्ये एक म्हैस मृत अवस्थेत आढळली आहे. इतर म्हशीना देखील जखमा झाल्या आहेत. म्हशीना झालेल्या जखमांच्या वेदना होत असल्याने त्यांच्या डोळ्यातुन अश्रू येत होते. त्याच्यावर पशुवैध्यकीय अधिकारी डॉ.पवार यांनी उपचार केले आहेत. अश्या निर्दयीपणे जणांवरांची वाहतूक करणाऱ्यावर कडक कारवाई झाली पाहिजे अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.



### पालिका उपायुक्तांच्या पत्नीचा मृत्यू

**शहापूर :** मुंबईहून नाशिककडे जात असताना एका अज्ञात वाहनाने कट मारल्यामुळे एक कार महामार्गाजवळील नाल्यात जाऊन एका दरडीला धडकली. या अपघातात मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त प्रशांत गायकवाड यांच्या पत्नी राजश्री प्रशांत गायकवाड (वय ४५) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, एक जण जखमी झाला आहे. राजश्री प्रशांत गायकवाड आपल्या नातेवाइकांसोबत नाशिककडे जात असताना कसारा बायपासजवळील साईबाबा खिंड येथील उतारादरम्यान कारला अज्ञात वाहनाने ओव्हरटेक करतेवेळी कट मारली. यावेळी कारचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले व कार नाल्यात जाऊन एका महाकाय दरडीवर आदळली. त्यात राजश्री प्रशांत गायकवाड यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर मनोज शिलेदार यांचा पाय अडकून पडल्याने त्यांना दुखापत झाली. राजश्री गायकवाड यांना रुग्णवाहिकेतून कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. परंतु अतिरक्तस्त्रावामुळे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



### वात्सल्य वृद्धाश्रमात आरोग्य शिबिर

**नाशिक :** वात्सल्य वृद्धाश्रमात काठे गल्ली परिसरातील अनामया होमिओकेअरच्या संचालिका डॉ. सायली लोळगे यांनी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी जवळपास ४० ते ४५ ज्येष्ठांची आरोग्य तपासणी करून त्यांना होमिओपॅथी औषधी देखील देण्यात आली. शिबिरात प्रामुख्याने गुडघेदुखी, सांधेदुखी, पित्त, अपचन, झोप न लागणे, डोकेदुखी, सर्दी अशा विविध आजारांवर औषधे देण्यात आली. यावेळी सर्वांच्या आरोग्य तपासण्या करून त्यांना आजाराप्रमाणे औषधे देण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. सायली यांचे वडील संजय लोळगे यांनीदेखील मोलाचा हातभार लावला. आरोग्य शिबिरासाठी वात्सल्य वृद्धाश्रमाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. यावेळी वात्सल्य वृद्धाश्रमाचे संचालक सतीश सोनार यांच्यातर्फे या सेवेबद्दल डॉ. सायली संजय लोळगे यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

### प्रबोधन साहित्य स्वागताध्यक्षपदी गायकवाड

**नाशिक :** प्रबोधन साहित्य परिषद व प्रगतिशील लेखक संघ



नाशिक यांच्यातर्फे २७ एप्रिल रोजी सटाणा येथे होणाऱ्या आठव्या प्रबोधन साहित्य परिषदेच्या स्वागताध्यक्षपदी चंद्रकांत गायकवाड यांची निवड झाल्याचे प्रबोधन साहित्य परिषदेची अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ जगताप व प्रगतिशील लेखक संघाचे जिल्हा सचिव प्रल्हाद पवार यांनी कळवले आहे. चंद्रकांत गायकवाड हे महानगरपालिकेत शिक्षक म्हणून कार्यरत असून, त्यांनी महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये परिवर्तनवादी विचारांचा जागर करण्यासाठी महापुरुषांच्या जीवनावर स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले आहे. सुखदेव एज्युकेशन संस्था नाशिक जिथे सल्लागार सदस्य, विभागीय अध्यक्ष समता शिक्षक परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बँकेचे माजी संचालक, परिवर्त नाशिक आजीव सदस्य राजश्री शाहू छत्रपती सुवर्ण महोत्सवी जयंती समिती सदस्य, अंधश्रद्धा निर्मूलन समिती सदस्य आदी पदांवर ते कार्यरत आहेत. या संमेलनाच्या अध्यक्षपदी नांदेड येथील प्रसिद्ध कवी संजय बालाघाटे राहणार आहेत. प्रसिद्ध कादंबरीकार जी. के. ऐनापुरे हे उद्घाटन करतील. प्रमुख पाहुणे म्हणून पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. बाबूराव नरवडे असणार आहेत.

### कोकणगावला हरिनाम सप्ताह सांगता

**कसबे-सुकेणे :** महाबली हनुमंतराय यांच्या जन्मोत्सवानिमित्त निफाड तालुक्यातील कोकणगाव येथील महाबली हनुमंतराय मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज ख्यातनाम कीर्तनकार हभप बाळासाहेब महाराज गतीर मुंढेगाव यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. पहाटे काकडा भजन, गाथा भजन, हरिपाठ, कीर्तन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व महाप्रसादाचा गाव व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

## निधन वार्ता

### पोपटराव बोडके

**नाशिक :** पोपटराव सुकदेव बोडके (८५) रा. शिंपीटाकळी, ता.




निफाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी अशोक बोडके व शांताराम बोडके व सामाजिक कार्यकर्ते संजय बोडके यांचे ते वडील होत.

# मनमाडचे व्यापारी संकुल धोकादायक अवस्थेत

## पालिका केवळ सक्तीची वसुली करते, सुविधा देण्यास असमर्थ





**मनमाड : प्रतिनिधी**

मनमाड शहरातील मनमाड नगर परिषदेच्या मालकीची अनेक व्यापारी संकुले आहेत. यातील अनेक संकुले ही अर्धवट अवस्थेत असून, अनेक संकुलांची अवस्था ही कचराकुंडी व दारुड्यांचा अड्डा बनलेली आहे. शहरातील अत्यंत जुने असलेले शहीद भगतसिंग मैदानासमोरील शहीद भगतसिंग व्यापारी संकुल अत्यंत दुरवस्थेत आले असून, त्याचे स्लॅपवरील बांधकाम कोसळायला सुरुवात झाली आहे.

काल दुपारी या ठिकाणी या संकुलावरील संरक्षक भिंतीचा काही भाग कोसळला. सुदैवाने ज्या ठिकाणी हा भाग कोसळला त्या ठिकाणी कोणीही नसल्याने जीवितहानी टळली असली तरी या ठिकाणी अनेक व्यावसायिक व्यवसाय करत आहेत. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची गर्दी असते. यामुळे भविष्यात पुन्हा अशी घटना घडली तर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पालिकेने नुसती गाळेभाडे वसुली न करता या संकुलांना दुरुस्ती करण्याची देखील गरज असल्याचे मत येथील व्यापारी व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपशहराध्यक्ष जाकिर पठाण यांनी व्यक्त केले आहे.

मनमाड नगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारावी. गावातील तरुणांना व्यवसाय करण्यासाठी गाळे उपलब्ध करून द्यावे व यातून येणारी उत्पन्न शहराच्या विकासासाठी वापरता यावे यासाठी शहरातील अनेक ठिकाणी व्यापारी संकुले बनवण्यात आली आहे. मात्र, यातील अनेक व्यापारी संकुले हे अपूर्णावस्थेत असून, ही व्यापारी संकुले मोकाट जनावरे, शहरातील जुगारी व दारूच्या आहारी गेलेल्या तरुणांचे अड्डे झालेले आहेत. यातील काही व्यापारी संकुले हे अनेक वर्षांपासून बनविले आहेत, मात्र या व्यापारी संकुलांतून केवळ गाळा भाडेवसुली करण्यात येते. या व्यापारी संकुलांची डागडुजी पालिका करत नाही. शहरातील भगतसिंग मैदानासमोरील शहीद भगतसिंग व्यापारी संकुल हे याचा उत्तम नमुना आहे. हे व्यापारी संकुल अतिशय जुने असून, अनेक ठिकाणी जीर्ण झालेले आहे.

काही दुकानांतील स्लॅब कोसळतो तर काही दुकानांत पावसाळ्यात पाणी तुंबते अशी परिस्थिती असतानादेखील आपला उदरनिर्वाह चालावा म्हणून व्यावसायिक येथे व्यवसाय करत आहेत, मात्र व्यापारी संकुलांच्या स्लॅबवर असलेली संरक्षक भिंतही कोसळायला सुरुवात झाली असून, काल दुपारी या ठिकाणी या भिंतीचा मोठा भाग कोसळला. सुदैवाने ज्यावेळी भिंत कोसळली त्यावेळी तेथे कोणी नसल्याने जीवितहानी झाली नसली तरी या व्यापारी संकुलात अनेक छोटे-मोठे व्यावसायिकांचे व्यवसाय आहेत. याशिवाय, रविवारचा आठवडे बाजारदेखील याच रोडवर भरतो. यामुळे येथे कायम गर्दी असते.

**भाजी मार्केटची अपुरी इमारत म्हणजे साडेतीन कोटींची कचराकुंडी**

मनमाड शहरात मनमाड नगरपालिकेच्या वतीने बनविण्यात आलेली अनेक व्यापारी संकुले आहेत. यातील अनेक व्यापारी संकुले ही अपूर्णावस्थेत असून, मनमाड शहरातील नव्हे तर राज्यातील सर्वांत मोठी व सर्वांत जास्त किमतीची कचराकुंडी म्हणून मनमाड शहरातील अपूर्णावस्थेत असलेल्या भाजी मार्केटची इमारत होईल. ही इमारत गेल्या अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत असून, या इमारतीत मोठ्या प्रमाणावर घाणकचरा साचलेला आहे, याशिवाय या इमारतीत गांजा, दारू पिणारे तसेच गुन्हेगारी स्वरूपाच्या लोकांचा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वावर असताना दिसतो. मात्र, याकडे कोणीही लक्ष देत नाही.



# अ. भा. आदिवासी सेनेचा २ रोजी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मोर्चा

**इगतपुरी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व केंद्र सरकारच्या विचाराधीन प्रश्नांच्या प्रमुख प्रलंबित मागण्यांची सोडवणूक व्हावी यासाठी अखिल भारतीय आदिवासी सेनेचे संस्थापक अध्यक्ष दि. ना. उघाडे यांच्या प्रमुख नेतृत्वात दि. २ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानी हजारोंच्या संख्याने बिऱ्हाड मोर्चा काढण्यात येणार असल्याची पत्रकार परिषदेत त्यांनी माहिती दिली.

दादर रेल्वेस्थानकाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नामांतर, इंदू मिलवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम त्वरित पूर्ण व्हावे, शासकीय सामाजिक विकास निधी योग्य विकासकामांवर खर्च व्हावा व आदिवासी समाजाच्या विकासाला दिला जाणारा निधी कपात करू नये, वनविभागातील कंत्राटी कामगार कायम सेवेत घ्यावा, या मागण्यांबाबत वारंवार मोर्चे, आंदोलने करूनही केवळ आश्वासने दिली जातात. या प्रसंगी ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख राजाभाऊ ठाकरे, महिला आघाडीच्या प्रमुख मंगला राऊत, निवृत्ती राऊत, काशिनाथ दळवी, चिंतामण गायकवाड, देविदास गवळी, पुंडलीक गवांडे, सुधाकर आळंबे, श्रीधर गतीर उपस्थित होते.

# इगतपुरीतील ९६ ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण घोषित

**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी तालुक्यातील ४ मार्च २०३० पर्यंत मुदत संपणाऱ्या ९६ ग्रामपंचायत निवडणुकीतील सरपंचपदांचे आरक्षण सोमवार दि. २१ रोजी घोषित करण्यात आले. इगतपुरीचे तहसीलदार अभिजित बारवकर यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत प्रक्रिया राबवण्यात आली.

बदललेल्या आरक्षणामुळे ग्रामीण भागातील राजकारणात उलथापालथ होणार असल्याचे सोडतीमुळे दिसून आले. या सोडतीनंतर बुधवारी २३ एप्रिलला महिलांसाठी काही ग्रामपंचायतींची सरपंचपदे जाहीर करण्यासाठीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नंतर लगेचच रखडलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा धुरळा होईल अशी शक्यता आहे. इच्छुक उमेदवारांच्या पूर्वतयारीला आजपासून गतिमानता येणार आहे.

अनुसूचित क्षेत्रातील टाकेघोटी,



फांगुळगव्हाण, पिंपळगांव मोर, आंबेवाडी, आवळखेड, कुशेगाव, कऱ्होळे, वाकी, त्रिंगलवाडी, टाकेद बुद्रुक, मोगरे, अडसरे खुर्द, पिंपळगाव भटाटा, वाळविहीर, धामणगाव, धारगाव, भावली बुद्रुक, मायदरा धानोशी, घोटी बुद्रुक, टाकेद खुर्द, नागोसली, भरवज, इंदोरे, पिंप्री सद्रोद्दीन, ओंडली, आवळी दुमाला, धामणी, भावली खुर्द, आडवण, वासाळी, अधरवड, तळोशी, उंबरकोन, रायांबे, आहुर्ली, चिंचलेखैरे, सोमज, शेवगेडांग, म्हसुर्ली, अडसरे बुद्रुक, बोरटेंभे, धार्णोली, कोरपगाव, बेलगाव तऱ्हाळे, नांदगाव सदो, उभाडे, देवळे, काळुस्ते, तळोघ, कांचनगाव, सोनोशी, खेडभैरव, टिटोली, खैरगाव, मांजरगाव, बोर्ली, कुर्णोली, खडकेद, शेनवड बुद्रुक, मानवेढे, बलायदुरी, बारशिंगवे, खंबाळे, कुरुंगवाडी ही गावे अनुसूचित जमातीसाठी कायम राखीव आहेत.

यापैकी काही ठिकाणी महिलांना संधी मिळेल. मात्र, याचा फैसला २३ एप्रिलला होणार आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी पिंपळगाव घाडगा, निनावी, मालुंजे, साकूर, शेणित, जानोरी, नांदूरवैद्य, शिरसाठे, गरुडेश्वर ग्रामपंचायती, सर्वसाधारण प्रवर्गासाठी भरविर खुर्द, कावनई, घोटी खुर्द, वाडीवऱ्हे, पिंपळगाव डुकरा, नांदगाव बुद्रुक, पाडळी देशमुख, वाघेरे, माणिकखांब, सांजेगाव, बेलगाव कुऱ्हे, शेनवड खुर्द, भरविर बुद्रुक, मुंढेगांव, दौंडत, लक्ष्मीनगर, मोडाळे या ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी कुऱ्हेगाव, मुरंबी आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मुकणे, गोंदे दुमाला, समनेरे, कृष्णनगर या ग्रामपंचायती आरक्षित झाल्या. यापैकी काही गावे महिलांसाठी आरक्षित होणार असून, त्याबाबत २३ एप्रिलला आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

# नांदगाव तालुक्यातील ८८ सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**नांदगाव : प्रतिनिधी**



तालुक्यातील मुदत संपणाऱ्या ८८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी (दि. २१) तहसीलदार सुनील सैंदाणे यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. पुरुष वर्गासाठी ५० टक्के आरक्षणासाठीची सोडत बुधवारी (दि. २३) उपविभागीय अधिकारी येवला येथील कार्यालयात काढण्यात येणार आहे.

आरक्षण निघालेल्या ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे : श्रीरामनगर (नामाप्रवर्ग), फुलेनगर (सर्वसाधारण), क्रांतीनगर (एसटी), गिरणानगर, मल्हारवाडी, टाकळी खुर्द, बाणगाव बु. (सर्वसाधारण), हिंगणवाडी (नामाप्र), कसाबखेडा (नामाप्र), भारडी (एसटी), बोयेगाव (सर्वसाधारण), पिंपरखेड (सर्वसाधारण), धोटाणे खुर्द (सर्वसाधारण), धनेर (नामाप्र), नवसारी (एससी), नागापूर (सर्वसाधारण), वडाळी खुर्द (एससी), बोराळे ( सर्वसाधारण), तळवाडे (नामाप्रवर्ग), हिरेनगर (नामाप्र), लोढरे (सर्वसाधारण), लक्ष्मीनगर (सर्वसाधारण), शास्त्रीनगर (एसटी), मूळडोंगरी ( नामाप्रवर्ग), कासारी ( नामाप्र वर्ग), माणिकपुंज (सर्वसाधारण), ढेकू खुर्द (सर्वसाधारण), मळगाव (सर्वसाधारण), वेहेळगाव (सर्वसाधारण), बिरोळे (नामाप्र वर्ग), भालूर (एससी), नवे पांझण (सर्वसाधारण), कोंढार (सर्वसाधारण), अस्तगाव (नामाप्र वर्ग), पांझणदेव (नामाप्र वर्ग), खादगाव (सर्वसाधारण), खिर्डी (सर्वसाधारण),टाकळी बु (एसटी), मोहेगाव (नामाप्र वर्ग), सोयगाव (सर्वसाधारण), हिंगणदेहरे (नामाप्र वर्ग), जातेगाव (नामाप्र वर्ग), धोटाणे बु. (नामाप्र वर्ग), एकवई (सर्वसाधारण), बाणगाव खुर्द (सर्वसाधारण), दहेगाव (एसटी), बेजगाव (एसटी), हिसवळ खुर्द (एसटी), लोहशिंगवे (सर्वसाधारण), परधाडी (सर्वसाधारण), पिंपरी हवेली (सर्वसाधारण), कुसुमतेल (नामाप्र वर्ग), जवळकी (एसटी), बोलठाण (सर्वसाधारण), बाभूळवाडी (नामाप्र), न्यायडोंगरी (सर्वसाधारण), पिंपराळे (सर्वसाधारण), वाखारी (नामाप्र वर्ग), वंजारवाडी (एसटी), जामदरी (सर्वसाधारण), पानेवाडी (एससी), भवरी (सर्वसाधारण), गंगाधरी (एसटी), पोखरी (सर्वसाधारण), चिंचविहीर, (एसटी), हिसवळ बुद्रुक (एससी), जळगाव खुर्द (सर्वसाधारण), जळगाव बुद्रुक (सर्वसाधारण), रोहिले बुद्रुक (सर्वसाधारण), आमोदे (सर्वसाधारण), सावरगाव (सर्वसाधारण), करही (एसटी), सटाणे (सर्वसाधारण), पळाशी (नामाप्र वर्ग), अनकवाडे (नामाप्र वर्ग), मोरझर (सर्वसाधारण), मंगळणे (नामाप्र वर्ग), गोंडेगाव (एससी), तांदूळवाडी (सर्वसाधारण), मांडवड (नामाप्र वर्ग), साकोरा (नामाप्र वर्ग), रणखेडे (सर्वसाधारण), कळमदरी (सर्वसाधारण), वडाळी बुद्रुक (सर्वसाधारण), नांदूर (सर्वसाधारण), दरेल (सर्वसाधारण), माळेगाव (क ) (सर्वसाधारण), चांदोरा (नामाप्र वर्ग).

### उपनगरला ३ लाखांच्या दागिन्यांची चोरी

**नाशिकरोड: प्रतिनिधी**

उपनगर परिसरातील मितीला रोड येथे घरात कुणी नसल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने सुमारे तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविता शशिकांत काकडे (रा. मितीला रोड, उपनगर, नाशिक रोड) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत सांगितले की, घरात कोणी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला आणि सुमारे २ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यात ५.५ तोळ्यांचे सुमारे १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र, २ तोळ्यांची ६० हजारांची सोन्याची चैन आणि २ तोळ्यांची ६० हजारांची सोन्याची पोत यांचा समावेश आहे.

# माता, नवजात बालकांचा मृत्यू रोखण्यात बिटको रुग्णालयात यश

## वर्षभरात एकाही मृत्यूची नोंद नाही

**नाशिकरोड : अनिल गुंजाळ**

राज्यात काही भागांमध्ये शासकीय रुग्णालयांमध्ये प्रसूतीदरम्यान गर्भवती महिलांच्या मृत्यूच्या घटना वाढत असताना व त्याबाबत चिंता व्यक्त केली जात असतानाच, नाशिक महापालिकेच्या नाशिकरोड येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बिटको रुग्णालयाने एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे. गेल्या वर्षभरात या रुग्णालयात झालेल्या २८८८ प्रसूतींपैकी एकाही मातेचा किंवा नवजात बालकाचा मृत्यू झालेला नाही. त्यामुळे येथील वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

बिटको रुग्णालय प्रशासनाच्या माहितीनुसार, एकूण प्रसूतींपैकी १६९० नैसर्गिक पद्धतीने, तर ८९८ प्रसूती शस्त्रक्रियेच्या माध्यमातून झाल्या. यामध्ये ५९७ प्रसूती अत्यंत उच्च जोखमीच्या होत्या. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही माता मृत्यू शून्यावर ठेवणे, हे निश्चितच कौशल्यपूर्ण असल्याचे सिद्ध झाले आहे. यातून योग्य आरोग्य व्यवस्थापनाचे दर्शन घडते.

नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात अद्याप सुधारणा होण्याची गरज असली, तरी सध्याच्या उपलब्ध साधनसामग्रीतून बिटको रुग्णालयाच्या वैद्यकीय आणि परिचर्या कर्मचाऱ्यांनी दाखवलेली कार्यक्षमता वाखाणण्याजोगी आहे. गर्भवती महिलेची गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत आणि त्यानंतरही होणारी काळजी, वेळेवर तपासण्या, आपत्कालीन स्थितींसाठी तयारी, यामुळे हा यशस्वी अनुभव शक्य झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या रुग्णालयात धूळ खात पडलेल्या आधुनिक मशिनरींचा सुयोग्य वापर केला, कर्मचारी संख्याबळ वाढवले, त्यांना आणि रुग्णांना सेवा सुविधा वाढविल्यास सर्व आघाड्यांवर बिटको रुग्णालय आदर्श कामगिरी करेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

नाशिकरोड व आसपासच्या ग्रामीण भागातील सामान्य रुग्णालय व महिलांसाठी बिटको रुग्णालय म्हणजे एक आरोग्य संजीवनी ठरते आहे. प्रसूतीच्या वरील आकडेवारीवरून नागरिकांचा या रुग्णालयावर, तेथील वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर असलेला विश्वास अधिक दृढ झाला असून, सरकारी आरोग्य संस्थाही किती सक्षम आणि जबाबदार असू शकतात, याचे हे जिवंत उदाहरण ठरत आहे.

> बिटको हॉस्पिटल प्रसूतीबाबत वर्षभरात सदरची कामगिरी सांघिक
>
> 
>
> सहकाऱ्यांच्या जोरावर पार पाडता आली याचा आनंद आहे. रुग्णालयात आठवड्यातून सोमवार आणि गुरुवार असे दोन वेळा एएनसीडेव्दारे राखीव वेळ देत सर्व गर्भवती रुग्णांची बारकाईने तपासणी केली जाते. सर्व महिला रुग्णांच्या सुरक्षित प्रसूतीसाठी खबरदारी घेतली जाते. वरिष्ठ पातळीवरूनदेखील सहकार्य लाभत आहे. तथापि, बिटकोतील प्रसूती विभागातील परिचारिकांची संख्या आणि एकूणच कर्मचारी वर्ग वाढवणे गरजेचे आहे.
>
> **– डॉ. शिल्पा काळे**
> निवासी वैद्यकीय अधिकारी,
> हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बिटको रुग्णालय



# पाटोद्यात रामेश्वर महाराज यात्रोत्सव उत्साहात सुरू

**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाटोदा येथील ग्रामदैवत व जागृत देवस्थान रामेश्वर महाराज यात्रोत्सवास दि. २१ एप्रिलपासून उत्साहात प्रारंभ झाला. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २२ एप्रिल रोजी ऑर्केस्ट्रा, तर २३ रोजी कुस्त्यांचा सामना होणार आहे. रामेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी भल्या पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. बालगोपाळांसह आबालवृद्धांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सकाळी रामेश्वर महाराजांची विधिवत पूजा करण्यात आली. दुपारी दोन वाजता पाटोदा येथील शेकडो कावडीधारकांनी चासनळी येथून आणलेल्या गंगेच्या पाण्याच्या कावडीची विधिवत पूजा करून कावडी मिरवणुकीला प्रारंभ झाला. कावडी मिरवणुकीदरम्यान ग्रामस्थ व महिलांनी कावडधारकांची पूजा केली तसेच गावकऱ्यांच्या वतीने मानाने तमाशा कलावंत अर्थात तकतरावांची सजविलेल्या बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. यात्रोत्सव उत्साहात व शांततेत व्हावा यासाठी यात्रा कमिटी व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

गांवकरी
■ नाशिक, बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५

महत्त्वाचे

## डुबेरेत गुरुवारी मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने डुबेरे येशील सटूआई माता सभागृहामध्ये गुरुवारी (दि.२४) सकाळी १० वाजता मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मविप्र संस्थेचे सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांनी दिली. 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या उदात्त भावनेने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्राच्या वतीने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सिन्नर तालुका मोतीबिंदू मुक्त अभियान राबवण्यात येणार आहेत. या शिबिरामध्ये रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येईल. आवश्यक रुग्णावर बिनटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. गरजू रुग्णांचे भिंगारोपण( लेन्स) आडगाव नाशिक येथे करण्यात येईल. नाशिक येथे जाण्याची व येण्याची मोफत सोय करण्यात आली असून मोफत औषधोपचार देखील करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेसाठी येताना आधार कार्ड किंवा मतदान कार्ड असणे आवश्यक आहे. त्याशिवाय शस्त्रक्रिया होणार नाही. रुग्णांना शस्त्रक्रियेसाठीच्या सर्व तपासण्या मोफत करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेदरम्यान रुग्ण व रुग्णासमवेत असणा-या एका व्यक्तीच्या जेवणाची व निवासाची व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. परिसरातील डुबेरे, डुबेरेवाडी, सोनारी, आटकवडे, जय प्रकाशनगर, साबरवाडी व परिसरातील गावातील रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर, संचालक कृष्णाजी भगत, शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने, मुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक उल्हास पवार आदींसह शालेय समितीचे सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.



## भाजपाच्या सिन्नर मंडल अध्यक्षपदी लहाने

**सिन्नर :** भारतीय जनता पक्षाच्या सिन्नर मंडल अध्यक्षपदी किरण लहाने यांची निवड करण्यात आली. सध्या महाराष्ट्रातील सर्व जिल्हा, तालुका व शहर मंडल अध्यक्ष नियुक्ती व निवड प्रक्रिया सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून सिन्नर मंडल अध्यक्ष निवडीसंदर्भात मंडल अध्यक्ष निवड प्रक्रिया प्रमुख तानाजी जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत मंडल अध्यक्षपदी किरण लहाने यांची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्ष बच्छाव सर, कासार यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सिन्नर विधानसभा प्रभारी जयंत आव्हाड, नासिक जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, जेष्ठ नेते रमेश नागरे, भाऊसाहेब शिंदे, नवनिर्वाचित शहराध्यक्ष सजन सांगळे, जिल्हा ओबीसी चिटणीस किरण माऊली सांगळे, संजय गिते, नाशिक जिल्हा चिटणीस मीराताई सानप, सिन्नर तालुका सरचिटणीस विष्णुपंत सानप, प्रमोद शिंदे, यज्ञेश काळे, सुभाष करपे, सुदाम गुंजाळ, गणेश बरके, ओमकार सानप, विक्रम कापडी, अक्षय गिते, पंढरी गिते, शुभम सानप, नवनाथ गंधास आदींसह बूथप्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवडेतील नगरपालिकेच्या जलवाहिनीची गळती काढण्याला मुहूर्त सापडला

### दिवसाला ५० ते ६० लाख लिटर पाणीगळती; ३ दिवस पाणीपुरवठा राहणार बंद

**सिन्नर : प्रतिनिधी**

कडवा जलवाहिनीतून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शिवडे गावात गत पाच महिन्यांपासून दिवसाला तब्बल ५० ते ६० लाख लिटर पाणी गळती होत आहे. माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी वारंवार यावर आवाज उठवल्यानंतर कृषिमंत्र्यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत दोन दिवसांत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्याधिकारी रितेश बैरागी यांनी दिले होते. हे लिकेज काढण्यासाठी नगरपालिकेने आता २४ एप्रिलचा मुहूर्त निवडला आहे.

पोलीस बंदोबस्तात नगरपालिकेकडून गळती काढण्याचे काम केले जाणार आहे. त्यामुळे २४ ते २६ एप्रिल दरम्यान सिन्नर शहराचा पाणीपुरवठा खंडित होणार असून शहरवासीयांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.दरम्यान, लिकेज् काढण्यासाठी वारंवार विरोध करणाऱ्या शिवडा ग्रामस्थांची भूमिका काय राहणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. सिन्नर शहरासाठी कडवा धरणातून राबवण्यात आलेल्या २४ तास पाणीपुरवठा योजनेतून प्रतिदिन २ कोटी लिटर पाणी उचलले जाते. प्रत्यक्षात मात्र १ कोटी २० लाख लिटर पाणी दररोज शहराला मिळते. उर्वरित पाणी शिवडे गावाजवळ असलेल्या बंधाऱ्यात लिकेज आहे. तेथे सुमारे ५० ते ६० लाख लिटर पाणी दिवसाला वाया जाते. हे लिकेज काढण्यास नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना शिवडे गावातील नागरिकांकडून अटकाव घातला जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

याशिवाय लोणारवाडी आणि सोनांबे गावाजवळ आणि डगळे वस्ती परिसरात असलेल्या लिकेजमधूनही जवळपास १५ ते २० लाख लिटर पाणी दररोज वाया जाते.

गेल या चार-पाच महिन्यांपासून हा प्रकार सुरू असल्यामुळे कृषीमंत्र्यांच्या उपस्थितीत ५ एप्रिल रोजी झालेल्या आढावा बैठकीत यावर माजी नगरसेवकांनी जोरदार आवाज उठवला. त्यावर प्रांताधिकारी तथा नगरपालिकेच्या प्रशासक हेमांगी पाटील आणि मुख्याधिकारी रितेश बैरागी यांनी दोन दिवसात पोलीस बंदोबस्तात शिवडा बंधाऱ्यातील लिकेज काढण्याचे आश्वासन कृषीमंत्र्यांना दिले होते. प्रत्यक्षात मात्र हे आश्वासन कृतीत यायला २४ एप्रिल उजाडणार आहे.

**गळतीच्या पाण्यातून टँकरचालकांची कमाई**

शिवडे येथे बंधाऱ्यात गळती होणाऱ्या पाण्यातून शेती पिकवली जाते. तर सोनांबे डगळे मळा आणि लोणारवाडी येथील पाण्यावर टँकर भरले जातात. त्यातून खासगी व्यावसायिक पैसे कमवतात. यावर माजी नगराध्यक्ष विठ्ठल उगले, माजी उपनगराध्यक्ष मेहमूद दारूवाला, अनिल वराडे, हर्षद देशमुख यांनी वारंवार आवाज उठवूनही नगरपालिकेने लिकेज थांबवण्यासाठी पुढाकार घेतला नाही. विशेष म्हणजे लाखो रुपयांचे वीजबिल नगरपालिकेला भरावे लागते. शिवाय गरजेपेक्षा कमी पाणी मिळत असल्याने पाणीटंचाईचाही सामना करावा लागतो.

**पाणी जपून वापरण्याचे आवाहन**

९ पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आणि नगरपालिका प्रशासन आणि कर्मचारी यांच्या देखरेखीखाली २४ एप्रिल रोजी शिवडा येथील बंधाऱ्यातील लिकेज काढण्याला प्रारंभ होणार आहे. तत्पूर्वी जलवाहिनी मोकळी होण्यासाठी बंधाऱ्यातील पाणी काढून द्यावे लागणार असल्याने त्यालाही काही वेळ जाणार आहे. त्यामुळे जर तीन दिवस हे काम चालले तर २४ ते २६ एप्रिलदरम्यान सिन्नर शहराचा पाणीपुरवठा बंद राहण्याची शक्यता नगरपालिका प्रशासनाने वर्तवली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



## नांदगाव राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शहराध्यक्ष यांचा शिवसेनेत प्रवेश

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव शहराचे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष दया सुनील जुन्नरे यांच्यासह शेकडो तरुणांनी आमदार सुहास कांदे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना दया जुन्नरे यांनी आमदार सुहास कांदे यांच्याकडून कार्यकर्त्यांना मिळणारा मानसन्मान मतदारसंघात केलेला विकास पाहून आम्ही शिवसेनेत प्रवेश करीत आहोत, याआधीचे राजकीय नेते फक्त निवडणुकीपर्यंत आले. आणीबाणीचा उपयोग करून घेतला पण आमदार कांदे हे नेहमी कार्यकर्त्यांची विचारपूस करतात. त्यांच्या सुखदुःखात सामील होतात म्हणून आम्ही सर्वांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

आमदार सुहास कांदे यांनी सर्व तरुणांचे पक्षात स्वागत करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख फरहान खान, अमोल नावंदर, तालुकाप्रमुख सागर हिरे, प्रकाश शिंदे, गंगाधरी येथील शाखाप्रमुख दिगंबर भागवत, माजी सरपंच सचिन जेजुरकर, भगीरथ जेजुरकर, सुनील खैरनार, संदीप खैरनार, मंगेश आहेर, दत्तात्रय सोमासे, संजय कमोदकर, संदीप खैरनार, मुकुंद खैरनार, गोकुळ जेजुरकर उपस्थित होते.

यावेळी दया जुन्नरे, सचिन सोमासे, सूरज कमोदकर, आशिष बागुल, दिगंबर जाधव, किरण जुन्नरे, अमोल जुन्नरे, रवींद्र जुन्नरे, अजय सापटे, धीरज कमोदकर, मनोहर सापटे, परसराम वाघ, पवन जाधव, आदित्य जाधव, सौरभ खैरनार, कृष्णा सोनवणे, ईश्वर पोने, सागर कळमकर, राहुल खुराटे, गौरव जाधव, सुशील जाधव, आदेश कमोदकर, काना खैरनार, रोशन वळावे, राजेश खैरनार आदींसह शेकडो तरुणांनी आमदार कांदे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.



## डॉ. निकम यांनी अभोणा महाविद्यालयाची केली पाहणी

**अभोणा : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्राचे नवनियुक्त वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. सर्जेराव निकम यांनी अभोणा महाविद्यालयातील ५४१११ या अभ्यास केंद्रास भेट देऊन लेडीज रूम, विद्यार्थ्यांच्या विविध सुविधांची तसेच अभ्यास केंद्र इमारत, ऑफिस, ग्रंथालय व प्राध्यापक दालनाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. दर्जेदार शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना सहाय्य करणे, अभ्यास केंद्रांचे पर्यवेक्षण करणे तसेच सुसूत्रीकरणासाठी विभागीय केंद्रांचे कामकाज कसे चालते, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.

एकाच वेळी दोन पदव्या घेण्याची संधी मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये कशी उपलब्ध आहे. त्यासाठी अभ्यासक्रम कोणते आहेत, याबद्दल त्यांनी चर्चा करून मार्गदर्शन केले. डॉ. निकम हे अभोणा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य असल्याने त्यांच्या भेटीमुळे नव्या व जुन्या अनुभवांची जणू काही उजळणीच झाली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. के. मगरे व सर्व प्राध्यापकांतर्फे स्वागत करण्यात आले.

## येवल्यात सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर

**येवला : प्रतिनिधी**

येवला प्रतिनिधी येवला तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायत सरपंचपद आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. येवला शहरातील तहसील कार्यालयाच्या सभागृहात आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार आबा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हर्षिता किरण पवार या ९ वर्षीय मुलीच्या हस्ते सोडत काढण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार पंकज मगर यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध प्रवर्गातील ९० ग्रामपंचायत आरक्षणाच्या सोडतीनुसार अनुसूचित जातीसाठी ०६, अनुसूचित जमातीसाठी १२, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २४ तर उर्वरित ४८ ग्रामपंचायत सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या. विविध प्रवर्गातील आरक्षणानुसार काहींचा हिरमोड झाला आहे तर अनेकांचे सरपंचपदाचे स्वप्न साकार होणार आहे. आरक्षणाची सोडत झाली असली तरी सरपंचपदी महिला की पुरुष याचा फैसला येत्या २४ तारखेला होणार असून, उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे यांच्या अध्यक्षतेखाली महिला आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. आपलेच आरक्षण निघावे यासाठी अनेकांनी देव पाण्यात बुडवून ठेवले आहेत.

तहसीलदार कार्यालयात काढण्यात आलेल्या सोडतीनुसार अनुसूचित जातीसाठी दुगलगाव, पिंपरी, गुजरखेडे, रेंडाळे, आहेरवाडी, तळवाडे अनुसूचित जमातीसाठी राहाडी, शिरसगाव लौकी, कोळगाव, डोंगरगाव, अंगुलगाव, मातुलठाण, निमगाव मढ, नांदूर, कुसूर, उंदीरवाडी, देशमाने बु., वाघाळे, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी बाळापूर, गारखेडे, मानोरी बु., लौकी शिरस, गणेशपुर, एरंडगाव बु., पिंपळखुटे बु., अनकुटे, चिचोंडी खु., धामणगाव, जळगाव नेऊर, कोटमगाव खु., नेऊरगाव, पिंपळगाव लेप, सावरगाव, अनकाई, आडगाव चोथवा, बोकटे, चांदगाव, खैरगव्हाण, महालखेडा पाटोदा, मुरमी, राजापूर, विसापूर यांचा समावेश आहे तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी आडगाव रेपाळ, आडसुरेगाव, आंबेगाव, अंदरसूल, अंगणगाव, बाभूळगाव खु., बलेगाव, भारम, भुलेगाव, चिचोंडी बु., देवरगाव, देवळाणे, धामोडे, धुळगाव, एरंडगाव खु., गवंडगाव, जऊळके, कानडी, कातरणी, खामगाव, खरवंडी, खिर्डीसाठे, कोटमगाव बु., कुसमाडी, ममदापूर, मुखेड, नागडे, नगरसूल, नायगव्हाण, नांदेसर, निळखेडे, पन्हाळसाठे, पांजरवाडी, पारेगाव, पाटोदा, पिंपळगाव जलाल, पुरणगाव, साताळी, सातारे, सायगाव, सोमठाणदेश, सुरेगाव रास्ता, ठाणगाव, विखरणी, देवठाण, कोळम बु., सत्यगाव, भाटगाव आदी गावांचा समावेश असून, यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात महिलांसाठीच्या आरक्षणाची सोडत होणार आहे.



## बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ

### आ. आशुतोष काळेंच्या हस्ते शुभारंभ

**वावी : वार्ताहर**

कोपरगाव तालुक्याच्या जिरायती भागातील गावात निळवंडे कालव्याचे पाणी पोहोचविण्यात येणाऱ्या अडचणी आ. आशुतोष काळेंच्या प्रयत्नातून दूर झाल्या आहेत. निळवंडे कालव्याचे पाणी जिरायती गावात पोहोचविण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला आहे. त्यामुळे जिरायती परिसरातील रांजणगाव देशमुख,अंजनापूर,बहादरपूर आदी गावातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

चालू वर्षी उन्हाळा अधिकच तीव्र स्वरूपाचा असल्यामुळे नागरीकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये यासाठी रांजणगाव देशमुख उजनी उपसा जलसिंचन योजनेसाठी स्वत: पदरमोड करणाऱ्या आ.आशुतोष काळे यांनी शासनाच्या वतीने ज्या काही उपाय योजना कराव्या लागतील त्या उपाय योजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिलेल्या आहेत. त्याचबरोबर नागरीकांच्या देखील पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत ज्या काही मागण्या असतील त्या मागण्या देखील पूर्ण करण्यात आ.आशुतोष काळे तत्पर असल्यामुळे शेतकऱ्यांनी चर खोदून देण्याची मागणी करताच त्या मागणीची त्वरित दखल घेवून त्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सदर चर खोदून देण्याच्या सुचना दिल्या होत्या.

त्या सूचनेनुसार प्रत्यक्षात निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ देखील करण्यात आला आहे. मागील अनेक दशकापासून जिरायती गावातील शेतकऱ्यांचा प्रश्न आ.आशुतोष काळे यांच्यामुळे मार्गी लागला आहे. त्यामुळे रांजणगाव देशमुख-अंजनापूर परिसरातील पाझर तलाव व बंधारे भरुन देण्यासाठी मोठी मदत होवून नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे. त्याबद्दल रांजणगाव देशमुख,अंजनापूर,बहादरपूर आदी गावातील नागरिकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

## सोनांबे शिवारातील हॉटेल रॉयलग्रीन पॅलेस फोडले

### तीन दिवसांत तिसरी घटना; ६८ हजारांची चोरी

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर-घोटी महामार्गावर सोनांबे शिवारात असलेल्या हॉटेल रॉयलग्रीन पॅलेस बार, लॉजिंग अ‍ॅण्ड रेस्टॅरंट या हॉटेलचे शटर वाकवून अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत २५ हजारांच्या रोख रकमेसह विदेशी मद्याच्या बाटल्या चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.२०) मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

सिन्नर-घोटी महामार्गावर सोनांबे शिवारात दीपक तुकाराम जगताप यांचे हॉटेल रॉयलग्रीन पॅलेस बार, लॉजिंग अ‍ॅण्ड रेस्टॉरंट आहे. रविवारी (दि.२०) रात्री ९.३० वाजता हॉटेल बंद करून जगताप घरी गेले होते. त्यानंतर अज्ञात चोरट्याने हॉटेलचे शटर वाकवून आत प्रवेश करत ५०० रुपये किमतीचा सी.पी. प्लस कंपनीचा डीव्हीआर, २१०० रुपये किमतीच्या अ‍ॅबसलुट व्होडका १८० मि.ली. च्या ०३ बाटल्या, २५५० रुपये किंमतीच्या जेमसन स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०३ बाटल्या, ४०८० रुपये किमतीच्या ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०६ बाटल्या, ३९०० रुपये किमतीच्या व्हॅट ६९ स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०६ बाटल्या, १९८० रुपये किंमतीच्या बॅगपायपर स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०३ बाटल्या, २६०० रुपये किंमतीच्या ग्रीन लेबल स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०४ बाटल्या, २०२५ रुपये किमतीच्या रॉयल रंथम स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०३ बाटल्या, १९५० रुपये किमतीच्या बॅलेंटाइन स्कॉच व्हिस्की १८० मि.ली.च्या ०३ बाटल्या, ४४०० रुपये किमतीच्या अँटीक्युटी ब्लू प्रिमियम व्हिस्की १८० मि.ली.च्या ११ बाटल्या, १२०० रुपये किमतीच्या ब्लेंडर प्राईड प्रिमियम व्हिस्की १८० मि.ली.च्या ०३ बाटल्या, ४५६० रुपये किमतीच्या रॉयल ग्रीन व्हिस्की १८० मि.ली.च्या २४ बाटल्या, ६६५० रुपये किमतीच्या रॉयल चॅलेंज व्हिस्की १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या, ३२३० रुपये किंमतीच्या बी-७ व्हिस्की १८० मि.ली.च्या १७ बाटल्या, ४५६० रुपये किमतीच्या रॉयल ग्रीन व्हिस्की १८० मि.ली.च्या २४ बाटल्या व २५०० हजार रुपयांची रोकड असा ६८ हजार ३२५ रुपयांचा माल चोरुन नेला. सोमवारी (दि.२१) सकाळी ९ वाजेच्या सुमारास चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर दिपक जगताप यांनी सिन्नर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. जगताप यांच्या फिर्यादीवरून सिन्नर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास हवालदार जाधव करत आहेत. दरम्यान, तीन दिवसांपूर्वी याच परिसरात अज्ञात चोरट्यांनी हॉटेल व बियर शॉपीत घरफोडी करुन मद्याची लुट केली होती. आता पुन्हा चोरट्यांनी हॉटेल, बियरबार यांना लक्ष्य केल्याने हॉटेल व्यावसायिकांत खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी हॉटेल व्यावसायिकांनी केली आहे.



## भोजापूर सोनेवाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ओळखपत्र वाटप

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दापूर केंद्रांतर्गत येणारी भोजापूर सोनेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांना व शिक्षकांना गोरक्षनाथ विठ्ठल थेटे यांच्या हस्ते ओळखपत्र वाटप करण्यात आले.

दापूर शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अमोल आव्हाड यांच्या संकल्पनेतून निंबाची वाडी शाळेचे मुख्याध्यापक रंगनाथ विठ्ठल थेटे यांच्या आर्थिक सौजन्याने स्व. विठ्ठल तुकाराम शेटे यांच्या स्मरणार्थ ओळखपत्र उपलब्ध करुन देण्यात आले. याप्रसंगी दापूर शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अमोल आव्हाड, मुख्याध्यापक प्रशांत हेकरे, रोहन शिंदे, साहिल सय्यद, ज्ञानेश्वर काकड, सचिन सहाने, मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता शेळके, कविता जगताप, नारायण नेहे, सुनील दातीर आदीं उपस्थित होते.

## दुसंगवाडीत कांदाचाळीला आग; ४ ट्रॅक्टर कांद्यासह सोयाबीनचे भुस भस्मसात

### अडीच लाखांचे नुकसान; नगरपालिकेची गाडी बंद, एमआयडीसी अग्निशमनने मागितला चार्ज

**सिन्नर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील दुसंगवाडी येथील शेतकरी आनंदा त्र्यंबक गोराणे (३६) यांच्या कांदाचाळीला अचानक आग लागल्याने ४ ट्रॅक्टर कांद्यासह जनावरांसाठी ठेवलेले सोयाबीनचे भुस आगीच्या भक्ष्यस्थानी पडून जळून खाक झाल्याची घटना सोमवारी (दि.२१) दुपारी ११.३० ते ११.४५ वाजेच्या सुमारास घडली.**



दुसंगवाडी येथे गोराणे मळा येथे आनंदा त्र्यंबक गोराणे हे कुटुंबीयांसह वास्तव्यास असून, शेतात त्यांची कांदाचाळ आहे. या कांदाचाळीत गोराणे यांनी ४ ट्रॅक्टर कांदे (सुमारे १२५ ते १५० क्विंटल) तसेच जनावरांसाठी सोयाबीनचे भुस साठवून ठेवले होते. सोमवारी रात्री ११.३० ते ११.४५ वाजेच्या सुमारास नारायण गोराणे यांना कांदाचाळीच्या पाठीमागील बाजूस आगीच्या ज्वाळा दिसल्याने त्यांनी आरडाओरड करून कुटुंबीयांसह लगतच्या शेतकऱ्यांना कांदाचाळीला आग लागल्याचे सांगितले. त्यानंतर गोराणे कुटुंबीयांसह लगतच्या शेतकऱ्यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

दरम्यान, गोराणे यांनी सिन्नर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला आग लागल्याची माहिती दिली. मात्र नगरपरिषदेची अग्निशमन गाडी नादुरुस्त असल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर गोराणे यांनी एमआयडीसीच्या अग्नीशामक दलाला बोलावले, मात्र त्यांनी ताशी १० हजार रुपये चार्ज मागितल्याने गोराणे यांच्या पायाखालची जमीनच सरकली. घटनेची माहिती वावी पोलिसांना समजल्यानंतर रात्री १.३० ते २.०० वाजेच्या सुमारास पोलिस घटनास्थळी पोहचले. तोपर्यंत गोराणे कुटुंबीयांनी विहीरीतील विद्युतपंप सुरु करून आग विझविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. अखेर मध्यरात्री ३ वाजेच्या सुमारास आग आटोक्यात आली.

या आगीत गोराणे यांचे ४ ट्रॅक्टर कांदे (सुमारे १२५ ते १५० क्विंटल) आगीमुळे खराब झाले तर ४६ हजारांचे सोयाबीनचे भुस भस्मसात झाल्याने गोराणे यांना सुमारे अडीच लाखांचा आर्थिक फटका बसला आहे.




'सीटू'चा तहसील कार्यालयावर मोर्चा — पान २

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



विरोधकांपेक्षा कामगारांना 'आपले'पणा भावला! — पान नं. २

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### उमराळे येथील गंगासागर धाब्यानजीक अपघातात एक ठार; एक जखमी

**उमराळे बु. : वार्ताहर**

गुजरात राज्याला जोडणाऱ्या नाशिक-पेठ महामार्गाजवळ असलेल्या उमराळे बु. नजीक असलेल्या गंगासागर धाब्याजवळ मोटारसायकल-पिकअप वाहनामध्ये अपघात झाला असून, एक जण जागीच ठार झाला असून, एक जण जखमी झाला आहे. याबाबतची माहिती नरेंद्रचार्य महाराज विनामूल्य रुग्णवाहिका चालक बापू खिरकाडे यांना मिळताच, त्यांना नाशिक ग्रामीण रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. मिळालेली माहिती अशी की, नाशिक - पेठ राष्ट्रीय महामार्गावरील गंगासागर धाब्याजवळ अज्ञात पिकअपने मोटारसायकल क्रमांक एम. एच.१५ के. ए.३७८९ या मोटारसायकलला पिकअपने जोरदार धडक दिल्याने, मोटारसायकलवरील राहुल दिनू बागुल, वय-अंदाजे २४ हा जागीच ठार झाला. चांगदेव अमृता गायकवाड, रा. निगडोळ, ता. दिंडोरी हे गंभीर जखमी झाले. त्यांना नरेंद्रचार्य महाराज विनामूल्य रुग्णवाहिकाने नाशिक ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नाशिक-पेठ महामार्गावरील उमराळे बु.पासून दोन किलोमीटरच्या अंतरापुढे अपघाताची मालिका सतत चालू असून, यात संबंधित अधिकारी यांनी लक्ष घालून वाहन कसे चालवावे याबाबतचे फलक महामार्गावरील बाजूला लावण्यात यावे.

### नाशिकरोड नागरी सह. पतसंस्थेस १ कोटी ३१ लाख रु. नफा

**नाशिकरोड :** येथील जेलरोड मोटवानी रोडवरील व्यापारी




व्यावसायिकांनी सुरू केलेली आणि नाशिक तालुक्यात अग्रगण्य ठरलेली नाशिकरोड नागरी सहकारी पतसंस्थेस या आर्थिक वर्षअखेर १ कोटी ३१ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन अरुण भोर यांनी दिली. संस्थेकडे ५३ कोटी १० लाख रुपयांच्या ठेवी आहे. हे संस्थेवरील सभासद, हितचिंतकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे, असेही ते म्हणाले. व्हा. चेअरमन ॲड. परमानंद गुजराथी म्हणाले, संस्थेने ४३ कोटी ३७ लाख रुपये कर्जरूपाने वाटप केले आहे. तर मार्चअखेर संस्थेकडे १५ कोटी ८८ लाखांचा निधी उपलब्ध आहे. तर संस्थेचा एकूण व्यवसाय ९६ कोटी ४७ लाख रुपये झाला आहे. संस्थेचे वसूल भागभांडवल २ कोटी ९५ लाख असून, खेळते भागभांडवल ७८ कोटी ८० लाख आहे. संस्थेची एकूण गुंतवणूक ३१ कोटी २० लाख असल्याचेही त्यांनी सांगितले. संस्थेच्या सेक्रेटरी डॉ. ज्योत्स्ना डुंबरे म्हणाल्या, संस्थेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत असून, कोअर बँकिंग प्रणाली कार्यान्वित आहे. त्यामुळे सभासदांना तत्पर सेवा मिळू शकते, असेही त्या म्हणाल्या. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास गायखे, ज्येष्ठ संचालक डॉ. विलास गुजराथी, कांतीभाई पटेल आदींसह सर्व संचालक व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.




### भारतीय बौद्ध महासभा महिला कार्यकारिणी आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा महिला कार्यकारिणीच्या वतीने कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर २२ एप्रिल रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत महाकर्मभूमी बुद्धविहार, नाशिकरोड या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. शिबिरास प्रमुख अतिथी भारती शिराळ, केंद्रीय महिला विभाग सचिव, वैशाली आहिरे, केंद्रीय सदस्य महिला विभाग यांची उपस्थिती लाभली. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेखा लोखंडे, नाशिक जिल्हाध्यक्षा या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला वाघमारे, मीना साळवे यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी कविता बोर्डे, वंदना वाहुळे, सविता पवार, वैशाली आठवले, सरिता जगताप, रेखा दिवे, अलका दोंदे, वनिता मोरे, छाया सुरवाडे, वर्षा वनिस, सुशीला जाधव, कमल लोखंडे, माधुरी निकाळे, वंदना निकम, वंदना गायकवाड आदींसह संपूर्ण नाशिक जिल्हा पश्चिम महिला कार्यकारिणी उपस्थित होती.

### खेरवाडीला तानाजी महाराज कदम यांचे प्रवचन

**कसबे-सुकेणे :** निफाड तालुक्यातील खेरवाडी येथे निलांजन बहुद्देशीय ट्रस्टच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या वद्य एकादशीला प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्याचा नित्यनेम, स्तुत्य उपक्रम चालू आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवार दिनांक २४ एप्रिल रोजी वरुथिनी एकादशीनिमित्त ख्यातनाम प्रवचनकार हभप तानाजी महाराज कदम तास दिंडोरी यांचे प्रवचन सायंकाळी पाच वाजता नाथ माऊली सदन येथे आयोजित करण्यात आले आहे. या वेळची प्रवचन सेवा सामाजिक कार्यकर्ते रामनाथ बाबूराव संगमनेरे यांनी घेतली असून, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत बाजीराव जाधव यांच्यातर्फे उपस्थित भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. ट्रस्टचे सदस्य ग्रामस्थ व भाविकांनी प्रवचन श्रवणास उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. पी. डी. पाटील, उपाध्यक्ष अशोकराव कापसे, खजिनदार बाळासाहेब संगमनेरे, बाबाजी संगमनेरे, रमेश संगमनेरे, रामनाथ संगमनेरे, चंद्रकांत जाधव व विश्वस्त मंडळाने केले आहे.

### मोडी लिपी स्पर्धेचे आयोजन

**नाशिक :** वैभवशाली प्राचीन लिपी ट्रस्ट नाशिक आयोजित सुंदर मोडी लिपी हस्ताक्षर व लिप्यंतर स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. दरवर्षीप्रमाणेच यावर्षीसुद्धा ही स्पर्धा ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी वयाची मर्यादा नसल्याने सर्वांसाठी स्पर्धा खुली असणार आहे. सुट्टीच्या दिवशी प्रवासात असल्याने बऱ्याच स्पर्धकांना स्पर्धा देता येत नसल्यास या वर्षी सायं. ८ ते १० या वेळेमध्ये आयोजित केली जाणार आहे. दोन्ही स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकाला रोख बक्षीस व इतर सर्व स्पर्धांना इ-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी करण्यासाठी सोज्वळ साळी : ८२०८५६५१७६, रोहित सरोदे : ९४२१६३३३८१, नीलेश खांगटे : ९८८१२२३३२८ यांच्याशी संपर्क साधावा.

# बाह्यरिंगरोडला चाल; सिंहस्थ आराखड्याला मंजुरीची प्रतीक्षा

## शासनाच्या भूमिकेवर प्रश्न; लोकप्रतिनिधींत आश्चर्य

**नाशिक : प्रतिनिधी**

**बाह्यरिंगरोडसाठी दहा हजार कोटींचा खर्च अपेक्षित असल्याने रिंगरोडचा विषय बारगळण्याची शक्यता होती. मात्र, राज्य शासनाने या परिक्रमा मार्गाला चाल दिली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारच्या झालेल्या बैठकीत नाशिकच्या बाह्यरिंगरोडचा अहवाल दहा दिवसांत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, राज्य शासन एकीकडे बाह्यरिंगरोडबाबत भूमिका घेत असताना, दुसरीकडे महापालिका प्रशासनासह इतर विभागांनी सादर केलेल्या पंधरा हजार कोटींच्या सिंहस्थ आराखड्यावर कुठलीही कार्यवाही शासनाकडून होत नसल्याने यावरून आश्चर्य व्यक्त होत आहे.**




आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी बाह्यरिंगरोड करण्याची मागणी होत होती. त्यानुसार बाह्यरिंगरोडबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याचे दिसते आहे. दरम्यान, सिंहस्थ कुंभमेळ्याला गती येण्याचे अपेक्षित असताना सद्यस्थित तसे कुठेही दिसत नसल्याचे चित्र आहे. पंतप्रधानांचे सल्लागार तरुण कपूर यांनी शुक्रवारी (दि.१८) व्हीसीद्वारे मनपाने कुंभमेळ्यासाठी केलेल्या पंधरा हजार कोटींच्या विकास आराखड्याची माहिती घेत नियोजनाचा आढावा घेतला.

त्यांच्याकडून सिंहस्थ तयारीला चाल मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु त्यांनी आढावा घेण्यापलीकडे काही केले नसल्याचे दिसून आले. यामुळे सिंहस्थाची कामे वेळेत कशी होणार, असा सवाल केला जातो आहे. राज्य शासनापाठोपाठ पीएमओ कार्यालयाने नाशिककरांची प्रचंड निराशा केल्याचे पहायला मिळाले. शासनाने सिंहस्थासाठी प्राधिकरणाची घोषणा केली असली तरी अद्याप त्याबाबत कोणतीही हालचाल होत नाही.

पंतप्रधान कार्यालयाकडून सिंहस्थाचा आढावा घेणार असल्याने त्यातून सकारात्मक बाब समोर येईल, अशी शक्यता होती. सिंहस्थ आराखड्याचे कागदावरच जोरदार नियोजन असून, मनपा अधिकारी सिंहस्थ बैठका व सादरीकरणाला अक्षरश: वैतागले आहे. सिंहस्थाची कामे प्राधिकरणाद्वारे होणार असली तरी अवघ्या पावणेदोन वर्षात दोन मोठे पूल, रिंगरोड, साधुग्रामसाठी भूसंपादन, एसटीपी उभारणे ही कामे निर्धारित वेळेत होणे अशक्य असून, निकृष्ट कामे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**बैठकांचा धडाका**

राज्य शासन सिंहस्थाच्या आराखड्याबाबत कुठलाही निर्णय घेत नसले तरी इकडे नाशिकमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात दर मंगळवारी बैठकांचा धडाका सुरू आहे. महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन या विभागांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित राहत असून, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मनपा आयुक्त मनीषा खत्री आदींसह इतर यंत्रणांचे प्रमुख उपस्थित असतात.



### बोरीचीबारी गावात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर

#### ग्रामपंचायतीकडून तात्पुरत्या उपाययोजना सुरू

**नाशिक : प्रतिनिधी**

बोरीचीबारी (ता. पेठ) या गावात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. सदर परिस्थितीबाबत समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

स्वदेश फाउंडेशनमार्फत दोन वर्षांपूर्वी राबविण्यात आलेल्या नळपाणीपुरवठा योजनेतून फेब्रुवारी २०२५ पर्यंत गावाला पाणी मिळत होते. मात्र, सध्या तो पुरवठा बंद असून, एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत सार्वजनिक विहिरीतून पाणीपुरवठा करण्यात येत होता. विहिरीतील पाणीसाठा कमी झाल्याने ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना राबवून टँकरच्या दोन खेपा वापरात असलेल्या विहिरीत टाकल्या आहेत.

ग्रामस्थांनी विहिरीत पाणी टाकण्यास नकार दिल्याने, पाणी ड्रमद्वारे घराघरात पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायतीकडून २० एप्रिलपासून टँकरद्वारे पाणी वाटप सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या जलकुंभ व नलिकेच्या कामावर आतापर्यंत रु. १२३.६९ लाख खर्च झाल्याची माहिती असून, जून २०२५ पर्यंत योजना पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे उद्दिष्ट आहे.

### पेसा क्षेत्रातील सरपंचपदाचे महिला आरक्षण आज जाहीर होणार

#### ३७९ जागा एससी, एसटी, मागाससाठी राखीव

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील कळवण, इगतपुरी, त्र्यंबक आणि सुरगाणा या तालुक्यांतील तसेच देवळा, दिंडोरी, इगतपुरी, बागलाण, नाशिक येथील अंशत: पेसा क्षेत्रातील एकूण ५७८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण आज बुधवारी (दि.२३) आणि गुरुवारी (दि.२४) जाहीर होणार आहे.

याशिवाय पेसा क्षेत्राबाहेरील ८१० ग्रामपंचायतींचे आरक्षण सोमवारी (दि.२२) जाहीर झाले असून, यातील तब्बल ३७९ जागा या एससी, एसटी आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यासाठी राखीव झाल्या आहेत.

ग्रामपंचायती करिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सुमारे १,३८७ जागा असून, त्यांची सोडत सोमवारी (दि. २१) काढण्यात आली. यामध्ये ७०४ जागा महिला सरपंचपदासाठी राखीव आहे. जिल्ह्यातील नाशिक, देवळा, नांदगाव, दिंडोरी, मालेगाव आणि येवला येथील ३७९ जागांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामपंचायतींमधील सरपंचांच्या जागा आरक्षणनिहाय अंतिम केल्या. या जागांमध्ये नाशिक जिल्ह्यातील ८१० गावांचा समावेश असल्याने त्या गावांमध्ये ही आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.

जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमधील ग्रामपंचायतीमध्ये महिला आरक्षण बाकी असल्याने त्यासाठी आता २३ व २४ एप्रिल रोजी महिला सरपंचांची पदे राखीव करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे. शासनाच्या नियमानुसार ५० टक्के पदे ही महिलांकरिता राखीव ठेवायची असल्याने त्याची संख्या निश्चित असली तरी कोणत्या ग्रामपंचायतीत महिला आरक्षण असेल हे त्याच वेळेस स्पष्ट होईल.

### जनसुरक्षा विधेयक तातडीने रद्द करा

#### भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**नाशिक : प्रतिनिधी**

व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्याच्या नावाखाली शासनाने प्रस्तावित केलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक-२०२४ हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. कायदेशीर मार्गाने एखादी व्यक्ती, संस्था, संघटना मोर्चे, आंदोलने करत असल्यास त्यांना बेकायदेशीर ठरवून तुरुंगात टाकण्याचा कुटिल डाव या कायद्याद्वारे खेळण्यात येणार आहे. तत्राप जनसुरक्षा विधेयक त्वरित रद्द करण्यात यावे, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केली आहे. सदर मागणीसाठी पक्षाच्या वतीने मंगळवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.




जनसुरक्षा विधेयक रद्द करा, या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना आंदोलनकर्ते.

यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे डॉ. डी. एल. कराड यांनी सांगितले की, देश व देशातील जनतेच्या हिताला व सुरक्षेला बाधा आणणाऱ्या बेकायदा हिंसक कृत्यांचा बंदोबस्त कुणी केला तर त्याचे स्वागतच आहे. मात्र, या कायद्याआडून अन्याय, अत्याचार आणि विषमतेविरोधात लोकशाही मार्गाने लढणाऱ्या व्यक्ती व संघटनांना घेरणे देशातील लोकशाहीला बाधक आहे, बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटनांना प्रतिबंध करण्यास सक्षम असे अनेक कायदे अस्तित्वात असताना नव्या कायद्याची गरज काय, असाही प्रश्न यावेळी डॉ. कराड यांनी विचारला.

महाराष्ट्रामध्ये नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम करणारे हे विधेयक त्वरित रद्द करावे, अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. लोकशाही विरोधी जनसुरक्षा विधेयक रद्द करा, अभिव्यक्ती विरोधी जनसुरक्षा विधेयक रद्द करा, संविधानविरोधी जनसुरक्षा विधेयक रद्द करा आदी घोषणाही यावेळी देण्यात आल्या. निदर्शनास कॉ. राजू देसले, राज्य सहसचिव (भारतीय कम्युनिस्ट पक्ष), कॉ. महादेव खुडे, जिल्हा सचिव(भारतीय कम्युनिस्ट पक्ष), डॉ. डी. एल. कराड (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), तानाजी जायभावे (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष) यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजकांचे सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावणार

#### पी. वेलारासू यांचे निमा व आयमा शिष्टमंडळास आश्वासन

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक जिल्ह्यातील उद्योजकांचे एमआयडीसीशी संबंधित असलेले सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू यांनी निमा व आयमा शिष्टमंडळास दिले. एमआयडीसीचे मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण हेसुद्धा यावेळी उपस्थित होते.**



नाशिकच्या उद्योजकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लागावे यासाठी निमा अध्यक्ष आशिष नहार व आयमा अध्यक्ष ललित बूब यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुंबईत पी. वेलारासू यांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन सादर केल्यानंतर पी. वेलारासू बोलत होते. शिष्टमंडळात निमाचे उपाध्यक्ष मनीष रावल व किशोर राठी, सचिव राजेंद्र अहिरे व कैलास पाटील यांचा समावेश होता.

निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सीईटीपी प्रकल्पासाठी एमआयडीसी ७० टक्के निधी देणार आहे व उर्वरित ३० टक्के भार हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उद्योजकांनी संयुक्तरीत्या उचलायचा आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने खर्चाचा जास्त वाटा उचलावा, अशी मागणी नहार यांनी केली असता त्याबाबत शासन स्तरावर चर्चा करण्याचे आश्वासन पी. वेलारासू यांनी दिले.

आयमा अध्यक्ष ललित बूब यांनी अंबड फायर स्टेशनकडून उद्योजकांना आकारले जाणारे फायर चार्जेस २४ मार्चनंतर स्थगित केलेले असतानाही उद्योजकांना डीपीसी चार्जेस येतात ही बाब अन्यायकारक असून, हे चार्जेस माफ करावे, अशी मागणी केली असता उद्योजकांची ही मागणी न्याय्य असून, त्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला जाईल, असे अभिवचन पी. वेलारासू यांनी दिले.

दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडोर दुसऱ्या टप्प्यात नाशिकचा समावेश व्हावा या मुद्द्यावर उद्योजकांनी जोर दिला असता त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे पी. वेलारासू यांनी सांगितले. नाशिकमध्ये मेगा प्रकल्प व्हावेत यासाठी एमआयडीसीने महत्त्वाची भूमिका बजवावी, अशी मागणी केली असता आम्ही या प्रकल्पासाठी निश्चितच लक्ष घालू व नाशिक जिल्ह्यात मेगा प्रकल्प सुरू करून रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देऊ, असेही पी. वेलारासू यांनी शेवटी सांगितले.

### चार महिला उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी पदोन्नती

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील चार महिला उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी पदोन्नती मिळाली आहे. पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये उपजिल्हाधिकारी (मनरेगा) सुरेखा चव्हाण, निफाड प्रांताधिकारी हेमांगी पाटील, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) स्वाती थविल आणि पल्लवी निर्मळ यांचा समावेश आहे.

शासनाने मंगळवारी (दि.२२) राज्यातील १९ उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी बढती दिली आहे. या अधिकाऱ्यांमध्ये नाशिकच्या चव्हाण यांची पदोन्नतीनंतर मुंबईतील येथे सिडको येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

हेमांगी पाटील यांना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर सहआयुक्त (प्रशासन) या पदावर नेमणूक मिळाली आहे. थविल यांची राज्य माहिती आयोग नाशिकच्या उपसचिव तर निर्मळ यांना पुण्याच्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी शासनाने नियुक्ती केली आहे.

कुंदनकुमार सोनवणे यांच्याकडे नंदुरबार येथील सरदार सरोवर प्रकल्पाच्या अपर जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. सोनवणे यांनी यापूर्वी विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात विविध पदांवर काम केले आहे.

राहुल पाटील यांची पुणे येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या महाव्यवस्थापक पदी नियुक्ती झाली आहे. पाटील हे पूर्वी नाशिक जिल्ह्यात कार्यरत होते. शासनाने गेल्या महिन्यात राज्यातील १३० उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकारी निवडश्रेणीत पदोन्नती दिली होती. तेव्हापासून या अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी बढतीचे वेध लागले होते.



सेन्सेक्स ७९,६५० वर : निफ्टीही तेजीत पान ३

# नाशिक आज गांवकरी



तूरडाळीच्या दरात घसरण होण्याची शक्यता पान ३

नाशिक, बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५


## महत्त्वाचे



### जेलरोडला अग्निशमन प्रात्यक्षिके

**नाशिकरोड : प्रतिनिधी** जेल रोड येथील सेंट फिलोमिना शाळेत केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलातर्फे (सीआयएसएफ) अग्निशमनची प्रात्यक्षिके झाली. आग लागू नये तसेच लागल्यास काय खबरदारी घ्यावी, आग कशी विझवावी याची माहिती आणि प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. सीआयएसफ नाशिकरोडच्या सरकारी प्रेसच्या सुरक्षेचे काम पाहते. या दलाचे जवान मुकेश चतुर्वेदी, सुधीरकुमार ओझा, संजय मोरे, रामदास रहाटे, सचिन सोमवंशी, भारत निकाळजे, ओ. पी. कुशवाह, विजय कुमार आदींनी ही प्रात्यक्षिके दाखवली.



### एकदिवसीय क्रीडा स्पर्धेत फायरमन विद्यार्थ्यांचा विजय

**नाशिक : प्रतिनिधी** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे नाशिकरोड येथे एकदिवसीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. संस्थेतर्फे नाशिकरोड येथील मुक्तिधाम येथे झालेल्या स्पर्धेत स्वच्छता निरीक्षक आणि फायरमनच्या विद्यार्थ्यांमध्ये क्रिकेट आणि कबड्डी या दोन विभागांत स्पर्धा रंगली. यात फायरमनच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक जगदीश पवार यांच्या हस्ते व क्रिकेटपटू आदित्य कपिले यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा माजी नगर-सेवक संभाजी मोरूस्कर यांच्या हस्ते व संस्थेचे विभागीय संचालक जीवन सोनवणे यांच्या उपस्थितीत झाला. मोरूस्कर यांनी खेळाडूंनी एकसंघपणे प्रदर्शन केल्यास यश नक्कीच मिळते. खेळाडूंनी कौशल्य टिकवून ठेवले पाहिजे. फायरमनच्या विद्यार्थ्यांना मजबूत आणि काटक राहावे लागते. आजच्या स्पर्धेत त्यांनी विजेता होऊन यश संपादन केल्याबाबत अभिनंदन केले. संयोजन फायर प्रशिक्षक अभिजित बनकर, आसावरी दातार यांनी केले. यावेळी प्राचार्य के. एम. सोनवणे, डॉ. दिलीप मेनकर, अक्षदा आहेर, दुर्गेश भामरे, विकास सोनवणे, रूपेश दाणी उपस्थित होते. आभार संस्थेचे संचालक जीवन सोनवणे यांनी मानले. विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

### विजयदुर्ग जलतरण स्पर्धेत चमकदार कामगिरी

**द्वारका : वार्ताहर** नुकत्याच पार पडलेल्या 'विजयदुर्ग खुल्या जलतरण स्पर्धा २०२५' मध्ये नाशिकच्या जलतरणपटूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले.



स्पर्धेत पंचवटी जलतरण तलावात सराव करणाऱ्या खेळाडूंनी विविध गटांमध्ये यश संपादन केले. ५०० मीटर गटात समिधा गेंगजे हिने द्वितीय क्रमांक पटकावला, तर १ किलोमीटर गटात कनिष्क नाईक याने तृतीय स्थान मिळवले. यासोबतच, २ किलोमीटर गटात आयु आलोद्रिया हिने देखील तिसरे स्थान प्राप्त केले. या खेळाडूंना प्रशिक्षक संकेत कंसारा आणि प्रसाद खैरनार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कठोर परिश्रमामुळेच या खेळाडूंनी हे यश मिळवले, असे क्रीडाप्रेमींकडून बोलले जात आहे. नाशिकच्या जलतरणपटूंच्या या कामगिरीमुळे शहरात आनंदाचे वातावरण आहे.

### करंजगाव येथे एकादशीनिमित्त भजन

**कसबे-सुकेणे :** निफाड तालुका वारकरी महामंडळाच्या वतीने दर पंधरा दिवसांच्या एकादशीला निफाड तालुक्यातील वेगवेगळ्या गावी वारकरी सांप्रदायिक भजन घेण्याचा नित्यनेम, स्तुत्य उपक्रम अनेक वर्षांपासून चालू आहे. गुरुवार दिनांक २४ रोजी अस-लेल्या वरुथिनी एकादशीनिमित्त निफाड तालुक्यातील करंजगाव येथील खंडेराव महाराज मंदिरात दुपारी बारा ते चारपर्यंत वारकरी सांप्रदायिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे. निफाड तालुक्यातील व बाहेरील गायक, वादक व भजनी मंडळ भजनानंद घेणार आहेत. भाविकांनी भजन श्रवणाचा आनंद घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ करंजगाव तसेच निफाड तालुका वारकरी महामंडळ पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांसाठी बुद्धिमत्ता विषयावर स्पर्धा

**नाशिक:** एस. आय. पी. अकादमीच्या वतीने नाशिक येथील रुंगठा हायस्कूल (रविवार कारंजा) येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी मल्टी टॅलेंट स्पर्धेचे आयोजन येत्या २७ एप्रिल (रविवार) रोजी करण्यात आले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये संख्यात्मक क्षमता तार्किक विचारसरणी, अनुभवात्मक शिक्षण, माहितीचे विश्लेषण, मूल्यमापन आणि विश्लेषण, समस्या सोडवणे, निरीक्षण कौशल्ये, संवाद कौशल्ये इत्यादी कौशल्यांना अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलेले आहे. अर्थात विविध बुद्धिमत्ता आणि बहुआयामी प्रतिभा विकस-नावर भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी इयता १, २, इयत्ता ३, ४ आणि इयत्ता ५, ६ याप्रमाणे तीन गट करण्यात आले असून, अंकगणित, सामान्य इंग्रजी, क्षमता आणि कौशल्ये, रंगभरण, बुद्धिमत्ता विकास या विषयांवर अभ्यासक्रम निश्चित करण्यत आला आहे. प्रत्येक गटातील विजेत्यांना अनुक्रमे रु.३०००/-, रु.२०००/- आणि रु.१०००/- रोख पारितोषिके, स्मृतिचिन्ह आणि सहभागी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. एस.आय.पी. अकादमी आंतरराष्ट्रीय स्तरावर मुलांच्या कौशल्य संवर्धनासाठी गेल्या २३ वर्षांपासून कार्य करीत आहे. भारतात १००० पेक्षाही अधिक केंद्रांच्या माध्यमातून एस.आय.पी. अकादमी शालेय विद्यार्थ्यांच्या कौशल्य संवर्धनासाठी अविरत परिश्रम घेत आहे. अधिक माहितीसाठी क्षेत्रीय कार्यालय (अशोका मार्ग नाशिक); ९७६४६९५१५८, ८७६७०२६५७३ ,९२२५१२४३११ २. मेरी दिंडोरी रोड : ८१७७८४२३२८. जेल रोड : ९३७०३३०२९५. तिडकेनगर : ९२२१८२०८१२. बळी मंदिर : ९९७५५६३७७७, इंदिरानगर : ९०११३१३२९. पाथर्डी फाटा : ७०२८४१३५५५.

# भाजपा आमदारांकडून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

## हुसेन दलवाई : आ. फरांदेंना अटक करण्याची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात भाजपाच्याच आमदारांकडून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. दर्ग्याचा उल्लेख त्यांच्याकडून थडगे असा करण्यात येतो. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या जातात, सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या आ. देवयानी फरांदे यांना अटक करा, अशी मागणी काँग्रेसचे माजी खासदार हुसेन दलवाई यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी निरंजन टकले, काँग्रेसचे ज्ञानेश्वर काळे, हाजी तन्वीर तांबोळी, स्वप्निल पाटील, जयेश पोकळे, अजीज पठाण, फारूक मन्सुरी आदी उपस्थित होते.

सातपीर दर्ग्याची पाहणी करण्यासाठी नाशिक दौऱ्यावर आलेल्या हुसेन दलवाई यांनी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

दलवाई पुढे म्हणाले, कोणतीही दंगल तत्काळ घडत नसते. त्यासाठी तशी वातावरण निर्मिती करण्यात येते. नाशकात हिंदू-मुस्लिम यांचा सलोखा आहे. मात्र, भाजपाच्या स्थानिक आमदारांकडून गेल्या सहा महिन्यांपासून विविध प्रक्षोभक विधाने करण्यात येत आहेत. राज्यात कायदा-सुव्यवस्था हा प्रकार राहिलेला नाही. पोलिसांवर सरकारचा दबाव असून, सरकारच्या दबावात त्यांना काम करावे लागत असल्याचा आरोपही दलवाई यांनी केला. यासंदर्भात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व राज्यपाल यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



### कोर्टात प्रकरण असताना कारवाई चुकीची

प्रकरण न्यायप्रविष्ट असताना मनपा प्रशासनाकडून जी कारवाई करण्यात आली, ती चुकीची असल्याचा आरोपही दलवाई यांनी केला. त्याचप्रमाणे पोलिसांवर हल्ला कोणत्याही धर्मीयांकडून होत असेल अथवा कोणत्याही प्रकारच्या हिंसेचा मी जाहीर निषेध करतो, असे वक्तव्यही त्यांनी केले.

### निर्दोष व्यक्तींना सोडण्याची मागणी

पोलिसांवर दगडफेक झाल्यानंतर पोलिसांनी अटकसत्र राबवत अनेकांना अटक केली. यात काही निर्दोष लोकांनाही पोलिसांनी अटक केली असून, या निर्दोष लोकांना सोडण्याची मागणी दलवाई यांच्याकडून पोलिसांना करण्यात आली. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनीही अटक करण्यात आलेल्यांची छाननी करून त्यांना निर्दोष सोडून देण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# रामकाल पथ प्रकल्पाच्या २१ कोटींच्या कामांना मंजुरी

## सिंहस्थापूर्वी साकारणार आध्यात्मिक कॉरिडोर

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने नाशिक महापालिकेला शंभर कोटींचा निधी रामकाल पथ हा प्रकल्प साकारण्यासाठी मंजूर केला आहे.

पंचवटीतील रामकुंड, गोदाकाठ, काळाराम मंदिर व सीतागुंफा या पौराणिक महत्त्व असलेल्या परिसरात आध्यात्मिक कॉरिडोर तयार केला जाणार आहे. रामायणातील प्रसंगावर आधारित शिल्प या प्रकल्पातून साकारले जाणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामासाठी २१ कोटींची निविदा बांधकाम विभागाने प्रसिद्ध केली आहे.

रामकालपथचे मॉडेल तयार करण्यासाठी एचसीपी या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली आहे. या संस्थेने याआधी साबरमती रिव्हर फ्रंट, काशीविश्वनाथ कॉरिडोरसारख्या मोठ्या प्रकल्पांसाठी काम केले आहे. गोदाघाट व मंदिर परिसर, अनेक जुने वाडे, इमारती, छोटी-मोठी मंदिरे यांचे सर्वेक्षण केले. रामकालपथ प्रकल्पांतर्गत येथे रामायणावर आधारित शिल्प उभारले जाणार आहे. त्यास अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कॉरिडोर साकारल्या जाणाऱ्या परिसराचे ड्रोन सर्वेक्षण करण्यात आले. ते पूर्ण झाले असून, या प्रकल्पावर काम करताना त्याचे तीन ते चार टप्पे करण्यात आले आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २१ कोटींचे काम केले जाणार असून, त्यासाठी काही स्थळे निश्चित करण्यात आली. आता या कामासाठी निविदाही प्रसिद्ध करण्यात आली. लवकरच कामाला सुरुवात केली जाईल. महापालिकेने केंद्राकडे रामकाल पथसाठी १४२ कोटींची मागणी केली होती. त्यातील शंभर कोटींचा निधी केंद्राने मंजूर केला. मात्र, उर्वरित ४२ कोटी निधी राज्याच्या पर्यटन विभागाने घ्यावेत, अशी मागणी पालिकेची असून, दोन महिन्यांपासून राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

### पोलिसांच्या परवानगीने ड्रोन सर्वेक्षण

परिसराचे ड्रोन सर्वेक्षण गरजेचे आहे. पोलिसांच्या परवानगीशिवाय शहरात ड्रोन उडवता येत नाही. त्यामुळे मनपाने पोलीस प्रशासनाची मंजुरी घेत रामकुंड, गोदाघाट व काळाराम मंदिर परिसराचे ड्रोन सर्वेक्षण पूर्ण केले.




> पहिल्या टप्प्यातील २१ कोटींच्या कामांसाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. लवकरच रामकाल पथच्या कामाला सुरुवात केली जाईल.
> **- संजय अग्रवाल,** शहर अभियंता, मनपा



**भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेच्या बक्षीस समारंभप्रसंगी बक्षिसाचे वाटप करताना ललित गांधी, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर आदी.**

# पंचवटीत पथदीपांवर ३३ लाखांचा खर्च

## 'स्थायी'च्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर

**नाशिक : प्रतिनिधी** पंचवटी प्रभाग क्र. २ मधील नव्याने विकसित झालेल्या नागरी वस्तीत पथदीप बसवण्यासाठी स्थायीवर ३३ लाखांच्या खर्चाचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. पाच कंपन्यांनी सदर निविदेत सहभाग घेतला. यावेळी अवनीश एन्टरप्राइजेस संस्थेचे दर सर्वांत कमी आले. संबंधित मक्तेदार कंपनीशी करारनामा कार्यारंभ आदेश मान्यता द्यावी. यासाठीचा प्रस्ताव महापालिकेच्या यांत्रिकी विभागाने स्थायी समितीवर ठेवला आहे.

महापालिकेच्या नाशिकरोड, नवीन नाशिक, सातपूर, पंचवटी, पश्चिम व पूर्व विभागातील सार्वजनिक ठिकाणातील पथदीपचे काम मनपाच्या यांत्रिकी विभागाकडून केले जाते. पश्चिम, पूर्व विभाग सोडला तर चार विभागांच्या सीमा वाढून नव्याने वसाहतींची सख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशावेळी महापालिकेला पथदीपची सुविधा करण्याची जबाबदारी असते. दरम्यान, पंचवटीतील प्रभाग दोनमध्ये पथदीपसाठी १२ ते १८ ऑक्टोबर २०२४ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, त्याचवेळी विधानसभा निवडणुका असल्याने डिसेंबर २०२४ मध्ये नव्याने फेरनिविदा काढण्यात आली. त्यावेळी पाच पात्र मक्तेदारांनी अर्ज केले असता त्यात अवनीश एन्टरप्रायजेस संस्थेचे दर न्यूनतम असल्याने सदर मक्तेदारास काम मिळावे, याबाबतचा प्रस्ताव स्थायीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे.

# भगवान महावीरांचे विचार आजही जगासाठी प्रेरक : ललित गांधी

## महावीर निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात


**नाशिक : प्रतिनिधी**

अडीच हजार वर्षांनंतरही भगवान महावीरांचे विचार जगासाठी प्रेरक आहेत. भगवान महावीरांचे विचार कुणाची मक्तेदारी नाही. जगाला आज शांततेची आणि संयमाची गरज आहे. परस्पर प्रेम आणि बंधुभावामुळेच स्नेहभाव टिकून राहू शकतो. यास्तव आजच्या पिढीने पुढच्या पिढीला भगवान महावीरांचे विचार प्रदान करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त शासनातर्फे राज्यभरातील शाळांमध्ये 'भगवान महावीरांचे विचार' या विषयावर सप्टेंबर - २०२४ मध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातील १३६० अनुदानित व विनाअनुदानित तसेच सर्व माध्यमांच्या खासगी तसेच शासकीय शाळांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली. पैकी पहिल्या गटात इयत्ता ५ वी ते ७ वी व दुसऱ्या गटात इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत जिल्ह्यातून सुमारे १ लाख ५२ हजार ४२८ विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्ह्यातील यशस्वी स्पर्धकांचा बक्षीस समारंभ मंगळवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे संपन्न झाला.

बक्षीस वितरण समारंभाला महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, भाजप जैन प्रकोष्ठचे अध्यक्ष संदीप भंडारी, भगवान महावीर स्वामी कल्याणक महोत्सव समितीचे सचिव विजय बेदमुथा, वरिष्ठ सल्लागार सुमेरकुमार काले आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

जिल्ह्यातून इयत्ता ५ वी ते ७ वी या गटात नाशिक जिल्ह्यातून प्रथम सक्षम किरणजी डुंगरवाल (श्री नेमिनाथ जैन माध्यमिक विद्यालय, चांदवड), द्वितीय अर्णव प्रशांत जाधव (श्री नेमिनाथ जैन माध्यमिक विद्यालय, चांदवड), तृतीय काव्या नीलेश नंदन (मराठा हायस्कूल नाशिक), चतुर्थ कोमल संदीप मोरे (कर्मवीर गणपतदादा मोरे जनता विद्यालय, पिंपळगाव बु.), पाचवा साहील अरुण घुमरे (पी. टी. विद्यालय, खेडलेझुंगे, निफाड) तसेच इयत्ता ८ वी ते १० या गटातून नाशिक जिल्ह्यातून प्रथम अनंत सुनील धात्रक (लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालय, सिन्नर), द्वितीय ऋतुजा ज्ञानेश्वर शेवाळे (टी. के. आर. एच. विद्यालय निमगाव, ता. मालेगाव), तृतीय प्रीतुल योगेश सूर्यवंशी (किलबिल सेंट जोसेफ हायस्कूल, कॉलेज रोड, नाशिक), चतुर्थ वैष्णवी योगेश वाघ (नूतन जवाहर विद्यालय, मनेगाव सिन्नर), पाचवी वृषाली मीननाथ तांबे (जनता विद्यालय, जळगाव (नेऊर) येवला) आदींना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.



**नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वेबसाइटचे अनावरण करताना सभापती कल्पना चुंभळे. समवेत उपसभापती विनायक माळेकर, संचालक शिवाजी चुंभळे, युवराज कोठुळे, जगन्नाथ कटाळे, चंद्रकांत निकम.**

# नाशिक बाजार समितीच्या वेबसाइटचे अनावरण

**पंचवटी : वार्ताहर**

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या www. apmcnashik.com या वेबसाइटचे अनावरण सभापती कल्पना चुंभळे यांच्या हस्ते करण्यात आले. बाजार समितीच्या या वेबसाइटवर शेतकऱ्यांसाठी शेतमालाचे बाजारभाव, बाजार समितीची माहिती, विद्यमान संचालक मंडळ, बाजार समितीचे कामकाज याबाबत माहिती उपलब्ध होणार आहे. या वेबसाइट अनावरणप्रसंगी उपसभापती विनायक माळेकर, संचालक शिवाजी चुंभळे, युवराज कोठुळे, जगन्नाथ कटाळे, चंद्रकांत निकम, जगदीश अपसुंदे, संदीप पाटील, संजय तुंगार, बाजार समितीचे सचिव निवृत्ती बागूल, सहायक सचिव मनोज महाले, शंतनू झोमन आदी कर्मचारी उपस्थित होते.

# कार अडीच कोटींची, चॉइस नंबरसाठी मोजले सात लाख

## आरटीओला आकर्षक नंबरमुळे ८ लाख २२ हजारांचा महसूल

**पंचवटी : सुनील बुनगे**

प्रादेशिक परिवहन कार्यालयात १७ एप्रिलपासून चारचाकी वाहनांसाठी नवीन (एम.एच. १५ के.जी.) ही मालिका सुरू झाली. या मालिकेतील १४ आकर्षक नंबरसाठी लिलाव प्रक्रिया सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विलास चौधरी यांच्या उपस्थितीत पार पडली. यात ९ नंबरसाठी सर्वाधिक बोली लागल्याने या नंबरसाठी एका हौशी वाहनमालकाने तब्बल ४ लाख ५० हजारांची बोली लावल्याने वाहन मालकाने शासकीय शुल्कासह ७ लाख रुपयांना खरेदी केला. दरम्यान, एकाच दिवसात केवळ लिलावाच्या माध्यमातून ८ लाख २२ हजार ३२२ रुपयांच्या अतिरिक्त महसुलाची आरटीओच्या तिजोरीत भर पडली.

वाहन घेताना अनेक हौशी वाहनमालक आकर्षक नंबरला पसंती देतात. त्यातच गत वर्षी आकर्षक नंबरच्या शुल्कात दुपटीने वाढ झाली आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी वेगवेगळे प्रकारचे शुल्क आकारले जातात. त्यात चारचाकी वाहनांचे शुल्क जास्त आहेत. एका आकर्षक नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्या नंबरसाठी लिलाव प्रक्रिया करण्यात येते. जो कोणी जास्त बोली लावेल त्या वाहन मालकाला तो नंबर दिला जातो.तर जम्पिंग नंबर ( दुसऱ्या सिरीजमधील) त्यासाठी देखील जास्त शुल्क मोजावे लागते. परिवहन कार्यालयात १७ एप्रिल रोजी नवीन सिरीज सुरू झाली. त्यात एकूण १४ आकर्षक नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज दाखल होते. त्यातील ९ नंबरसाठी जास्त अर्ज असल्याने जास्त बोली लावणाऱ्या वाहन मालकाला तो नंबर देण्यात आला. ९ नंबरसाठी शासकीय शुल्क २ लाख ५० हजार रुपये इतके असून, नंबरसाठी जवळपास अडीच कोटी रुपयांची गाडी खरेदी केलेल्या वाहनमालकाने ४ लाख ५० हजारांची बोली लावली असल्याने त्या वाहनमालकाला शासकीय शुल्क २ लाख ५० हजार आणि बोली लावलेली ४ लाख ५० हजार असे मिळून ७ लाख रुपये मोजावे लागले. त्यामुळे लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून ८ लाख २२ हजार ३२२ रुपयांचा महसूल आरटीओच्या तिजोरीत पडला.

अग्रलेख


# राहुल गांधींचा संशय

गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून महायुतीचे सरकार स्थापन होऊन आता चार महिने उलटले आहेत. सरकारने पहिल्या शंभर दिवसांची कामगिरीही लोकांसमोर सादर केली. तरीही विरोधी पक्षांना निवडणूक निकालावर विश्वास बसेनासा झाला आहे. महायुतीला इतके घवघवीत यश मिळेल, असा अंदाज एक्झिट पोल्समधूनही व्यक्त करण्यात आला नव्हता. मूळात विरोधी महाविकास आघाडीचा मोठा अपेक्षाभंग होईल, असे भाकितही वर्तविण्यात आले नव्हते. लोकसभा निवडणुकीत दणदणीत यश संपादन करणार्या महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीत पालापाचोळा कसा उडाला? हाच मोठा प्रश्न या आघाडीच्या नेत्यांना पडला आहे. इतकेच नव्हे, तर लहान पक्षांचाही निकालावर विश्वास नाही. नोव्हेंबर २०२४ मध्ये निवडणूक झाली. महायुतीला सर्वाधिक २३५ पेक्षा जास्त जागा मिळाल्या. भाजपाला सर्वाधिक १३२, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ६० आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला. महाविकास आघाडीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला २०, काँग्रेसला १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागा मिळाल्या होत्या. एकूणच मतदान प्रक्रिया, मतमोजणी, मतदान यंत्रे यावर आक्षेप घेतला गेला. तो आजही कायम आहे. निवडणुका पारदर्शक झाल्या असल्याचा दावा निवडणूक आयोगाने करुनही विरोधकांचे समाधान झालेले नाही. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर अमेरिकेत जाऊन पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अमेरिकेतील बोस्टन येथील ब्राऊन विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या भाषणात विधानसभा निवडणुकीचा मुद्दा उपस्थित केला. विधानसभा निवडणुकीत तरुणांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याचे एक वास्तव आहे. मात्र, निवडणूक आयोगाने आम्हाला संध्याकाळी ५.३० पर्यंत झालेल्या मतदानाचीच आकडेवारी दिली. त्यानंतर संध्याकाळी ५.३० ते ७.३० या कालावधीत जेव्हा मतदानाची वेळ संपलेली असते त्या कालावधीत ६५ लाख मतदारांनी मतदान केल्याचे सांगितले. असे घडणे केवळ अशक्य आहे. यावर त्यांनी बोट ठेवले. एका मतदाराला मतदान करायला साधारण तीन मिनिटे लागतात. ही वेळ लक्षात घेतली, तर रात्री २ वाजेपर्यंत मतदार रांगेत उभे होते आणि त्यानंतर पहाटेपर्यंत मतदान प्रक्रिया चालली होती, असा अर्थ निघतो. पण, असे कुठेही घडल्याचे पाहण्यास मिळाले नाही. हा मुद्दा राहुल गांधी यांनी मांडला. गेल्या आठवड्यात नाशिकमध्ये झालेल्या ठाकरे यांच्या शिवसेनेच्या शिबिरातही उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे यांनी पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त केला. इतकेच नाही दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्टिफिशियल इंटेलेक्चुअल-एआय (कृत्रिम बुध्दिमत्ता) भाषणातही या मुद्द्याचा समावेश करण्यात आला. यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही निवडणूक निकालावर संशय व्यक्त केलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचेही हेच मत आहे. राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन हाच मुद्दा उपस्थित करुन पुन्हा एकदा संशय व्यक्त केला आहे. या मतदानाचे चित्रीकरण पाहू देण्याची मागणी काँग्रेसने आयोगाकडे केली होती. पण, आयोगाने नकार दिला एवढेच नव्हे तर नियमही बदलून टाकला. नव्या नियमाचा आधार घेऊन चित्रीकरण दाखवण्यास आयोगाने नकार दिल्याची टीकाही करत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर शंका व्यक्त केली. आयोगाच्या संपूर्ण व्यवस्थेमध्येच घोळ आहे, असे ताशेरे राहुल गांधी यांनी मारले. महाराष्ट्रातील मतदारयाद्यांमध्ये त्रुटी आहेत. राज्यात प्रौढ लोकसंख्येपेक्षा पात्र मतदारांची संख्या जास्त होती. पाच वर्षांत ३२ लाख मतदार वाढले. पण, विधानसभा निवडणुकीच्या आधी पाच महिन्यांमध्ये ३९ लाख मतदार वाढले. वाढीव मतदारांचे प्रमाण इतके प्रचंड कसे असू शकते, याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाकडे विचारणा केली होती. त्यांनी निवडणुकीत झालेल्या कथित अफरातफरीचा मुद्दा यापूर्वी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन तसेच, लोकसभेतही मांडला होता. बोस्टनमध्ये त्यांनी हाच मुद्दा पुन्हा एकदा मांडला. मतदानाचे चित्रीकरण पाहू देण्याची मागणी काँग्रेसने आयोगाकडे केली होती. पण, आयोगाने नकार दिला एवढेच नव्हे तर नियमही बदलून टाकल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोगावर जवळपास सर्वच विरोधी पक्षांनी संशय व्यक्त केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात एक याचिकाही दाखल केलेली आहे. संध्याकाळी ६ नंतर ६६ लाख लोकांनी मतदान कसे केले? असा प्रश्न आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयात केलेला आहे. निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप आंबेडकर यांनी केला आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर घोषित करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आलेली आहे. सहा वाजल्यानंतर झालेल्या मतदान प्रक्रियेचे व्हिडिओ निवडणूक आयोगाने देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने आदर्श नियमावली पाळलेली नाही, असाही त्यांचा आरोप आहे. सायंकाळी सहा वाजल्यानंतर झालेल्या मतदानाचा स्लिपचा रेकॉर्ड निवडणूक आयोगाकडे याचिकेद्वारे मागितला आहे, तो दिलेला नाही, असेही याचिकेत म्हटले आहे. सायंकाळी सहा वाजल्यानंतरचे व्हिडिओ द्यावे, अशी मागणी करत त्यावेळी व्हिडिओग्राफी केली आहे का? असा सवालही आंबेडकर यांनी केला. या याचिकेवर निवडणूक उच्च न्यायालयात काय निर्णय लागेल तो लागेल. पण, निवडणूक आयोगाविषयी सतत शंका घेतली जात आहे. राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा शंका उपस्थित केली ती अमेरिकेत जाऊन. यावरुन भाजपाने त्यांच्यावर टीका करणे स्वाभाविक आहे. राहुल गांधी यांनी भारतीय घटनात्मक संस्थांची विदेशात जाऊन बदनामी केल्याचा आरोप भाजपाकडून केला जात आहे. वंचित बहुजन आघाडीने न्यायालयात धाव घेतली आहे, तशी धाव काँग्रेस अथवा अन्य विरोधी पक्षांनी घेतलेली नाही. मात्र, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकालाची चर्चा काही थांबलेली नाही. राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन पुन्हा ही चर्चा पुढे नेली आहे. निवडणूक आयोगावर संशय घेण्याची ही काही पहिली वेळ नाही. मतदान यंत्रावर आक्षेप घेण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयातही लोकसभा निवडणुकीपूर्वी याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीवरही संशय व्यक्त करण्यात आला होता. विरोधकांचा एकूणच निवडणूक आयोगावर संशय आहे.

# प्रत्येक वेळी नवा अनुभव देणारा मित्र

कोरोना व्हायरस संकटावेळी अवघे जग लॉकडाऊन झाले होते. अशा काळात वाचनालय बंद होती. तेव्हा घरी राहून, सुरक्षित राहून आपण पुस्तकांशी मैत्री करून अवांतर वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालू शकलो. संकट काळी आपले जवळचे मित्रही कोरोना काळात तुम्हाला उपयोगी पडणार नाही अशा वेळी पुस्तक हेच खरे मित्र होते. मनुष्याने जीवनात पुस्तकाला आपला खरा मित्र मानणे आजच्या घडीला गरजेचे आहे.

आज अवांतर वाचनाची अधिक आवश्यकता आहे. विविध ग्रंथ, उपनिषद, गीता वाचून अनेक थोर विचारवंत, क्रांतिकारक, समाजसुधारक, साहित्यिक, संशोधक, खेळाडू घडले आहेत. पुस्तक वाचन असेल तर चांगले विचार जीवनात आपण आणू शकतो. विचाराने सर्व गोष्टींवर, संकटावर आपण मात करू शकतो. पुस्तकांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करणारा आजचा हा खास दिवस जागतिक पुस्तक दिन. साहित्य जगतामध्ये शेक्सपियर यांना असलेल्या आदराच्या स्थानामुळे युनेस्कोने १९९५ साली तर भारत सरकारने २००१ साली २३ एप्रिल दिवशी जागतिक पुस्तक दिन सेलिब्रेशनची घोषणा केली. जागतिक पुस्तक दिन हा २३ एप्रिल दिवशी साजरा केला जातो. जगभरातील साहित्य संबंधित संस्थांकडून दरवर्षी जागतिक पुस्तक दिनाचे सेलिब्रेशन केले जाते. हा दिवस जगभरातील १० देशांमध्ये साजरा केला जातो.



आजच्या दिवशी जागतिक पुस्तक दिनासोबत World Book and Copyright Day देखील साजरा केला जातो. युनेस्कोकडून या दिवसाचं सेलिब्रेशन करताना William Shakespeare, Miguel Cervantes आणि Inca Garcilaso de la यांना

नितीन पाटील
९६८९६४०११६

आदरांजली म्हणून आजची तारीख निवडली गेली आहे. युनेस्कोच्या पॅरिसमधील सर्वसामान्य सभेमध्ये १९९५ साली जगभरातील लेखक आणि पुस्तकांप्रति आदरभाव व्यक्त करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. २३ एप्रिल १५६४ दिवशी महान कवी, लेखक, नाटककार शेक्सपियर यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांनी ३५ नाटकं आणि २०० पेक्षा अधिक कविता लिहिल्या आहे. साहित्य जगतामध्ये शेक्सपियर यांना असलेल्या आदराच्या स्थानामुळे युनेस्कोने १९९५ साली तर भारत सरकारने २००१ साली २३ एप्रिल दिवशी जागतिक पुस्तक दिन सेलिब्रेशनची घोषणा केली.

असं सांगतात की, माणसाला आयुष्यात दोनच गोष्टी शिकवतात. एक वाचलेली पुस्तके आणि भेटलेली माणसे. त्यापैकी माणसांचं म्हणाल तर आपण स्वत:हून त्यांना भेटायला जातो किंवा ते स्वत:हून आपल्याला भेटायला येतात. पुस्तकांचं तसं नसतं. पुस्तकांना आपण स्वत:च भेटायला जावं लागतं. माणसांकडून शिकायचं तर त्यांच्याशी बोलावं लागतं. त्याचा आवाज होतो. पुस्तकांशी बोलताना आवाज होत नाही. अशा आवाज न करता शिकण्याचा हा काळ. कोरोना व्हायरस संकटामुळे सध्या अवघं जग लॉकडाऊन झालं आहे. अशा काळात अशा संवादाची अधिक आवश्यकता. म्हणूनच पुस्तकांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करणारा आजचा हा खास दिवस. माणूस लहानाचा मोठा होतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत निरंतर चालणारी ही प्रक्रिया. या प्रक्रियेत माणूस आपला चेहरा दररोज आरशात न्याहाळतो. या न्याहाळण्यात असणारा एक बदल त्याला टिपता येत नाही. हा बदल म्हणजे बदलणारा चेहरा. पण, त्याला ते कधीच जाणवत नाही. कधीतरी केव्हातरी काढलेला भूतकाळातील फोटो समोर येतो आणि प्रश्न पडतो, अरेच्चा! आपण इतके बदललो? पुस्तकांचेही तसेच असते. पुस्तक वाचनाने माणसू शहाणा होतो. हीसुद्धा एक प्रक्रिया आहे. निरंतर चालणारी. वाचनाने मानवी जीवनात व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर आमूलाग्र बदल होतो. हा बदल व्यक्तिमत्त्व,, विचार, आचार आणि संवाद अशा विविध पातळीवर असतो. हा बदल हळूहळू घडतो. दररोज आरशात आपला चेहरा न्याहाळताना तो बदलत असलेला जसे आपल्याला जाणवत नाही. तसेच पुस्तक वाचनातून होत असलेला बदलही आपल्याला जाणवत नाही. पण तो होत असतो. ही एका रात्रीत पूर्ण होणारी प्रक्रिया नाही. पुस्तक हा माणसाचा निरुपद्रवी मित्र आहे. तो कधीच कोणाला टाळत नाही. स्वत:हून इतरांकडे जात नाही. मानवी मैत्रीत अंतर येणे शक्य आहे. नव्हे ते येतेच. पुस्तक अंतर देत नाही. पुस्तकं निषेध करत नाहीत. मतभेदांवर वाद करत नाहीत. मुळात आपल्याला जे म्हणायचे आहे ते म्हणून ती नामानिराळी राहतात. आपली मतं पुस्तकं इतरांवर लादत नाहीत. पटले तर घ्या. नसेल तर सोडून द्या. इतका शांतपणा आणि संयमीपणा केवळ पुस्तकांमध्येच असू शकतो. म्हणून प्रत्येकाचा पुस्तक नावाचा एक मित्र असावा. जो दररोज प्रत्येकाच्या संपर्कात यावा. जेणेकरून चेहऱ्याप्रमाणे स्वत: आमूलाग्र बदल होत जाईल. कारण आपण एकटे असतो तेव्हा पुस्तक माणसाला नवा अनुभव देतात. जागतिक पुस्तक दिन हा जगभरातील अनेक लोकांसाठी महत्त्वाचं व्यासपीठ बनलं आहे. यामुळे प्रामुख्याने साहित्य क्षेत्रातील निगडित व्यक्ती, उद्योजक, लेखक, प्रकाशक, शिक्षक, वाचनालयं, संस्था, एनजीओ आणि मास मीडियाला शिक्षणाला चालना देऊन साऱ्यांनाच आनंदासोबतच ज्ञानाचीदेखील देवाणघेवाण करता येते.

# पुस्तके म्हणजे ज्ञानाचा चिरंतन ठेवा

२३ एप्रिल हाच दिवस जगातिक पुस्तक व कॉपीराइट दिन साजरा करण्याचे एक उद्दिष्ट होते. या वर्षीचे पुस्तक दिनाचे घोषवाक्य आहे ''तुमच्या पद्धतीने वाचा''. खरेतर पुस्तके ही ज्ञानाची भांडारे आहेत. त्यातून आपणास नवीन प्रेरणा मिळते. माणसाला सुसंस्कृत करण्यात पुस्तकांची भूमिका फार मोठी आहे. पुस्तकाने माणसाची दृष्टी उंचावते. वाचनाने ज्ञानप्राप्ती तर होतेच; याशिवाय विचारांची दालनेसुद्धा खुली होतात. आपण कसे जगावे हे पुस्तकाकडून आपण शिकू शकतो. या दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालयाचे महत्त्व मोठे आहे.

वैयक्तिकदृष्ट्या सर्वसामान्य माणसे खर्चिक पुस्तके खरेदी करू शकत नाहीत. त्यासाठी सार्वजनिक ग्रंथालये हा मोठा पर्याय आहे. अनेक शहरांत अशी ग्रंथालये आहेत. महाराष्ट्रात तर अनेक ग्रंथालयांनी आपली शंभरी सुद्धा ओलांडली आहे. पालकांनी मुलांना लहानपणापासून पुस्तकांची आवड निर्माण करावयास हवी. लहान असताना त्यांना प्राणी, पक्षी यांच्या गोष्टी फार आवडतात. त्यातून त्यांचे सामान्यज्ञान व चौकसबुद्धी वाढीस लागते. थोरांची चरित्रे वाचल्यास त्यांचे मोठेपण आपणास कळून येते. अनेक शाळांमध्येसुद्धा ग्रंथालये आहेत. त्याचा वापर मुलांनी केला पाहिजे. या दृष्टीने शिक्षकांची भूमिका मोठी आहे. त्यांनी मुलांना वाचनाची गोडी लावावयास हवी. अलीकडे मुलांच्या हातात मोबाइल नेहमी असतो. त्यामुळे त्यांचे पुस्तकांकडे दुर्लक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुस्तक संग्रह मोठा होता. अनेक पदव्या मिळवून प्रसिद्ध झालेले श्रीकांत जिचकार यांचासुद्धा पुस्तक संग्रह प्रचंड होता. भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांनासुद्धा पुस्तकांचे वेड होते. त्यांच्या पुस्तक संग्रहात अनेक पुस्तके होती. नवीन पुस्तक प्रकाशित झाले की, ते राजकारणाच्या धावपळीतसुद्धा ते वाचून काढीत. काही दिवसांपूर्वी सातारा जिल्ह्यात भिलार येथे सरकारने पुस्तकांचे गाव स्थापना केले आहे. हे आवर्जून पाहावे व पुस्तकांची आवड जोपासावी. या जगातिक पुस्तक दिवशी लोकांना वाचनाची आवड निर्माण करणे. पुस्तकांचा सन्मान करणे व त्यांची जपणूक करणे ही कामे केली जातात.

शांताराम वाघ
९६२३४५२५५३

अलीकडे दूरचित्रवाणी, मोबाइल, टॅब यांसारख्या साधनांनी ज्ञानाचे विश्व बदलले आहे. त्यामुळे मुलांचे व पालकांचे लक्ष पुस्तकांकडे कमी आहे की काय? अशी शंका वाटू लागली आहे. पण ते खरे नाही. आजही अनेक साहित्य संमेलनात लाखो रुपयांची पुस्तके खपतात. अनेक वाचक मुलांना पुस्तके घेऊन देतात. उन्हाळी सुट्टीत अनेक वर्गात पुस्तकांचे महत्त्व मुलांना सांगितले जाते. एकूणच ग्रंथ चळवळ फोफावली पाहिजे व त्याचे फायदे सर्वांपर्यंत पोहचले पाहिजेत. असे झाले तरच हा जागतिक दिन खऱ्या अर्थाने साजरा केला असे होईल.

# तुम्ही शिकवाल हो हिंदी!

राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीचा निर्णय घेतला आहे. या विषयावर आता वेगवेगळ्या अंगाने चर्चा सुरू आहे. ज्यात उत्तरेतील राज्ये त्रिभाषा सूत्र स्वीकारतात का? भाषावार प्रांतरचनेचा मूळ हेतू काय? हिंदी भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा आहे का? उत्तर भारतीयांच्यी सोय करण्यासाठी ही खेळी आहे. दक्षिणेकडील राज्यात असा निर्णय घेऊन दाखवा, अशा विविध उपविषयांच्या आधारे करण्यात येणारे दावे-प्रतिदावे, आरोप-प्रतिआरोप करण्यात येत आहेत.

अजिंक्य तरटे
९५५२५९९४९५

मात्र, या सर्व गदारोळात एका महत्त्वाच्या मुद्द्यावर मात्र फारच कमी बोलले जात आहे. तो म्हणजे ज्या मुलांना हिंदी भाषा शिकवण्याबाबत हे सर्व आकांडतांडव सुरू आहे. त्यांच्या भावविश्वाचा

नागरिशास्त्र, भूगोल, इतिहास या प्रमुख सामाजिक शास्त्राचे (अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राच्या अनेक शाखा आहेत) एकच पुस्तक विचारात घेतले तरीदेखील विज्ञान, गणित आणि मराठी, इंग्रजी भाषा विषय लक्षात घेतले तर आताच ही मुले पुस्तकांचा अभ्यास करतात. आता त्यात अजून एका पुस्तकाची भर पडणार आहे. पूर्वी राज्य सरकारने दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पुस्तक आणि वह्या एकत्रच देण्याच्या प्रयोग केला होता, जो फसल्याने पुस्तक आणि वह्या पुन्हा वेगळ्या झाल्या. तो विचारात घेता या निर्णयामुळे अजून एका वहीची भर मुलांच्या दप्तरात होणार आहे. वह्यांचे ओझे कमी होण्याच्या ऐवजी ते वाढणार आहे. सरकारी काम बघता यासाठी एखादे पुस्तक येणारच हे सांगायला तज्ज्ञ व्यक्तीचीसुद्धा गरज नाही. त्याचेदेखील ओझे मुलांना पाठीवर घ्यावे लागणार आहे या निर्णयामुळे. समजा हा भाषा विषय आहे. त्यामुळे यासाठी पुस्तक नसून बोलणे, ऐकणे यावर भर देणारा अभ्यासक्रम असेल असे समजले तरी त्याला वेळ लागणारच. दिवसाच्या कालावधीचा विचार करता त्यात काहींना काही वेळ जाईल. त्याचा इतर विषयांवर परिणाम होणार नाही कशावरून? बरं याचे मूल्यमापन करायचे म्हणजे मुलांच्या परीक्षेचा एक दिवस वाढणार? या वाढलेल्या परीक्षा दिवसाच्या मुलांवर ताण येणार नाही याची हमी कशी घेणार? व्यक्ती लहान असताना एखादी गोष्ट भाषा सहजतेने शिकू शकते हे अगदी खरे आहे. मात्र, या मुद्द्याच्या आधारे त्यांच्यावर हा हिंदी भाषेचा ताण कोणत्या कारणास्तव द्यायचा याचा पण विचार होणे आवश्यक आहे.

लहानपणी अनावश्यक मेंदूला ताण देऊन त्यामुळे भविष्यात काही गंभीर आजार यांना उद्‌भवले तर काय करणार? कोणतीही भाषा शिकण्यासाठी सभोवताली त्या भाषेला पूरक वातवरण असणे आवश्यक असल्याचे भाषातज्ज्ञ सांगतात. आज महाराष्ट्रात हिंदीचा प्रभाव वाढत असला तरी पहिलीपासून हिंदी शिकणाऱ्या मुलांना पूर्णपणे मदत होईल असे वातावरण सध्यातरी महाराष्ट्रात नाही. त्यामुळे लहान मुलांना हा नाहक त्रासच ठरण्याची शक्यता अधिक आहे.

या आधी कधीही राज्य शालेय शिक्षणात (सीबीएससी आणि आयसीएससीसारख्या बोर्डाचा विचार क्षणभर बाजूला ठेवूया) पहिलीपासून हिंदी शिकवले गेले नाहीये. डी.एड किंवा बी.एड झालेल्या व्यक्तींना ज्यांना फारच कमी शाळेची सवय आहे अशा पहिली, दुसरीतील मुलांना हिंदी शिकवण्याबाबत प्रक्षिक्षण न दिल्याची दाट शक्यता आहे.

सरकारला जर पहिलीपासून हिंदी शिकवण्याची गरज वाटत असेल तर किमान दोन ते तीन वर्षे याबाबत शिक्षण देऊन तीन ते चार वर्षांनी पहिलीपासून हिंदी शिकवण्यास सुरुवात करावी. आपल्याकडे बॉलिवूडमुळे हिंदीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. माझ्या मते एखाद्या शालेय विषयाच्या पेक्षा यामुळे हिंदी सहजतेने समजते. याउलट हिंदी विषय म्हणून शिकवल्यामुळे वाढलेल्या अतिरिक्त ओझ्यामुळे तिच्याबाबत नावड निर्माण होण्याचीच शक्यता आहे तरी हा निर्णय मागे घेण्यातच लहान मुलांचे हित आहे, असे आपण म्हणू शकतो.

# बदलत्या हवामानाचा फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशांच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

दोन वर्षांपूर्वी खारघरमध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो, मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. अवकाळी पाऊस झाला की, बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षांतील नित्याची बाब झाली आहे. जम्मू-काश्मीरसारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू-काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जणांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू-काश्मीरमधील जनजीवन विस्कळीत झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९६

चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण अवाक् झाले. जम्मू-काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू-काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यांत अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखेदरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्र प्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यांतही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे ऊन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षांत ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे. आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधी कधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की, दोन दिवसांत दोन महिन्यांची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे, याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रिटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटची जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे.

# वाहनांविषयी धोरण आखण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश

पोलिसांनी जप्त केलेली वाहने मुंबईतील रस्त्यांवरील मोकळ्या जागेत आणि रस्त्यांच्या कडेला वर्षानुवर्षे उभी केलेली आढळतात. त्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार, मुंबई महापालिका आणि वाहतूक पोलीस विभागाला प्रश्न विचारीत राज्याने सर्वंकष धोरण आखून ते २९ एप्रिलपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सरकारने राज्याच्या विकासासाठी योजलेल्या योजनांनुसार मुंबई शहरच नव्हे तर मुंबई पलीकडली सर्व शहरे निवासी, व्यापारी इमारतींच्या बांधकामांनी, बांधकामांच्या धुळींनी मोठ्या प्रमाणात माखलेली दिसत आहेत. शहरांच्या आणि राज्याच्या प्रगतीसाठी विकास आवश्यकच असतो. मात्र, सद्यपरिस्थितीत ज्या काही ठराविक शहरे, नगरांमध्ये इमारतींची बांधकामे केली जात आहेत. ज्यामुळे निर्माण होणाऱ्या कचरा, डेब्रिज इत्यादींनी रस्त्यांची दुर्दशा झाली आहे.

जनमनाचे प्रतिध्वनी

त्यातून चालत मार्ग काढणे सामान्य जनतेला फार त्रासदायक ठरते. ज्येष्ठ नागरिकांना किती त्रास होत असेल याचा अंदाज केलेला बरा. त्यातच नवे रस्ते बांधणी, मेट्रो रेल्वेसाठी मर्यादित केलेली रस्त्यांची रुंदी, खोळंबलेली रस्तेदुरुस्ती, काँक्रिटीकरणाची कामे, रस्त्यावरील अवैध पार्किंग यांमुळे वाहतूक कोंडी, हॉर्न्सचे कर्णकर्कश आवाज यामुळे बऱ्याच प्रकारच्या प्रदूषणांना शहरातील नागरिकांना दररोज सामोरे जावे लागते. त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असतात. प्रामाणिकपणे पालिकांचे नियमित कर भरणाऱ्या नागरिकांनी किती काळ अशा प्रकारच्या गैरसोयी सहन कराव्यात, असे प्रश्न प्रत्येक नागरिकांच्या मनात निर्माण होत असल्याने ते उघडपणे व्यक्त केले जात आहे. मुंबईत येणाऱ्या वाहनांवर कोणत्याही प्रकारच्या मर्यादा/बंधने घातली जात नाहीत. त्यामुळे मुंबईसारखी शहरे वाहने पार्किंगसाठी वापरात आणली जातात. नादुरुस्त, गैरमार्गांनी आणलेली वाहने, अपघातात सापडून बिघडलेली वाहने या सर्वांमुळे रस्ते कशासाठी बांधली जातात किंवा त्यांचा विस्तार कशासाठी केला जातो, असे प्रश्न उपस्थित होतात. वास्तविक पाहता हाती घेतलेली रस्त्यांची कामे वेळेवर पूर्ण करण्याचे प्रयत्न केल्यास ती नियोजित वेळांदरम्यान पूर्ण करणे शक्य होऊ शकते. परंतु, रस्त्यांवर उभी केलेली वाहने जेव्हा नागरिकांना वाहतुकीस अडथळे निर्माण करतात. त्याची उच्च न्यायालयांना घ्यावी लागते. यावर संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याची गरज जबाबदारीने वेळेत पार पाडावीत या अपेक्षा व्यक्त करणे भाग पडत आहे.

**राजन पांजरी, ९८१९७००८१८**

# संतांनी लिहिलेले ग्रंथ मृत्युपत्रासारखे

संतांना ग्रंथ लिहिण्याची मुळीच हौस नसते. नाइलाज म्हणून ते ग्रंथ लिहीत असतात. तुम्हाला असे वाटते का, की नाथांनी आणि समर्थांनी ज्ञानेश्वरीची पारायणे करून नंतर आपले ग्रंथ लिहिले? त्यांचे ज्ञान स्वतंत्र असते आणि ते साक्षात् भगवंतापासून आलेले असते. त्यामध्ये अर्थात् मागील ग्रंथकारांनी सांगितलेल्या काही गोष्टी येणारच. संतांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या मृत्युपत्रासारखे आहेत. आपले मुलगे चांगले वागतील अशी ज्या बापाला खात्री वाटते तो कशाला मृत्युपत्र लिहील? तशी ज्याला खात्री नसते तो नाइलाजाने मृत्युपत्र लिहितो! त्याचप्रमाणे, संतांनी हौसेने किंवा विद्वता दाखविण्यासाठी ग्रंथ लिहिले नाहीत तर आपल्यासारख्या जडजीवांचे कल्याण व्हावे ही तळमळ त्यांना होती म्हणून त्यांनी ग्रंथ लिहिले. पोथीचा आपल्या जीवनाशी निकट संबंध असतो. असल्या ग्रंथांमध्ये, ज्याचा व्यवहारामध्ये उपयोग करता येतो असा वेदान्त सांगितलेला असतो. आपल्याला सुचणार नाहीत इतक्या शंका समर्थांनी घेऊन त्यांची उत्तरे दासबोधात दिली आहेत.



विचारधन

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### अभिनेता बेहजाद खान 'तेनाली रामा' मालिकेत



**मुंबई :** रोचक कथानक आणि कृष्ण भारद्वाजने दरबारी कवी तेनाली रामाचा केलेला अप्रतिम अभिनय यामुळे सोनी सबवर सुरू असलेली 'तेनाली रामा' मालिका घराघरात पोहोचली आहे. कथानकाला एक नवीन कलाटणी देण्यासाठी बेहजाद खान हा कलाकार सलाबत खानच्या भूमिकेत मालिकेत दाखल होत आहे. तो खलनायक आहे आणि त्याच्या आगमनामुळे कथानकात उलथापालथ होणार आहे. सलाबत खान हा बहामनी साम्राज्याचा एक मुत्सद्दी आणि चतुर शिपाई आहे. तो काही साधासुधा शत्रू नाही, तो एका मिशनवर निघालेला आहे. विजयनगर साम्राज्य उद्ध्वस्त करण्याची त्याची योजना आहे. आपल्या विचारपूर्वक चाली आणि आपल्या राज्याप्रतीची निष्ठा बाळगणारा सलाबत खान हा विजयनगर साम्राज्याविरुद्ध एकामागून एक होणारे हल्ले आणि कारस्थाने यांचा सूत्रधार आहे. त्याच्या आगमनामुळे तेनाली समोर एक शक्तिशाली आणि हुशार शत्रू उभा ठाकला आहे. त्या दोघांमधील संघर्ष आणि वाग्युद्ध आता सुरू होणार आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि उत्तम अभिनयाबद्दल ओळखला जाणारा बेहजाद खान या भूमिकेच्या माध्यमातून मालिकेत दाखल होऊन कथानकातील उत्कंठा नक्कीच वाढवणार आहे. तो म्हणतो, सलाबत खान साकारणे हे एक आकर्षक आव्हान आहे. हा माणूस अत्यंत विचारपूर्वक आणि आत्मविश्वासाने पावले उचलतो. अशा व्यक्तिरेखा तुम्हाला तुमच्यातील क्षमता आणि मार्मिकता शोधण्यासाठी प्रवृत्त करतात. प्रेक्षकांना देखील हा अनुभव नक्की येईल. कथानक उलगडत जाईल तेव्हा कावेबाज सलाबत खानचे आगमन एक टर्निंग पॉइंट ठरेल, जे तेनालीची निष्ठा आणि ताकदीला आव्हान देईल. बेहजाद खान कलाकार संचात दाखल झाल्यामुळे कथानकात बुद्धिचातुर्याच्या लढतीत रणनीती, संघर्ष आणि लवचिकता पणाला लागणार आहे.

### 'आता होऊ दे धिंगाणा'च्या महाअंतिम सोहळ्यात समीर परांजपेला मिळाली कार




**मुंबई :** स्टार प्रवाहच्या थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतून घराघरात पोहोचलेला तेजस म्हणजेच अभिनेता समीर परांजपेचे कारचे स्वप्न पूर्ण झाले आहे. आता होऊ दे धिंगाणाच्या महाअंतिम सोहळ्यात सर्वोत्कृष्ट धिंगाणेबाज कलाकार म्हणून समीरला गौरवण्यात आले. इतकेच नाही तर मारुती सुझुकीची वॅगन आर कार त्याला भेट म्हणून देण्यात आली. ही अनोखी भेट स्वीकारताना समीर भाऊक झाला होता. आपली भावना व्यक्त करताना तो म्हणाला, 'आता होऊ दे धिंगाणाच्या मंचाने कायम स्मरणात राहिल अशी भेट मला दिली आहे. बाबांची ड्रीमकार त्यांना आता मिळणार आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पहाण्यासाठी मी उत्सुक आहे.'

### 'अशी ही जमवा जमवी'ची बॉक्स




### ऑफिसवर धडाकेबाज कमाई

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील बहुप्रतिक्षित कौटुंबिक विनोदी चित्रपट 'अशी ही जमवा जमवी'ने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत, आपल्या प्रदर्शनाच्या पहिल्याच आठवड्यात चांगली कमाई केली आहे. प्रदर्शित झाल्यापासून केवळ सात दिवसांतच या चित्रपटाने कोटींची भरघोस कमाई केली आहे. शहरी भागांबरोबरच ग्रामीण भागातही प्रेक्षक मोठ्या संख्येने चित्रपटगृहात हा सिनेमा पहायला गर्दी करत आहेत. चित्रपटाची कथा, कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय आणि दिग्दर्शकाची प्रभावी मांडणी यामुळे चित्रपटाला प्रेक्षकांचा आणि समीक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत नवा उत्साह निर्माण करत, अशी ही जमवा जमवी या बहुप्रतीक्षित चित्रपटाने दणदणीत यश मिळवलं आहे. तरुण वर्गासोबतच सर्व वयोगटांमध्ये हा सिनेमा गाजतोय. दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि वंदना गुप्ते सोबत ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे, सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर अशा लोकप्रिय कलाकारांची फौज या सिनेमात आहे. हा चित्रपट राजकमल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली प्रदर्शित झाला असून, व्ही. शांताराम यांचे नातू राहुल शांताराम यांचे हे पहिले निर्मिती आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते दिग्दर्शित अशी ही जमवा जमवी हा सिनेमा १० एप्रिलपासून चित्रपटगृहात धुमाकूळ घालत प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे.

### दिल्ली-एनसीआरसह 'या' शहरांमध्ये घरांच्या विक्रीत पुन्हा घट

**नवी दिल्ली :** रिअल इस्टेट क्षेत्रात पुन्हा एकदा मंदीचे सावट आले आहे. कारण घरांच्या विक्रीत तिमाहीमागून तिमाही घट होत आहे. याचा अर्थ गेल्या अनेक तिमाहींमध्ये घरांच्या विक्रीत सतत घट होत आहे. इस्टेट सल्लागार फर्म प्रॉपटायगरच्या अहवालानुसार, जानेवारी-मार्च तिमाहीत देशातील आठ प्रमुख शहरांमध्ये घरांची विक्री वर्षानुवर्षे १९ टक्क्यांनी घटून ९८,०९५ युनिट्सवर आली आहे. याची मुख्य कारणे म्हणजे घरांच्या गगनाला भिडलेल्या किमती आणि नवीन प्रकल्पांचे कमी प्रस्ताव. डिजिटल रिअल इस्टेट ट्रान्झॅक्शन अँड ॲडव्हाइझरी प्लॅटफॉर्म प्रॉपटायगर डॉटकॉमच्या अलीकडच्या अहवालानुसार, जानेवारी ते मार्च या कालावधीत देशभरातील आठ प्रमुख बाजारपेठांमध्ये घरांची विक्री गेल्या वर्षाच्या तुलनेत १९%ने कमी झाली आणि त्याचे कारण आहे मालमत्तेच्या वाढत्या किमती आणि मंदावलेल्या वृद्धीमुळे खरेदीदार सावधगिरी बाळगून आहेत. जानेवारी-मार्च या तिमाहीत १००,००० पेक्षा कमी घरे विकली गेली. या विश्लेषणात समाविष्ट करण्यात आलेल्या बहुतांशी शहरांत ही संख्या घटल्याचे दिसते. बंगळूर आणि चेन्नईमध्ये हा ट्रेंड दिसला नाही, तर हैदराबाद, मुंबई आणि पुण्यात ही विक्री तीव्रतेने कमी झालेली दिसली. जानेवारी-मार्चमध्ये अहमदाबादमध्ये घरांची विक्री १७ टक्क्यांनी घसरून १०,७३० युनिट्सवर आली, दिल्ली-एनसीआरमध्ये १६ टक्क्यांनी घसरून ८,४७७ युनिट्सवर, हैदराबादमध्ये २६ टक्क्यांनी घसरून १०,६४७ युनिट्सवर, कोलकातामध्ये १ टक्क्यांनी घसरून ३,८०३ युनिट्सवर, मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) २६ टक्क्यांनी घसरून ३०,७०५ युनिट्सवर आणि पुण्यात २५ टक्क्यांनी घसरून १७,२२८ युनिट्सवर आली.

# सेन्सेक्स ७९,६५० वर : निफ्टीही तेजीत

**मुंबई :** **आठवड्याचा दुसरा ट्रेडिंग दिवस, शेअर बाजार तेजीत आहे. सेन्सेक्स ७९,६५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे, सुमारे २५० अंकांनी वाढला आहे आणि १० अंकांनी खाली आला आहे. निफ्टीदेखील ५० अंकांपेक्षा जास्त वाढला आहे, तो २४,२०० च्या पातळीवर आहे.**

सेन्सेक्सच्या ३० पैकी १६ शेअर्समध्ये वाढ झाली आहे. झोमॅटो, कोटक आणि एचडीएफसी बँकेचे शेअर्स ४% पर्यंत वाढले आहेत. इंडसइंड बँकेचे शेअर्स ३.५०% घसरले. इन्फोसिस, पॉवरग्रीड आणि एअरटेलचे शेअर्स १% पर्यंत घसरले आहेत.

निफ्टीच्या ५० पैकी ४६ समभागांमध्ये वाढ झाली आहे. एनएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, एफएमसीजी, धातू, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि ग्राहकोपयोगी वस्तूंचे निर्देशांक १% ने वाढले आहेत.

२१ एप्रिल रोजी अमेरिकेचा डाऊ जोन्स ९७२ अंकांनी (२.४८%), नॅस्डॅक कंपोझिट ४१६ अंकांनी (२.५५%) आणि एस अँड पी ५०० निर्देशांक १२५ अंकांनी (२.३६%) घसरून बंद झाला.

आशियाई बाजारपेठेत, जपानचा निक्केई २४ अंकांनी (०.०७१%) घसरून ३४,२५५ वर आहे. कोरियाचा कोस्पी ४ अंकांनी (०.१८%) वाढून २,४९३ वर व्यवहार करत होता.

चीनचा शांघाय कंपोझिट ०.३२% वाढून ३,३०२ वर व्यवहार करत होता. हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक ०.३७% ने घसरून २१,३१६ वर व्यवहार करत आहे.



२१ एप्रिल रोजी, परदेशी गुंतवणूकदारांनी १,९७०.१७ कोटी रुपयांचे निव्वळ शेअर्स खरेदी केले आणि भारतीय देशांतर्गत गुंतवणूकदारांनी २४६.५९ कोटी रुपयांचे निव्वळ शेअर्स खरेदी केले.

आठवड्याच्या पहिल्या ट्रेडिंग दिवशी म्हणजेच सोमवार २१ एप्रिल रोजी, सेन्सेक्स ९०० पेक्षा जास्त अंकांनी वाढून ७९,४५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. त्याच वेळी, निफ्टी देखील सुमारे ३०० अंकांनी वाढला आहे, तो २४,१५० च्या पातळीवर आहे.

बँक निफ्टीने नवीन विक्रमी उच्चांक गाठला आहे. तो १००० अंकांनी वाढून ५५,००० च्या पुढे पोहोचला आहे. बँकिंग व्यतिरिक्त, आयटी आणि मेटल शेअर्स देखील आज तेजीत आहेत. इंडसइंड बँक आणि टेक महिंद्रा ४% पेक्षा जास्त वधारले आहेत.

# तूरडाळीच्या दरात घसरण होण्याची शक्यता

## केंद्राचा निर्णय : ३,४०,००० टन तूर खरेदी करणार

**नवी दिल्ली :** देशातील तूरडाळीच्या किमती नियंत्रित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठी घोषणा केली आहे. सरकारने किंमत समर्थन योजनांतर्गत या वर्षी आतापर्यंत ३,४०,००० टन तूर खरेदी केली आहे. त्यामुळे आगामी काळात तुरीच्या डाळीची किंमत कमी होण्याची शक्यता आहे. यामुळं सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

कृषी मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीत ही माहिती समोर आली आहे. सरकारने PSS अंतर्गत किमान आधारभूत किमतीवर तूरडाळ खरेदी केली आहे. मंत्रालयाने नऊ राज्यांमधून १३.२२ लाख टन तूर खरेदीला मंजुरी दिली आहे. किमती नियंत्रित ठेवण्यासाठी खुल्या बाजारात सोडण्यासाठी १० लाख टन तूर डाळीचा बफर स्टॉक ठेवण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, १३ एप्रिलपर्यंत तूर खरेदी ३,४०,००० टनांवर पोहोचली आहे. सर्वात जास्त १,३०,००० टन खरेदी कर्नाटकातून करण्यात आली, जिथे शेतकऱ्यांना ७,५५० रुपये प्रति क्विंटलच्या MSP पेक्षा जास्त आणि ४५० रुपये प्रति क्विंटल राज्य बोनस मिळत आहे. याशिवाय आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश येथून खरेदी करण्यात आली.



**२७ लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी**

सरकारने तेलंगणा आणि मध्य प्रदेशातून १७,००० टन हरभरा खरेदी केला आहे. २७ लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी मिळूनही खरेदी संथच सुरू आहे. कारण १० टक्के आयात मूलभूत शुल्क लागू केल्यानंतर, देशांतर्गत किमतींनी ५,६५० रुपये प्रति क्विंटलच्या चड्ड पेक्षा जास्त केले आहे. १३ एप्रिलपर्यंत मसूरची खरेदी २८,७०० टन आणि मूगाची खरेदी ३,००० टनांवर पोहोचली आहे. जेव्हा काही शेतमालाच्या बाजारातील किमती चड्ड च्या खाली येतात तेव्हा झडड लागू होतो. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात सरकारने २०२८-२९ पर्यंत राज्यात तूर, मसूर आणि उडीद डाळ पिकविण्याची पद्धत डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्णता मिळवण्यासाठी निश्चित केली आहे. त्यानुसार केंद्रीय संस्था डाळ खरेदी करतील. अलिकडच्या वर्षांत देशांतर्गत उत्पादनात वाढ होऊनही, देशांतर्गत डाळींच्या पुरवठ्यातील कमतरता भरून काढण्यासाठी भारत अजूनही आयातीवर अवलंबून आहे.

# सटाणा बाजार समिती सभापती निवड सभा तहकूब

## दोन्ही गटांचे समसमान बलाबल; नव्याने सभा होणार

**सटाणा : प्रतिनिधी**

सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती - उपसभापतिपदासाठी बागलाणचे सहाय्यक निबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र शेळके यांच्या अध्यक्षतेखाली कृउबा सभागृहात आयोजित विशेष सभा कोरमअभावी तहकूब करण्यात आली. सभेस शेतकरी विकास पॅनलचे प्रमोद बिरारी, हरिभाऊ जाधव, विनोद अहिरे, सुरेखा अहिरे, डॉ. राहुल सोनवणे, श्री यशवंत शेतकरी विकास पॅनलचे रवींद्र सोनवणे यांच्यासह व्यापारी गटातील दीपक सोनवणे, योगेश रौंदळ तसेच हमाल-मापारी गटातील संदीप साळे असे एकूण नऊ सदस्य उपस्थित होते.

उर्वरित संचालकांमध्ये श्री यशवंत शेतकरी विकास पॅनलचे राहुल सोनवणे, दिनेश गुंजाळ, मनोहर बिरारी, सिंधुताई संजय सोनवणे, काळू जाधव, निंबा वानले, गणेश ठाकरे, दीपक रौंदळ तसेच शेतकरी विकास पॅनलचे किशोर खैरनार अनुपस्थित होते.

दिनांक ३१ मार्च रोजी बाजार समितीसाठी मतदान व १ एप्रिल रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर एकूण १८ जागांमध्ये श्री यशवंत शेतकरी विकास पॅनल ९ जागा, शेतकरी विकास पॅनल ६ जागा, व्यापारी गट २ व हमाल मापारी गट १ अशा स्वरूपात संचालक असताना, सद्यस्थितीत दोन्ही पॅनलकडून एकेक संचालक अदलाबदली झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

सभा सुरू झाल्यानंतर दीड वाजेपर्यंत कोरम पूर्ण होऊ शकला नाही. अखेर सभा तहकूब झाल्याचे शेळके यांनी जाहीर केले. दोन्ही बाजूने नऊ - नऊ संचालकांच्या खेळात सभापतिपदासाठी कुउबाचे माजी सभापती संजय सोनवणे यांच्या पत्नी सिंधुताई संजय सोनवणे तसेच रवींद्र विठ्ठल सोनवणे हे इच्छुक होते. निवडणुकीत लखमापूर, ब्राह्मणगाव, कंधाणे परिसरात ध्रुवीकरण झाल्याची चर्चा झाली होती. सद्यस्थितीत बाजार समितीच्या सभापती, उपसभापती निवडीत तालुक्यातील डांगसौंदाणे येथील संचालकांची राजकीय महत्त्वाकांक्षा चर्चेचा विषय ठरली आहे. कोरमअभावी सभा तहकूब झाल्यानंतर उपस्थित संचालकांची व प्रशासकीय अधिकाऱ्यांची शाब्दिक चकमक झाली. यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश आल्यानंतर पुढील कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, असे शेळके यांनी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रियेत मालेगावचे सहकार अधिकारी स्वप्निल मोरे, कृउबा सचिव भास्कर तांबे आदींनी सहभाग घेतला. अपर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी शिवाजी रौंदळ, डॉ. प्रशांत सोनवणे, गजेंद्र चव्हाण, लालचंद सोनवणे, दीपक महाजन, संजय बिरारी, महेश देवरे, अमोल पगार, शिवाजी सोनवणे, डॉ. सुधीर सोनवणे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



# अमेरिका-चीन टॅरिफ वॉरचा एअर इंडियाला फायदा

**मुंबई :** एअर इंडिया लिमिटेड अमेरिकन कंपनी बोईंगकडून विमान खरेदी करण्याचा विचार करत आहे, ज्यांच्या शिपमेंटला चिनी विमान कंपन्यांनी नकार दिला आहे.

गेल्या आठवड्यात, अमेरिकेसोबतच्या टॅरिफ वॉर दरम्यान, चीनने आपल्या विमान कंपन्यांना बोईंगकडून नवीन विमानांची डिलिव्हरी न घेण्याचे आदेश दिले.

अमेरिकेच्या १४५% कर लादण्याच्या प्रत्युत्तरात चीन सरकारने हा आदेश जारी केला. त्यानंतर चीनने अमेरिकेत बनवलेल्या विमानांचे भाग आणि उपकरणांची खरेदी थांबवण्याचे आदेशही दिले.

बोईंग एअरप्लेन्स ही एक अमेरिकन कंपनी आहे जी विमाने, रॉकेट, उपग्रह, दूरसंचार उपकरणे आणि क्षेपणास्त्रे बनवते. अनेक देशांच्या विमान कंपन्या बोईंगने बनवलेली विमाने वापरतात. बोईंग ही अमेरिकेची सर्वात मोठी निर्यातदार कंपनी आहे आणि ती जगातील तिसरी सर्वात मोठी संरक्षण करार करणारी कंपनी देखील आहे.

बोईंगसोबत चीनचा व्यवसाय खूपच आव्हानात्मक राहिला आहे. या तणावाचा परिणाम २०१९ नंतरच्या डिलिव्हरीवर लक्षणीयरीत्या दिसून आला आहे. चीन बोईंगच्या प्रमुख ग्राहकांपैकी एक होता. अमेरिकन कंपनीने २०१५ ते २०२० दरम्यान चीनला ६६८ विमाने विकली.

२०१७ मध्ये एका मोठ्या करारात, चायना एव्हिएशन सप्लाय होल्डिंग कंपनीने ३७ अब्ज डॉलर्स किमतीची ३०० विमाने ऑर्डर केली. बोईंगच्या अंदाजानुसार, चीनचे विमान वाहतूक क्षेत्र वार्षिक ५.२% दराने वाढत आहे. २०४३ पर्यंत, त्याला ८,८३० नवीन विमानांची आवश्यकता असेल.

एअर इंडिया ३० ते ४० वाइड बॉडी विमाने खरेदी करण्यासाठी बोईंग आणि एअरबसशी चर्चा करत आहे. हा करार ५० हून अधिक विमानांसाठी देखील असू शकतो. यामध्ये एअरबस ए३५० आणि बोईंग ७७७एक्स मॉडेल्सचा समावेश आहे. या करारामुळे एअर इंडियाच्या आधुनिकीकरण योजनेला बळकटी मिळेल.

# दैफुकु इंट्रालॉजिस्टिक्सची हैदराबादमध्ये उत्पादन सुविधा

## 'मेक इन इंडिया' व्हिजनला बळकटी मिळणार

**नवी दिल्ली :** जपानस्थित दैफुकु कंपनी लिमिटेडची उपकंपनी दैफुकु इंट्रालॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने तेलंगणातील हैदराबाद येथे २.२७ अब्ज डॉलर्सच्या अत्याधुनिक उत्पादन सुविधा सुरू करण्याची घोषणा केली आहे.

नावीन्यपूर्णता आणि लॉजिस्टिक्सचे केंद्र असलेल्या हैदराबादमध्ये धोरणात्मकदृष्ट्या स्थित, ही सुविधा भारताच्या कार्यबलाला सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहे.

दैफुकु इंट्रालॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ श्री. असीम बेहरा यांनी यावर भर दिला की, नवोपक्रमातील अपवादात्मक गुंतवणूक भारताच्या गरजांनुसार स्मार्ट, स्केलेबल आणि भविष्यासाठी तयार इंट्रालॉजिस्टिक्स सोल्यूशन्स देण्याची आमची क्षमता लक्षणीयरीत्या वाढवते. ही सुविधा सुरुवातीला अभियांत्रिकी, ऑटोमेशन आणि उत्पादन क्षेत्रात १०० हून अधिक कुशल नोकऱ्या निर्माण करेल. तंत्रज्ञानाच्या पलीकडे, आम्ही लोकांमध्ये क्षमता निर्माण करणे, प्रतिभेचे पोषण करणे आणि भारताच्या आर्थिक प्रगतीत योगदान देणे आशी गुंतवणूक करत आहोत. हैदराबाद, त्याच्या उत्साही टॅलेंट पूल आणि धोरणात्मक कनेक्टिव्हिटीसह ऑटोमेशन आणि नवोपक्रमाला पुढे नेण्यासाठी एक परिपूर्ण आधार आहे.




पंतप्रधानांच्या आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत, ही सुविधा भारतासोबत आणि भारतासाठी वाढण्यासाठी आमची समर्पण प्रतिबिंबित करते.

दैफुकु कंपनी लिमिटेडचे सीईओ हिरोशी गेशिरो म्हणाले, भारत आमच्या सर्वात धोरणात्मक जागतिक बाजारपेठांपैकी एक आहे आणि ही सुविधा त्याच्या उत्साही ग्रोथ स्टोरी आणि क्षमतेवर आमचा खोल विश्वास अधोरेखित करते. हे मेक इन इंडिया उपक्रमाशी सुसंगत आहे, जे भारताच्या लॉजिस्टिक्स इकोसिस्टममध्ये ऑटोमेशन, इनोवेशन आणि लवचिकता

कंपनीने आघाडीच्या भारतीय टेक्निकल इंस्टीट्यूट्सशी सहयोग करण्याची, स्थानिक संशोधन आणि विकास उपक्रम सुरू करण्याची आणि ग्राहकांच्या ऑपरेशंस मध्ये पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी शाश्वत ऑटोमेशन पद्धतींना प्रोत्साहन देण्याची योजना आखली आहे.

**दैफुकु कंपनी लिमिटेडबद्दल**

जपानमधील ओसाका येथे मुख्यालय असलेली दैफुकु कंपनी लिमिटेड ही मटेरियल हँडलिंग आणि ऑटोमेशन सोल्यूशन्समध्ये जागतिक आघाडीवर आहे आणि ८० वर्षांहून अधिक काळ उद्योगात तज्ज्ञ आहे. ही कंपनी गोदामे, उत्पादन सुविधा, वितरण केंद्रे, विमानतळ आणि क्लीन रूम्ससाठी नाविन्यपूर्ण प्रणाली डिझाइन आणि वितरित करण्यात माहिर आहे. २४ देश आणि प्रदेशांमध्ये बेस असलेले, दैफुकु जगभरातील उद्योगांमध्ये कार्यक्षमता, शाश्वतता आणि तांत्रिक प्रगती चालविण्यास वचनबद्ध आहे. ग्राहक-केंद्रित उपायांवर लक्ष केंद्रित करून, दैफुकु इंट्रालॉजिस्टिक्समध्ये बेंचमार्क स्थापित करत आहे, ज्यामुळे व्यवसायांना ऑपरेशन्स ऑप्टिमाइझ करण्यास आणि दीर्घकालीन वाढ साध्य करण्यास सक्षम केले जाते.

# एचडीएफसी बँक १००० खेड्यांना देणार अक्षय ऊर्जा

## २२ राज्यांमध्ये ६१,५०० पेक्षा जास्त सोलर स्ट्रीटलाइट बसवले

**नाशिक : प्रतिनिधी**

जगभरात वसुंधरा दिन काल साजरा झाला. एचडीएफसी बँकेनेही वसुंधरा दिन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. बँकेने सीएसआर उपक्रमांतर्गत देशभरातील १००० पेक्षा जास्त खेड्यांना स्वच्छ आणि अक्षय पोहोचविण्याचा प्रयत्न करणार आहे.

अक्षय ऊर्जेच्या बाबतीतील या बँकेचे कार्य 'अवर पॉवर, अवर प्लॅनेट' या यंदाच्या वसुंधरा दिनाच्या थीमशी साधर्म्य दाखवणारे आहे. या थीममधून स्वच्छ ऊर्जेचा अंगीकार करण्याचे प्रमाण वाढवण्याचे जागतिक आवाहन करण्यात आले आहे. आपल्या 'नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट'च्या स्तंभाखाली एचडीएफसी बँक परिवर्तनने ६१,६५५ पेक्षा जास्त सोलर स्ट्रीटलाइट २२ राज्यांमध्ये स्थापन केले आहेत. याशिवाय मार्ग सुरक्षा ते पेयजल, शेतकी, फूड प्रोसेसिंग आणि उपजीविका वाढवण्यासारखे अनेक सोलर उपक्रमदेखील त्यांनी लॉन्च केले आहेत, जे ग्रामीण जीवनास फायदेशीर ठरत आहेत. केवळ इन्फ्रास्ट्रक्चर पुरेसे नाही, हे ओळखून एचडीएफसी बँकेने निमशहरी भारतात सौरऊर्जेच्या अंगीकार करण्यातील रहस्यमयता दूर करण्यासाठी सोलर शिक्षा हा जागरूकता उपक्रम विकसित केला आहे. आजपर्यंत गोवा, कर्नाटक, हरियाणा, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगडसारख्या राज्यांमधील ९० पेक्षा जास्त जागरूकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामधून ४५०+ समुदायांतील ३००० पेक्षा जास लोक प्रभावित झाले आहेत. हा प्रोग्राम शाळा, सार्वजनिक हॉस्पिटल्स, अनाथालये, कृषी समुदाय आणि वृद्धाश्रम यांसारख्या स्थानांपर्यंत पोहोचला आहे, जेथे सोलरचा जीवनमानावर थेट प्रभाव पडणे शक्य आहे. हा प्रोग्राम सोलर पंप, पॅनल्स, कुकर्स, शेगड्या, स्ट्रीटलाइट्स आणि वॉटर हीटर्ससारख्या विविध सोलर उपाययोजनांचा अंगीकार करण्यासाठी प्रचार करतो.



या उपक्रमांविषयी बोलताना एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर कैझाद भरूचा म्हणाले, शाश्वत भविष्याकडे जाणारा रस्ता समावेशक विकासात दडलेला आहे.

परिवर्तनच्या छत्राखालील आमचे सौरऊर्जा उपक्रम संधी निर्माण करण्याबरोबरच रस्ते आणि घरे उजळण्यासारखे प्रत्यक्ष आणि मोजता येण्याजोगे मोठे फरक घडवून आणण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. वसुंधरा दिनी, देशभरात अशी प्रभावी मॉडेल्स वाढवण्याबाबतच्या आमच्या वचनबद्धतेची आम्ही पुष्टी करतो. एचडीएफसी बँकेतील कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे प्रमुख नुसरत पठाण म्हणाले, आम्ही हे जाणतो की, सौरऊर्जेचे लोकशाहीकरण हे तांत्रिक उपाययोजनांच्या पुढे जाते. आमची वचनबद्धता इन्फ्रास्ट्रक्चर विकासाच्या पलीकडे जाऊन ज्ञान-प्रेरित फ्रेमवर्कच्या निर्मितीवर केंद्रित आहे. एक असे फ्रेमवर्क जे दीर्घकालीन, समुदाय-प्रेरित ऊर्जा स्वातंत्र्य सक्षम बनवते.



# वाचू आनंदे...

# जागतिक पुस्तक दिन

नाशिक, बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ गांवकरी

### पुस्तक दिनाचा इतिहास

विल्यम शेक्सपियर, मिगुएल सर्व्हंटिस आणि इंका गार्सिलोसो यांच्यासह जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिलला जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केले. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्व्हांटिसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनेस्कोची सर्वसाधारण सभा झाली, ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल, असा निर्णय घेण्यात आला.

पुस्तकप्रेमी म्हणतात,

## मोबाइलपेक्षा पुस्तक जवळ ठेवा...

**वाचनाने माणूस घडतो, विचारांना दिशा मिळते. विचारांची पातळी वाढण्यास मदत होते. मोबाइलमुळे जग मुठीत आले असले तरी वाचन हे जरुरीच आहे. आजच्या पुस्तक दिनानिमित्त काही मान्यवरांनी मोबाइलपेक्षा पुस्तक जवळ ठेवा, असा संदेश दिला आहे.**



आजच्या विद्यार्थ्यांसाठी मोबाइल आणि डिजिटल उपकरणे अत्यावश्यक असली तरी पुस्तकांनी त्यांना स्थिरता, विचारशक्ती आणि दीर्घकालिक ज्ञानाचा अनुभव दिला पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागली पाहिजे.

**- एस. बी. देशमुख, सचिव, जिल्हा मुख्याध्यापक संघ**

पुस्तकाचा प्रभाव आपल्यावर दीर्घकाळ टिकतो; कारण ते आपल्याला विचारांच्या गतीत एकाग्रतेचा अनुभव देतात. पुस्तक वाचताना आपल्या मनाला गहन विचारांच्या प्रवासात घालून त्यात वेगळा आनंद मिळतो. पुस्तकांमध्ये तसेच वर्तमानपत्रे यांच्यात असलेल्या विचारांची आणि लेखांची जादू अशी आहे की, ती कायमची स्मरणात राहते.

**- ए. के. खालकर, शिक्षक**



मला लहानपणापासूनच वाचनाची खूप आवड आहे. इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांतील पुस्तक मी वाचतो. वाचनाने माणूस समृद्ध होतो. चांगली पुस्तके आपल्याला एक अनोख्या जगात घेऊन जातात. त्यामुळे प्रत्येकाने सतत वाचत राहिले पाहिजे. चांगल्या ग्रंथपालाला वाचनाची आवड असणे आवश्यक आहे. त्यांनी वाचकांना चांगली पुस्तके सुचवली पाहिजेत. त्यासाठी ग्रंथपालनच्या सेवाशर्तींमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. चांगले ग्रंथपाल निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

**- डॉ. केशव नांदूरकर,** प्राचार्य के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय

चांगली पुस्तके लहान मुलांच्या, किशोरवयीन, युवकांच्या हातात योग्य वेळी दिली. त्यांना वाचनाची गोडी लावली तर ही मुले वाचती होतील. त्यावर चिंतन-मनन करतील. आत्मशोध घेतील आणि त्यातूनच सुसंस्कृत समाज उभा राहील. चांगली पुस्तकं योग्य वेळी, योग्य हातात पडली तर हा देश वाचेल. भाषा वाचेल. विश्व वाचेल.

**- विवेक उगलमुगले, लेखक व कवी**



पुस्तक हे ज्ञानाचे भांडार असते. प्रत्येक पानामध्ये नवे विचार, अनुभव, माहिती आणि दृष्टिकोन असतो. कोणतेही क्षेत्र असो, विज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान - पुस्तकांमधून जग खुलते आणि विचार उंचावतात. महामानवांची चरित्रे वाचून विद्यार्थी प्रेरित होतो. प्रत्येक पात्र, प्रसंग, संघर्ष यामधून शिकण्यासारखे असते.

**- गणेश बोगीर, विद्यार्थी**



दररोजचे थोडेसे वाचन, आपोआप आत्मविश्वास, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वात फरक घडवते. परीक्षांच्या पलीकडे जाऊन जीवन समजून घेण्यासाठी वाचन हवेच. मोबाइलपेक्षा पुस्तक जवळ ठेवा - जीवन उजळून निघेल.

**- मानसी पाटोळे**



खरे ज्ञान हे ग्रंथ म्हणजे पुस्तकातूनच मिळतात. म्हणूनच व्यासंगी लोकांना ग्रंथ म्हणजेच त्यांचे मित्र वाटतात. सांप्रत काळामध्ये पुस्तके जमवण्याचा छंद विविध कारणांमुळे कमी होत चालला आहे. त्यामुळेच घरात पुस्तके नाहीत म्हणून नवीन पिढी वाचनापासून दूर जाताना दिसते. आधीच्या पिढीमध्ये उन्हाळी सुट्टीत पुस्तके वाचनाची चढाओढ लागत असे. दुर्दैवाने आजच्या विद्यार्थ्यांमध्ये ही वाचण्याची आवड दिसत नाही. त्याचे कारण घरामध्ये पुस्तके नाहीत व पालकांची वाचनालयात जाण्याची आवड कमी झाली, हे असू शकते.

**- पंकज धर्माधिकारी,** प्राचार्य, संदीप तंत्रनिकेतन, नाशिक





## सावानामुळे रुजतेय वाचन संस्कृती

### वर्षभरात ६० हजार पुस्तकांची देवाण-घेवाण

**नाशिक : अश्विनी पांडे**

**पुस्तके ही माणसाला समृद्ध करतात असे मानण्यात येते. पुस्तके ही ज्ञानाचे भांडार आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत पुस्तक वाचनाचा कल कमी झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सोशल मीडियाच्या वाढलेल्या वापरामुळे अधिक वेळ मोबाइलवर जात असल्याने पुस्तक वाचण्यासाठी वेळ दिला जात नाही, असे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात तरुणांचा वाचनांकडे कल वाढल्याचे चित्र आहे. शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान असल्याचे सार्वजनिक वाचनालयात गेल्या वर्षभरात ६० हजार पुस्तके वाचनासाठी नेल्याची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, तरुणांचा वाचनाकडे कल वाढल्याचे चित्र आहे.वर्षभरात सार्वजनिक वाचनालयाचे सभासद होण्याचे प्रमाण वाढले असून, यात विद्यार्थी, तरुण यांचाही सहभाग आहे. वार्षिक सभासद होण्यासोबतच अजीवन सभासद होणाऱ्यांची संख्या मोठी आहे. गेल्या काही वर्षांत वाढदिवसाला अथवा कार्यक्रमाच्यावेळी भेट स्वरूपात पुस्तके देण्याचा ट्रेंड आहे. त्यामुळे पुस्तकांच्या मागणीत वाढ, वाचकांच्या संख्येत वाढ होत आहे.**



पुस्तक माणसांचे मित्र असतात. पुस्तकांतून अनेक प्रकारचे ज्ञान मिळते. वाचन संस्कृतीपासून पुढची पिढी दूर जाणार नाही यासाठी पालकांनी आपल्या मुलांना पुस्तक वाचनाची सवय लावायला हवी, तरच वाचन संस्कृती टिकेल.

**- नेहा जोशी, वाचक**



सावानाच्या मार्फत वाचन संस्कृती टिकावी यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवण्यात येतात. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील काही वाचनालयांनी सावानाकडे ग्रंथसंपदा देण्याची मागणी केली होती. त्यातील काही ग्रामीण भागातील वाचनालयांना आजच्या वाङ्मयीन पुरस्काराप्रसंगी ग्रंथसंपदाही देण्यात येणार आहे. पुस्तकांपासून वाचक दुरावला असे म्हणणे चुकीचे ठरेल, कारण सावानात सातत्याने नवीन वाचक येतात. त्याचप्रमाणे आजच्या काळात ऑनलाइन माध्यमातूनही अनेक जण वाचन करत असतात.

**- देवदत्त जोशी** ( ग्रंथसचिव, सावाना)

#### वर्षभरात ६० हजार पुस्तकांची देवाण

वर्षभरात अंदाजे ६० हजार पुस्तक वाचकांनी वाचनासाठी नेल्याची नोंद सावानात करण्यात आली आहे. यात ऐतिहासिक व व्यक्तिमत्त्व विकासाच्या पुस्तकांना अधिक पसंती मिळत आहे. तर वर्षभरात ६० ते ७० हजार वाचक सावानास भेट देतात. यात विद्यार्थी, तरुण यांचाही मोठा सहभाग असतो.

#### ऐतिहासिक पुस्तकांना मागणी अधिक


छावा, संभाजी, झेप, झुंज, मृत्युंजय, ययाती, कर्माचा सिद्धांत या ऐतिहासिक पुस्तकांना अधिक मागणी आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिमत्त्व विकासाची पुस्तके यांना तरुणांकडून अधिक पसंती मिळत आहे. सुहास शिरवाळकर, शांता शेळके, चेतन भगत यांच्या पुस्तकांची वाचकांकडून सातत्याने विचारणा होते.

## ग्रामीण वाचनालयांची अवस्था 'असून नसल्यासारखी'!

**निफाड : अण्णासाहेब बोरगुडे**

आधुनिक तंत्रज्ञानाने आज मोठी प्रगती केली असून, मोबाइलच्या एका क्लिकवर हवी ती माहिती सहज उपलब्ध होत आहे. वाचन संस्कृती पण त्यातच गुरफटल्यामुळे कधी काळी पुस्तके हातात घेऊन एकटक खिळून बसणाऱ्या त्या वाचकांच्या हातातही आज मोबाइल आला आहे. त्यामुळे वाचक वर्ग कमी होत चालल्याने ग्रामीण भागातील सार्वजनिक वाचनालयांना घरघर लागली असल्याचे चित्र आहे.

निफाड तालुक्यात सद्यस्थितीत जवळपास २९ सार्वजनिक वाचनालये कार्यरत आहेत. त्यातील अनेक वाचनालये बंद पडली आहेत. सार्वजनिक ठिकाणी



असलेल्या वाचनालयाच्या माध्यमातून खेडोपाडी वाचन संस्कृती जोपासून युवावर्गातून सुजाण नागरिक घडावेत, म्हणून शासनाने गाव तेथे वाचनालय सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. पूर्वी वाचनालयाच्या वेळेत वर्तमानपत्र, कादंबरी इत्यादीच्या मासिक वाचनासाठी तरुण व प्रौढ नागरिकांची गर्दी पाहायला मिळायची. परंतु, आता या मोबाइलच्या युगात ही वाचनालये ओस पडत चालली आहे.

केवळ स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तरुण, तरुणी कधी तरी यातील पुस्तके चाळत आहेत.निफाड तालुक्यात सद्यस्थितीत २९ सार्वजनिक वाचनालये आहेत. निफाड शहरातील सर्वांत जुने वाचनालय म्हणून माणकेश्वर वाचनालय आहे. या वाचनालयातील हजारो पुस्तके वाचकांच्या सेवेत आहेत.

## बुके नको, बूक द्या!

**नाशिक : प्रतिनिधी**

सत्कार समारंभ, कार्यक्रमानिमित्ताने अनेकदा फुलांचा गुच्छ देण्याची प्रथा होती, परंतु राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बुके नको, बूक द्या, असे आवाहन केले. वाचन संस्कृती वाढीस लागावी हा यामागचा उद्देश होता. या उपक्रमाचा आजच्या ग्रंथदिनी सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे.


मोबाइलमुळे पुस्तके घेऊन वाचण्याचे प्रमाण लक्षणीय घटत चालले आहे. तासन्‌तास मोबाइलमध्ये डोके घालून बसलेली व्यक्ती अर्धा तासही वाचन करत नसल्याचे चित्र आहे. पुस्तकांमुळे व्यक्तीची वैचारिक पातळी वाढते. डिजिटल युगात सोशल मीडियाने जीवनमान बदलले आहे. परंतु वाचन संस्कृतीवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचा प्रभाव दिसून येत आहे.

सोशल मीडियामुळे ज्ञानप्रसार विविध विषयांवर लेख, ब्लॉग, माहिती सहज उपलब्ध होते. वाचन सोपे होते. ई-बुक्स, ऑडिओ बुक्स यामुळे वाचन सुलभ झाले आहे. सोशल मीडियावर वाचन ग्रुप पुस्तक चर्चा आणि लेखकांची थेट संवादही साधला जातो. एखाद्या आवडत्या किंवा नावडत्या लेख, घटनांवर मत मांडता येते. तसेच सोशल मीडियावर छोटे आणि आकर्षक माहितीच्या नादात केवळ वरवरची माहिती घेतली जाते. सखोल माहिती वाचली जात नाही, वारंवार येणाऱ्या जाहिराती, सूचना यामुळे वाचनात सातत्य, एकाग्रता राहत नाही.

वाचन संस्कृती वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. नाशिक रीडर्स क्लब, उदोजी महाराज म्युझियम आणि मविप्र अल्यूम्नी असोसिएशन यांच्या सहकार्याने नाशिक रीडर्स क्लबची स्थापना करण्यात आली आहे.

येवला येथील धडपड मंच या संस्थेने गेल्या २४ वर्षांपासून उन्हाळ्याच्या सुटीत लहान मुलांसाठी मोफत बालवाचनालय सुरू केले आहे.

पुस्तक साखळी भेट योजना या अंतर्गत वाचकांना आवडलेली पुस्तके इतरांना भेट देण्याची प्रथा सुरू केली. वाचनाची साखळी तयार व्हायला



मदत होते.

भीमाबाई जोंधळे यांनी पुस्तकांचे हॉटेल या उपक्रमाची सोय केली आहे. सार्वजनिक वाचनालये नाशिक आणि सुभाष सार्वजनिक वाचनालय यांसारख्या संस्थांनी वाचन संस्कृती जपण्यासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबविले आहेत. नाशिक जिल्ह्यातील विविध उपक्रम आणि संस्थांच्या प्रयत्नामुळे वाचनाची गोडी आणि संस्कृती जपली जात आहे. या उपक्रमामुळे नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण होऊन समाज विचारशील आणि प्रगल्भ होण्यास मदत होणार आहे.

## ग्रंथ वाचा, ग्रंथ सांभाळा



वाचणारी व्यक्ती आयुष्यभर पुस्तके गोळा करते. फक्त पुस्तके विकत घेते असे नाही तर कुठून कुठून पुस्तके मिळवली जातात. व्यक्तीला वाचनाची आवड आहे, हे आजूबाजूच्या व्यक्तींना कळल्यानंतर ती मंडळीदेखील वेळोवेळेला पुस्तके भेट म्हणून देतात. आयुष्यभर पुस्तकाची आवक चालू राहते. अशा ग्रंथ समृद्ध झालेल्या व्यक्तीने आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात निरनिराळ्या ठिकाणी पुस्तके भेट म्हणून द्यायला सुरुवात केली पाहिजे. तसेच ज्या पद्धतीने मिळवलेल्या मिळकती करता इच्छापत्र केले जाते, तशाच पद्धतीने स्वतःच्या माघारी पुस्तकांची व्यवस्था केली पाहिजे. ती जर केली नाही तर आयुष्यभराची कमाई रद्दीच्या दुकानात येईल. जसे अनेक लेखक आणि वाचकांच्या बाबतीत घडते आणि घडले. माझे सासू आणि सासरे

**मिलिंद चिंधडे**

म्हणजे कैलासवासी वैजयंती तांबोळी आणि कैलासवासी रमाकांत तांबोळी यांनी आयुष्यभर नोकरीबरोबर समाजसेवा केली. ती करत असताना आवडीच्या विषयासंबंधी वाचन केले. सासरे समाजसेवेमध्ये होते. त्यामुळे त्यांना भरपूर पुस्तके भेट म्हणून आली तर सासूबाईंना शेवटच्या कालावधीमध्ये आध्यात्मिक विषयांची गोडी होती. त्यामुळे त्यांनी तशा प्रकारची पुस्तके विकत घेतली.

हे सगळे ग्रंथ भांडार अहिल्यानगर येथे होते. मी आणि सौभाग्यवतीने, मेहुण्यांच्या संमतीने ही सगळी पुस्तके नुकतीच अहिल्यानगर येथून नाशिकला आणली. त्याचे वर्गीकरण करून माझ्या संबंधित असलेल्या वाचनालयांना, गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या उपक्रमाकरिता, वेळोवेळी देऊन उरलेली पुस्तके माझ्या ग्रंथ संग्रहात भर घालतील. काही जणांच्या मते हा सगळा अव्यापारीशू व्यापार आहे. पुस्तके गोळा करणारी, वाचनाची आवड असणारी असा अव्यापारेशू व्यापार करीतच असतात. या आणलेल्या ग्रंथसंग्रहात अनेक दुर्मिळ पुस्तके आणि गोष्टी आहेत. उदाहरणार्थ माझ्या सासऱ्यांना जी भेट पुस्तके आली आहेत, त्यावर लेखकांच्या सह्या आहेत. उदाहरणार्थ समाजसेविका निर्मलाताई पुरंदरे, कवी संजीव, डॉ. शरदचंद्र गोखले इत्यादी. तर श्री क्षेत्र पावसचा विशेष अंक, स्वामी स्वरूपानंदांबद्दलचा विशेषांक, महाराष्ट्र टाइम्सने काढलेला बालगंधर्व विशेष अंक, के. व्ही. बेलसरे, वरदानंद भारती यांची दुर्मिळ पुस्तके. आणखी असे बरेच काही. त्यासंबंधी स्वतंत्र लेखन मी करीनच.

जसे मी माझ्या या जवळच्या व्यक्तींचा ग्रंथसंग्रह घेऊन आलो तसे सर्वांनी नक्कीच करावे. काही जणांनी तसे नक्कीच केले असेलही. या सगळ्या पुस्तकांकडे पाहिले की, गेलेल्या व्यक्तींची नक्कीच आठवण होते. त्यांच्या आवडीनिवडी आणि त्यांनी केलेले कामही आठवते. हे सगळे जवळ ठेवून योग्य वेळेला योग्य ठिकाणी या स्मृती सांभाळण्याकरिता पोचवल्या पाहिजेत.





## 'सरस्वती'च्या उपासकांवर 'लक्ष्मी' रुसलेलीच!

### ग्रंथपालांना तुटपुंजे वेतन; घरखर्च भागविणे मुश्कील

**नाशिक : देवयानी सोनार**

वाढती महागाई, वाचनसाहित्याच्या खर्चात झालेली वाढ, वीजदरात झालेली वाढ यांचा विचार करून या ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ होणे अपेक्षित असते. परंतु दैनंदिन खर्च भागवण्याइतपतसुद्धा शासनाकडून अनुदान मिळत नाही. दरवर्षी परीक्षण व सेवकांच्या मानधनापोटी त्या ग्रंथालयांचा वर्ग व दर्जानुसार अतिशय तुटपुंजे अनुदान दिले जाते. ग्रंथालय सेवकांचा प्रश्न गेल्या ६० वर्षांपासून प्रलंबित आहे. सेवकांच्या जिवावर ग्रंथालय चालते, त्यांना पुरेसे वेतन दिल्याशिवाय ग्रंथालये समृद्ध होणार नाही.

महागाईने एकीकडे कळस गाठलेला असताना ग्रंथपालांना आजही तुटपुंज्या वेतनात राबावे लागत आहे. सरस्वतीची उपासना करणाऱ्या या सेवकांवर लक्ष्मीची कृपा कधी होणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

धावपळीच्या वेगवान तंत्रज्ञानाच्या युगात वाचनाची सवय टिकविण्यासाठी आणि ज्ञानाचे भांडार खुले करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांत एकूण २५२ (४) शासकीय सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत.

ग्रंथालय कायद्यात बदल करणे ही काळाची गरज असल्याचे ग्रंथपालांचे म्हणणे आहे. ग्रंथालय चळवळीला योग्य दिशा व एकसूत्रीपणा आणण्यासाठी ग्रंथालय कायद्यात तत्काळ सुधारणा करणे गरजेचे आहे. सार्वजनिक ग्रंथालय पद्धतीत ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी, सेवानिश्चिती, सेवासुरक्षा, रजानियम, सेवानिवृत्तिवेतन, शैक्षणिक पात्रता यापैकी कोणत्याही बाबी निश्चित नाही. तसेच सार्वजनिक ग्रंथालये ही अत्यावश्यक सेवा मानण्यात येत नाही. निष्ठेने काम करणारा सेवकवर्ग मिळण्यासाठी शासनाने ग्रंथालय सेवकांची वेतनश्रेणी ठरवायला हवी. मात्र वाटाघाटी, चर्चेचा घोळ शासनाकडून घातला जात असल्याने सेवकांमध्ये असंतोष आहे. ग्रंथालय सेवक हा सर्वाधिक पीडित वर्ग आहे. त्यांना सहावा वेतन आयोग तर जावू द्या; पण किमान आवश्यक गरजा भागविता येतील इतपत किमान गरजेएवढा पगार मिळावा ही अपेक्षा गैर नाही. आपला चरितार्थ चालविण्यासाठी जोड व्यवसाय करावा लागतो. ही कसरत करीत असताना त्याचा ग्रंथालय सेवांवर परिणाम होतो. परंतु जिल्हा ग्रंथालय संघ, राज्य ग्रंथालय संघ, ग्रंथालय कर्मचारी, पदाधिकारी यांनी वेळोवेळी मागणी करून, आंदोलने करून, मोर्चे काढून, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत आमदारांच्या माध्यमातून मागणी करूनदेखील हा प्रश्न सोडविण्याची शासनाकडून नेहमीच टाळाटाळ होत असते. ग्रंथालयांच्या काही अटीत बदल करून अनुदानात बारा ते पंधरा वर्षांनी नाममात्र वाढ करण्यात येते. शासनमान्यता, वर्ग व दर्जा बदल २०१२ पासून बंद आहे. त्यामुळे राज्यातील ग्रंथालय चळवळीत असंतोष आहे.

ग्रंथालयीन कर्मचारी वर्गाला शासकीय कर्मचारी वर्गाप्रमाणे वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे आवश्यक आहे. वाचनसंस्कृती वाढावी व त्यायोगे लोकशिक्षण हा हेतू डोळ्यासमोर ठेवून कायदा केला जावा. सरकारी जागा उपलब्ध करून देणे. ग्रंथ खरेदीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे. तसेच पुस्तकांच्या किमतींवर शासनाचे नियंत्रण असावे. यासाठी लोकप्रतिनिधी, लेखक, प्रकाशक, वाचक, सर्वसामान्य व प्रतिष्ठित व्यक्ती, प्रशासक, ग्रंथालय क्षेत्रातील जाणकार, सर्व प्रकारची ग्रंथालये यांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**- आनंद जाधव, ग्रंथपाल**

#### जिल्ह्यात एकूण कर्मचारी ५१७ (१२)
#### (कंसातील संख्या ग्रामपंचायत ग्रंथालये)

अवर्ग १९ (१), ब वर्ग ५९(२), क वर्ग ८८ (१),
ड वर्ग (१) याप्रमाणे आहेत.
कर्मचारी संख्या अवर्ग ७८ (४)
ब वर्ग १७७(६), क वर्ग १७६ (२)
ड वर्ग ८६ असे आहेत.
यातील ११ अकार्यक्षम ग्रंथालये आहेत.

सर्वाधिक ग्रंथालये नाशिक येथे ३३ आहेत. इगतपुरी २६, निफाड तालुक्यात २४ आहेत. याशिवाय पाथर्डी, मालेगाव, येवला, चांदवड, सुरगाणा, बागलाण अशा तालुक्यांमध्ये चांगल्या प्रमाणात ग्रंथालये सुरू आहेत. ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ५७१ असून, ११ पदे रिक्त आहेत.